इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ३९ ▸ अंक -३२५ ▸ शुक्रवार,ता.२९ मार्च २०२४ ▸ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 • पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

छत्तीसगड सीमेलगत चकमक

गडचिरोली,ता.२८-

गडचिरोली आणि छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागातील भूमकान गावानजीकच्या जंगलात बुधवारी रात्रभर पोलिस आणि नक्षल्यांमध्ये जोरदार चकमक झाली.पोलिसांनी घटनास्थळावरुन यावेळी नक्षल साहित्य ताब्यात घेतले आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घातपात करण्याच्या हेतूने कसनसूर, चातगाव दलम आणि छत्तीसगड्मधील औंधी दलमचे नक्षलवादी एटापल्ली तालुक्यातील भूमकान गावानजीकच्या जंगलात एकत्र आले होते.सी-६० पथक आणि केंद्रीय राखीव दलाच्या जलद प्रतिसाद पथकाच्या जवानांना त्या भागात पाठविण्यात आले होते.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

GAYATRI MOBILES
mi चे अधिकृत विक्रेते | Bajaj Finance Available
SAMSUNG | oppo | iPhone
vivo | ONEPLUS | mi xiaomi
NOKIA | realme
BRANCH NO:1 एस. टी. स्टँड समोर, इचलकरंजी. 9226872967
BRANCH NO:2 जनता चौक, येवले बिल्डिंग, इचलकरंजी 9970605002

www.emahasatta.com | e-mail : mahasatta@gmail.com | mahasattaadvt@gmail.com | किंमत ₹ ५.००

लोकसभा निवडणूक

दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी

■नवी दिल्ली,ता.२८-

लोकसभेची निवडणूक घोषित झाल्यापासून राजकीय पक्षांची पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठी लगबग सुरू असतानाच निवडणूक आयोगाने आता निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी केली आहे.

आयोगाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात १२ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील ८८ लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे.त्यासाठी निवडणूक आयोगाने वेळापत्रक जारी केले आहे.वामध्ये (पान २ वर)

माने,मंडलिक यांना उमेदवारी

■मुंबई,ता.२८(प्रतिनिधी)-

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने लोकसभेसाठी पहिली उमेदवार यादी आज जाहीर केली आहे. पहिल्या उमेदवार यादीत ८ जणांचा समावेश आहे. कोल्हापूरमधून संजय मंडलिक, हातकणंगलेतून धैर्यशील माने, मुंबई दक्षिण मध्यमधून राहुल शेवाळे यांच्यासह आठ ठिकाणचे उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये ठाणे आणि नाशिकमधील उमेदवार अद्याप घोषित करण्यात आले नाहीत.

हातकणंगले-धैर्यशील माने,कोल्हापूर-संजय मंडलिक, मुंबई दक्षिण मध्य-राहुल शेवाळे, शिर्डी-सदाशिव लोखंडे,बुलढाणा-प्रतापराव जाधव,हिंगोली-हेमंत पाटील,मावळ-श्रीरंग बारणे,रामटेक-राजू पारवे.

ठाण्यावर भाजपने तर नाशिकवर राष्ट्रवादीने दावा केल्याची माहिती आहे. पूर्वीच्या सात खासदारांना पुन्हा उमेदवारी दिली असून काँग्रेस पक्षातून शिवसेना शिंदे गटात नुकताच प्रवेश केलेले आमदार राजू पारवे यांना रामटेक मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

यापूर्वीच भाजप, काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि

अजित पवार यांनी आपले उमेदवार जाहीर केले आहेत. त्यानंतर आता एकनाथ शिंदे यांनी आपले उमेदवार लोकसभेच्या आखाड्यात उतरवले आहेत.

ठाणे आणि नाशिक सस्पेन्स कायम

शिवसेनेच्या आठ उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर त्यामध्ये नाशिक आणि ठाण्याच्या उमेदवारी मात्र जाहीर करण्यात आली नाही. नाशिकच्या हेमंत गोडसेंच्या नावाला भाजपचा विरोध आहे, त्याचवेळी राष्ट्रवादीने त्या जागेवर दावा केला आहे. तर दुसरीकडे एकनाथ शिंदेंच्या घरच्या ठाण्याच्या जागेवरच भाजपने दावा केला आहे. ही जागा आपल्यालाच मिळावी म्हणून भाजप आग्रही आहे. तर ठाणे हा शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याने शिंदेही ती जागा सोडण्यास तयार नाहीत.

शिवसेना शिंदे गटाची यादी जाहीर

कल्याण,वाशिमचा उमेदवार घोषित नाही

कल्याणमधून एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र श्रीकांत शिंदे हेच उमेदवार असतील हे नक्की असले तरी त्यांचे नाव पहिल्या यादीत नाही. तर दुसरीकडे यवतमाळ वाशिमच्या जागेवरून तिढा निर्माण झाला आहे. वाशिमच्या पाच वेळच्या खासदार असलेल्या भावना गवळी यांच्या नावाला भाजपचा विरोध असल्याची माहिती आहे. तर संजय राठोड यांना उमेदवारी द्यावी असा भाजपचा आग्रह आहे. यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

शिवसेनेच्या दोन्ही गटाच्या पहिल्या यादी जाहीर झाल्यानंतर उध्दव ठाकरेंच्या शिवसेना विरुद्ध शिंदेंची शिवसेना अशी पाच ठिकाणी लढत होणार आहेत. दक्षिण मध्य मुंबई - अनिल देसाई (उबाठा) विरुद्ध राहुल शेवाळे (शिंदे गट), शिर्डी- भाऊसाहेब वाकचौरे (उबाठा) विरुद्ध सदाशिव लोखंडे (शिंदे गट), बुलढाणा-नरेंद्र खेडेकर (उबाठा) विरुद्ध प्रतापराव जाधव (पान २ वर)

केजरीवाल यांच्या कोठडीत वाढ

न्यायालयात स्वत:च केला युक्तीवाद

■नवी दिल्ली,ता.२८-

कथित दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या ईडी कोठडीत १ एप्रिलपर्यंत दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने वाढ केली आहे.कथित मद्य धोरण घोटाळा प्रकरणात केजरीवाल यांना २१ मार्च रोजी ईडीकडून अटक करण्यात आली होती.यानंतर न्यायालयाने त्यांना २८ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली होती. गुरूवारी त्यांची ईडी कोठडी संपली होती.यानंतर अरविंद केजरीवाल यांना पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांच्या कोठडीत वाढ केली.

अरविंद केजरीवाल यांना मद्य धोरण घोटाळा प्रकरणात चौकशीसाठी ईडीने तब्बल ९ वेळा समन्स बजावले होते. मात्र, ईडीने ९ वेळा समन्स देऊनही केजरीवाल यांनी चौकशीला जाणे टाळले.

गोविंदाचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

■मुंबई,ता.२८(प्रतिनिधी)-

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच आता राजकीय वर्तुळात देखील पक्षप्रवेशाचे सूर वाजू लागले आहेत. याच पार्श्वभूमीवर अभिनेता गोविंदा अहूजा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे.

यावेळी माध्यमांशी बोलताना गोविंदा म्हणाले की, एकनाथ शिंदे साहेबांचे धन्यवाद करतो. मी २००४ ते २००९ मी काँग्रेसमध्ये होतो व प्रथमच मी लोकसभेची निवडणूक जिंकून संसदेत खासदार म्हणून गेलो. राजकारणातून बाहेर पडल्यानंतर मी पुन्हा या राजकीय दिशेला वेईल, असे वाटले नाही. १४ वर्षापासून वनवासात होतो आता रामराज्यात आलो. मला दिलेली जबाबदारी मी योग्यरितीने पार पाडणार, असे गोविंदा म्हणाले.

मुख्यमंत्र्यांमुळे मुंबईचा कायापालट झाला आहे. फार वर्षापूर्वी जी मुंबई पाहिली होती, ती आता खूप सुंदर झाली आहे. महाराष्ट्र संतांची भूमी आहे. शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर मुंबईचे सुशोभीकरण वाढले. पंतप्रधान मोदींप्रमाणे शिंदेंची प्रतिमा स्वच्छ आहे, असेही गोविंदा म्हणाले. शिंदेंच्या शिवसेनेत गोविंदा अहूजा यांचा पक्षप्रवेश झाला असून मुंबईच्या उत्तर पश्चिम मतदारसंघातून गोविंदा यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. परंतु, गोविंदा आमच्याशी स्टार प्रचारक म्हणून काम करतील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. शिंदे पुढे म्हणाले, शिवजयंतीच्या पवित्र दिनी सर्वांचे लोकप्रिय अभिनेते यांचे मी शिवसेनेत मनापासून स्वागत करतो. सर्वांना (पान २ वर)

वंचितच्या पाठीत खंजीर खुपसला

प्रकाश आंबेडकरांचा संजय राऊतांना टोला

■मुंबई,ता.२८-

एका बाजूला आघाडी बनवत असल्याचे चित्र निर्माण करायचे आणि दुसऱ्या बाजूला आम्हालाच पाडण्याचा कट रचायचा. तुम्ही नेमके कोणते नाते निर्माण करत आहात. तुमचे विचार पहाता वंचित आघाडीच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रकार असल्याचा टोला प्रकाश आंबेडकर यांनी संजय राऊत यांना लगावला.

शिवसेना उबाठा गटाने लोकसभेच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर वंचित बहुजन आघाडीने ही नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यामुळे महाविकास आघाडीमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आले आहेत. तसेच वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे.

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीने यादी जाहीर केल्यानंतर शिवसेना उबाठा गटाचे नेते आणि राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, प्रकाश आंबेडकर यांना आम्ही अकोल्यासह पाच जागा देण्यास तयार झालो होतो. आज जर चर्चा पुढे गेली असती तर सहावी जागाही कदाचित त्यांना दिली असती. हे आम्ही तीन पक्षांनी ठरवले होते. काहीही झाले तरी प्रकाश आंबेडकर यांना आपल्याबरोबर घ्यायचे असे आम्ही ठरवले होते.

दरम्यान, संजय राऊत सातत्याने दावा करत आहेत की आम्ही (मविआ) वंचितला आमच्याबरोबर घेण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. तसेच प्रकाश आंबेडकर यांच्याबद्दल आमचा विश्वास आहे. आमचे आणि त्यांचे विचार सारखेच आहेत. आम्हाला देशाचे संविधान वाचवायचे आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे भाजपाला मदत होईल असे वागणार नाहीत. आमची प्रकाश आंबेडकरांशी अजूनही चर्चा चालू आहे. संजय राऊत अजूनही आघाडी मजबूत (पान २ वर)

वळसे-पाटील घरात पाय घसरून पडले

शस्त्रक्रिया करावी लागणार

■पुणे,ता.२८-

मंत्री दिलीप वळसे-पाटील घरातच पाय घसरुन पडल्याने त्यांना दुखापत झाली आहे.

वळसे-पाटील यांच्या खुब्याला मार आणि हात फ्रॅक्चर झाला आहे.पुण्यातील एका खाजगी रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात येणार आहे. याच रुग्णालयात त्यांच्यावर शस्त्रक्रिया (पान २ वर)

रमजान - १८	
इफ्तारी	६ : ५१
सहरी	५ : ०९

आजचे तापमान
इचलकरंजी
किमान - ३८°
कमाल - २५°

सोने प्रति तोळा	चांदी प्रति किलो
६६,९५० रु.	७४,५०० रु.

अंडी ४५५ रुपये शेकडा

हास्यतुषार -सुरेंद्र दास

काही मंडळी जिंकण्यासाठी उभा रहात नाहीत तर पाडापाडीच राजकारण करण्यासाठीच ते उभे रहातात हे एक कुजक राजकारणच ना!

सोलापुरात साडेपंधरा लाखाचा गांजा जप्त

सोलापूर शहर गुन्हे शाखेची कारवाई

■पंढरपूर,ता.२८(प्रतिनिधी)-

सोलापुरमध्ये अजित सुखदेव जगताप याचे स्वराज विहार या राहत्या घरात तसेच त्याचे मु.पो.सोहाळे,ता.मोहोळ येथील घरात सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून सुमारे १५ लाख ५० हजार ३८० रुपये किंमतीचा ७७ किलो ५२१ ग्रॅम गांजाचा साठा जप्त केला. याप्रकरणी गुन्हा दाखल करुन अजित जगताप यास अटक केली आहे.

सोलापूर शहरात अंमली पदार्थांचे अवैध विक्रीबाबत माहिती काढत असताना गुन्हे शाखेकडील पोसई अल्फाज शेख यांना गोपनिय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली. अजित जगताप हे त्यांच्या घरातून गांजा विक्रीचा धंदा करीत आहेत. तसेच त्यांचे दोन्ही घरामध्ये गांजाचा साठा आहे अशी बातमी मिळाली. त्यानंतर एन.डी.पी.एस.कायद्यातील तरतुदीप्रमाणे सहायक (पान २ वर)

सायझिंगला आग;१७ लाखाचे नुकसान

■इचलकरंजी,ता.२८-

येथील स्टेशन रोडवरील सायझिंगमध्ये शॉर्टसर्कीटने भीषण आग लागली. या घटनेत सुताचे कोन, बिम, विद्युत मोटारी आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. यामुळे सुमारे १७ लाखाचे नुकसान झाले आहे. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे.

आग विझविताना अग्निशामक दलाचे कर्मचारी. (छाया- मयूर चिंदे)

येथील स्टेशन रोडवर राजेंद्र साखरपे यांच्या मालकीची अथर्व सायझिंग आहे. या सायझिंगमध्ये बुधवारी शॉर्टसर्कीटची ठिणगी पडून आग लागली. त्यामुळे कामगारांनी तत्परतेने अग्निशमन दलाला पाचारण केले. मात्र सायझिंगमध्ये सुताचे कोन, बिमे यासह ज्वलनशिल वस्तु असल्याने बघता बघता आगीने रौद्ररुप धारण केले. महापालिकेचा आणि पंचगंगा साखर कारखान्याच्या अग्निशमन दलाने २ तास पाण्याचा मारा करत ही आग आटोक्यात आणली. या घटनेत सुताचे कोन, बिमे आणि विद्युत मोटारी जळाल्याने सुमारे १७ लाखाचे नुकसान झाले आहे.

निगेटिव्ह सर्व्हेच्या नावाखाली

भाजपकडून शिवसेनेच्या जागा घेण्याचा प्रकार

■मुंबई,ता.२८(प्रतिनिधी)-

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील नेत्यांना आतापासून विधानसभेच्या जागा आणि स्वत:ला उमेदवारी मिळेल की नाही अशी चिंता लागली आहे. भाजपकडून निगेटिव्ह सर्व्हेच्या नावाखाली शिवसेनेचे मतदारसंघ स्वत:कडे घेतले जात आहेत. लोकसभेलाच खच्चीकरण होत असले तर विधानसभेच्या निवडणुकीत आपल्या पक्षाचे काय होणार, अशी भीती आता अनेकांना वाटू लागल्याची चर्चा असून आमदारांमध्ये अस्वस्थता आहे.तसेच महत्त्वाच्या निर्णयात इतर नेत्यांना डावलले जात असल्याची संतप्त भावनाही शिवसेनेच्या नेत्यांमध्ये असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

लोकसभेच्या काही मतदारसंघांवरून (पान २ वर)

चेन्नई सुपर किंग्जच्या चाहत्यांवर हल्ला

■कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

आयपीएलच्या सामन्यात रोहित शर्मा बाद झाल्यानंतर चेन्नई सुपर किंग्जच्या चाहत्याने आनंद व्यक्त केला. या रागातून मुंबईच्या दोन चाहत्यांनी चेन्नई सुपर किंग्जच्या चाहत्यावर जीवघेणा हल्ला केला. बुधवारी (दि. २७) रात्री पावणेदहाच्या सुमारास हणमंतवाडी (ता.करवीर) येथे हा प्रकार घडला.

सीएसकेचे चाहते बंडोपंत बापूसो तिबिले (वय ६३, रा.हणमंतवाडी) हे गंभीर जखमी झाले. याप्रकरणी बळवंत महादेव झांजगे (वय ५०) आणि सागर सदाशिव झांजगे (वय ३५, दोघे रा.हणमंतवाडी) यांना करवीर पोलिसांनी अटक केले.

करवीर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री सनराईज हैद्राबाद आणि मुंबई इंडीयन्स या यादोन संघामध्ये सामन सुरु होता. बळवंत झांजगे आणि सागर झांजगे हे इतरांसोबत गल्लीतील एका घरात आयपीएलचा सामना पाहत होते. हे दोघेही मुंबई इंडियन्सने चाहते असून, हैदराबाद संघाने धावांचा डोंगर उभा केल्याने ते रागात होते. रोहित शर्मा बाद होताच चेन्नई सुपर किंग्जचे चाहते बंडोपंत तिबिले तिथे पोहोचले. 'रोहित शर्मा गेला. आता मुंबई कशी जिंकणार?' असे म्हणत ते चेन्नई संघाचे कौतुक करू लागले. याचा राग आल्याने बळवंत झांजगे यांनी तिबिले यांच्या डोक्यात काठीने मारहाण केली. त्याचवेळी सागर याने डोक्यात फळी घातल्याने तिबिले जागीच बेशुद्ध पडले. खासगी रुग्णालयात प्रथमोपचार केल्यानंतर त्यांना सीपीआरमध्ये दाखल केले. मात्र, डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांची (पान २ वर)

मुंबई इंडियन्स पराभूत झाल्याने कृत्य

शिवतारेंचे बंड झाले थंड

शिंदे,फडणवीस,अजित पवार यांनी समजूत काढली

■मुंबई,ता.२८(प्रतिनिधी)-

बारामती लोकसभा मतदारसंघात पवार कुटुंबियांच्या विरोधात दंड थोपटून मैदानात उतरलेल्या शिवसेना शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांचा राग मावळला आहे. बुधवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा शासकीय बंगल्यावर शिवतारे यांच्याशी महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी चर्चा केली.यात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा

समावेश होता.या बैठकीत शिवतारे यांच्या आक्षेपावर चर्चा करुन त्यांची समजूत काढली असल्याचे सांगण्यात येत आहे.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून बारामतीत सुनेत्रा पवार यांनी प्रचार सुरु केला आहे. तर सुप्रिया सुळेंही मतदारसंघात फिरत आहेत.अशातच पवार यांचे राजकीय प्रतिस्पर्धी विजय शिवतारे यांनी गेल्या १५ दिवसांपासून बारामती लोकसभा मतदारसंघात प्रचारला सुरुवात केली होती.दोन्ही पवारांना पाडण्याची हीच संधी असल्याचे सांगत, त्यांनी पवार विरोधकांची मोट बांधण्याचाही प्रयत्न चालवला (पान २ वर)

(पान १ वरून)

माने,मंडलिकना उमेदवारी

(शिंदे गट), हिंगोली-नागेश पाटील आष्टीकर (उबाठा) विरुद्ध हेमंत पाटील (शिंदे गट), मावळ-संजोग वाघेरे (उबाठा) विरुद्ध श्रीरंग बारणे (शिंदे गट).

आतापर्यंत कुणाचे किती उमेदवार- राज्यातील लोकसभेच्या ४८ जागांसाठी भाजपने सर्वाधिक २४ उमेदवार जाहीर केले आहेत. त्यानंतर काँग्रेसने १२ शिवसेना ठाकरे गटाने १७ तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीने २ उमेदवार जाहीर केले आहेत. त्याशिवाय प्रकाश आंबेडकर यांनी नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली.

अधिसूचना जारी

आसाम ५,बिहार ५,छत्तीसगड ३, जम्मू-काश्मिर १, कर्नाटक १४, केरळ २०, मध्यप्रदेश ७, महाराष्ट्रात ८, राजस्थान १३, त्रिपुरा १, उत्तर प्रदेश ८, पश्चिम बंगालमधील ३ आणि मणिपूरच्या एका मतदारसंघाचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यातील जागांसाठी गुरूवारपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याठिकाणी आगामी २६ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्याचे मतदान होणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ४ एप्रिल अखेरची तारीख आहे. तर ८ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील अकोला, अमरावती, बुलढाणा, हिंगोली, नांदेड, परभणी, वर्धा आणि यवतमाळ-वाशिम मतदारसंघात मतदान होणार आहे.

बंड झाले थंड

होता.शिवतारेंच्या एन्ट्रीमुळे बारामतीत महायुतीच्या उमेदवाराला फटका बसण्याची शक्यता होती.शिवतारेंनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेनंतर दोन वेळा मुंबईतील वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र दोन्ही वेळी शिवतारेंची आक्रमक भूमिका कायम होती.अखेरीस बुधवारी रात्री मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शिवतारेंची समजूत काढण्यात आली आहे.

पाय घसरून पडले

पार पडणार आहे.लोकसभेच्या निवडणुकीत त्यांची महत्वाची भूमिका आहे. मात्र ऐन लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडावरच त्यांचा अपघात झाला आहे. याबाबत त्यांनी ट्विट करुन माहिती दिली आहे. बुधवारी रात्री घरात पडल्यामुळे मला फ्रॅक्चर झाले असून डॉक्टरांच्या सल्ल्याने पुढील उपचार सुरू आहेत.काही काळ पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.लवकरच बरा होऊन आपल्या समवेत सामाजिक कामात सक्रिय होईन असे त्यांनी ट्विटमध्ये लिहिले आहे.

लोकसभेच्या निवडणुका तोंडावर आहेत.महायुतीचे उमेदवार अजून जाहीर झाले नाहीत.बारामती,मावळ आणि शिरुर या तिन्ही लोकसभा मतदारसंघात उमेदवार कोण असा चर्चा सुरु आहे.अजित पवार गटातून या लोकसभा मतदारसंघात उमेदवार देण्यात येणार आहेत.या तिन्ही लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी पक्षाचे तगडे नेते म्हणून वळसे पाटील यांच्यावर आहे.मात्र ऐन निवडणूक तोंडावर आली असताना आणि प्रचार सुरु करायच्या आधीच वळसे पाटील यांचा अपघात झाला आहे.त्यामुळे वळसे-पाटील यांना आता घरातूनच सुत्रे हलवावी लागण्याची शक्यता आहे.शिरुर लोकसभा मतदारसंघातून आढळराव पाटील यांना उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे.त्यातच आढळराव पाटील यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. या मतदारसंघाची वळसे पाटील यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. शिवाय अमोल कोल्हेंना पराभूत करण्यासाठी अजित पवार गटातील प्रत्येक नेत्याने शिरुरकडे लक्ष केंद्रीत केले आहे.

शिंदे गटात प्रवेश

आवडणारे आणि सर्वच समाजात लोकप्रिय असलेले गोविंदा यांचे मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांना शुभेच्छा देतो. गोविंदा यांना संसदीय कामकाजाचा अनुभव आहे, त्यांचा मुंबईतल्या कोणत्या मतदारसंघात विचार होऊ शकतो, या प्रश्नाचे उत्तर देताना शिंदे म्हणाले, ते निवडून आणण्याचे काम करणार आहेत. कलावंत आहे, कलाकाराचा कधी अपमान करु नये. माणसाचे दिवस कधी फिरतात, ते माहित पडत नाही. एका कलाकाराचा अपमान म्हणजे संपूर्ण चित्रपटसृष्टीचा अपमान आहे. जे बोललेत त्यांना भोगावे लागेल. काल विजय शिवतारे आले होते. त्यावेळी दोन्ही उपमुख्यमंत्री तिथे होते. शिवतारे यांनी सांगितले, पक्षाचा आदेश माझ्यासाठी अंतिम आहे. त्यामुळे मी त्यांना धन्यवाद करतो, असेही शिंदे म्हणाले.

वंचितच्या पाठीत खंजीर खुपसला

असल्याचा दावा करत असतानाच वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी थेट संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये संजय राऊत वंचित बहुजन आघाडीच्या पाठीत चाकू खुपसत आहेत असे चित्र दिसते. या फोटोसह प्रकाश आंबेडकर यांनी संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला आहे. आंबेडकर यांनी म्हटले आहे की, संजय राऊत, तुम्ही किती खोटं बोलणार? तुम्ही म्हणताय की तुमचे आणि आमचे विचार एकसारखे आहेत तर मग तुमच्या बैठकांमध्ये तुम्ही आम्हाला का बोलवत नाही? ६ मार्च रोजी फोर सीझन्स हॉटेलमध्ये झालेल्या बैठकीनंतर तुम्ही आमच्या कोणत्याही प्रतिनिधीला आमंत्रित का केले नाही? तुम्ही आजही वंचितला आमंत्रित न करता बैठक बोलावली आहे, आमच्याशिवाय बैठक का करताय?

प्रकाश आंबेडकर संजय राऊत यांना उद्देशून म्हणाले, तुम्ही तर मित्राच्याच पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले आहे. सिल्व्हर ओकवर झालेल्या बैठकीत तुम्ही काय भूमिका घेतली होती ते आम्हाला माहिती आहे. अकोल्यात आमच्याविरोधात उमेदवार उभा करण्याबाबत तुम्ही मुद्दा उपस्थित केला होता हे खरं नाही का? असा सवालही त्यांनी शेवटी उपस्थित केला आहे.

शिवसेनेच्या जागा घेण्याचा प्रकार

महायुतीमध्ये अजूनही वाद आहेत. ठाणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, अमरावती यांसह आणखी काही मतदारसंघांत शिवसेना आणि भाजप आमनेसामने आहेत. काल अमरावतीतून भाजपने नवनीत राणांना तिकिट जाहीर केले. त्यानंतर शिवसेनेचे नेते आनंदराव अडसूळ आणि त्यांचा मुलगा अभिजीत यांनी बंडाचा पवित्रा घेतला आहे. छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि ठाण्यातही भाजपच्या नेत्यांनी जोर लावला आहे. या मतदारसंघात निगेटिव्ह सर्व्हेची चर्चा आहे. त्याचा हवाला देत भाजपकडून शिवसेनेचे खच्चीकरण केले जात असल्याचा आरोप शिंदे गटाच्या नेत्यांकडून केला जात आहे.

भाजपकडून शिवसेनेच्या खासदारांची तिकिटे कापली जात असल्याने शिवसेना पक्षात अंतर्गत नाराजीचा सूर उमटू लागला आहे. शिवसेनेच्या जागा अप्रत्यक्षपणे स्वत:कडे घेत खच्चीकरण करत असल्याची पक्षातील नेत्यांमध्ये चर्चा आहे. भाजपकडून अशी वागणूक मिळत असल्याने शिवसेनेच्या आमदारांना विधानसभेची चिंता वाटू लागल्याची चर्चा आहे.

निवडणूक लढेल असे स्वप्नातही वाटले नव्हते-सुनेत्रा पवार

■ पुणे,ता.२८–

मला कधी स्वप्न पडले नव्हते की,मी निवडणुकीला उभी राहीन आणि तुम्ही मला मतदान कराल.मी केवळ माझ्या समाधानासाठी काटेवाडीकरांसाठी काम केले.त्यामुळे माझी तुमच्या कोणाकडूनही काही अपेक्षा नाही.तुम्ही जे आजपर्यंत प्रेम दिले तेच माझ्यासाठी खूप आहे, अशा शब्दात बारामती टेक्सटाईल पार्कच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी स्वत:च आपल्या उमेदवारीचे सुतोवाच केले.काटेवाडी येथे गाव संपर्क दौऱ्यानिमित्त सुनेत्रा पवार यांनी काटेवाडी ग्रामस्थांशी संवाद साधला.

लोकसभा विधानसभा या निवडणुका दर पाच वर्षांनी होतच असतात. मात्र, वावेळीची निवडणूक वेगळी आहे.मात्र,काटेवाडीकरांना चांगले ठाऊक आहे. आपल्याला कुठे जायचे आहे.आपल्यासाठी काय भले आणि काय बुरे आहे याची देखील कल्पना तुम्हाला आहे. त्यामुळे मला काही तुम्हाला जास्त फोड करून सांगण्याची आवश्यकता नाही.तुम्ही माझ्या घरातील माणसे आहात.फक्त मी एवढेच सांगेन की, घड्याळ तेच आहे.मात्र,वेळ नवी आहे,असे सांगून सुनेत्रा पवार यांनी अप्रत्यक्षपणे काटेवाडीकरांना आपल्या पाठीशी उभे राहण्याची विनंती केली.

चाहत्यांवर हल्ला

(पान १ वरून)

प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. याबाबत जखमी बळवंत तिबिले यांचे भाऊ संजय बापूसो तिबिले यांनी करवीर पोलिसात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी दोन्ही संशयितांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. क्रिकेटच्या सामन्यादरम्यान किरकोळ कारणावरून दोन संघांच्या चाहत्यांमध्ये झालेल्या मारहाणीच्या घटनेने पोलिसही चक्रावले आहेत.

तिकीट नाकारल्यामुळे विष प्राशन केलेल्या खासदाराचा मृत्यू

■ चेन्नई,ता.२८–

तामिळनाडू येथील एमडीएमके (वायको) पक्षाचे खासदार ए.गणेशमूर्ती यांनी तिकीट न मिळाल्याने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली.खा.ए.गणेश मूर्ती यांनी रविवारी २४ मार्च रोजी विष प्राशन केले होते. त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू असताना गुरुवारी त्यांची प्राणज्योत मालवली.मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते.

दिवंगत ए.गणेशमूर्ती हे एमडीएमकेचे (वायको पक्ष) तामिळनाडूच्या इरोड मतदारसंघातील खासदार होते.पक्षाने त्यांना उमेदवारी नाकारल्याने ते नाराज होते.वयामुळे नैराश्यात त्यांनी रविवारी किटकनाशक पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला होता. इरोड येथे प्रथमोपचारानंतर त्यांना कोईम्बतूरच्या रुग्णालयात हलवण्यात आले.गणेशमूर्ती अत्यवस्थ असल्यामुळे त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते.मात्र, गुरुवारी पहाटे ५ वाजता उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. गणेशमूर्ती २०१९ मध्ये डीएमकेच्या उगवत्या सूर्य निवडणूक चिन्हावर खासदार म्हणून निवडून आले होते.त्यांनी वायूर्वी १९९८ मध्ये पलानी आणि २००९ मध्ये इरोड मतदारसंघातून लोकसभा निवडणूक जिंकली होती.

मारुमलार्ची द्रविड मुनेत्र कळघम (एमडीएमके) पक्षाने वंदा सत्ताधारी द्रविड मुनेत्र कळघम (डीएमके) सोबत युती केली आहे. दोन्ही पक्षांनी अलीकडेच एमडीएमकेचे सरचिटणीस दुराई वायको यांचा मुलगा दुराई वायको यांना इरोडमधून उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला.पक्षाच्या कोअर टीमने बराच विचारविनिमय केल्यानंतर दुराई यांना लोकसभा निवडणुकीत उतरवण्याचा निर्णय घेतल्याचे वायको यांनी रविवारी सांगितले होते.पक्षाने तिकीट कापल्यामुळे ए.गणेशमूर्ती यांनी रविवारी विष प्राशन केले. या प्रकरणी इरोड पोलिसांनी वापूर्वीच आत्महत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.

पुण्यात काँग्रेसला स्वकीयांचाच धोका; केंद्रीय पथक दाखल

■ पुणे,ता.२८–

पुणे लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसने कसब्याचे आमदार रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी देऊन कसब्याचा निकालाची पुनरावृत्ती करण्याची तयारी केली असतानाच पक्षांतर्गत नाराजी अद्यापही दूर झालेली नसल्याचे चित्र आहे.पुण्यातून काँग्रेसला विजयाची आशा वाटत असताना स्वाकीयांकडूनच धोका असल्याचे लक्षात आल्यावर याची गंभीर दखल केंद्रीय पातळीवरून घेण्यात आली आहे.केंद्रातून काँग्रेसने खास निरीक्षक पथक पुण्यात पाठवले असून या पथकाकडून आता विरोधकांच्या हालचालींपेक्षा पक्षांतर्गत स्वकीयांवर लक्ष ठेवण्याची वेळ काँग्रेसवर आली आहे.

काँग्रेसचा उमेदवार जाहीर झाल्यानंतर अद्यापही प्रमुख पदाधिकाऱ्यांचे मनोमिलन होत नसल्याची बाब आता केंद्रीय पातळीवर पोहोचली आहे. काँग्रेसमध्ये इच्छुक उमेदवारांची संख्या जास्त होती.त्यामुळे पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली आहे.आमदार धंगेकर यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतरही प्रचारासाठी प्रमुख पदाधिकारी मनापासून एकत्र येत नसल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर काँग्रेसच्या केंद्रीय पातळीवरून याची दखल घेण्यात आली आहे.

त्यासाठी विशेष निरीक्षक पथक तयार करण्यात आले आहे.या पथकाकडून काँग्रेसचा उमेदवार निवडून येण्यासाठी कोणकोणत्या घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, याची माहिती संकलित करून ती केंद्रीय पातळीवर पाठवली जाणार आहे. त्यानंतर केंद्रीय पातळीवरून येणाऱ्या सूचनांनुसार स्थानिक पातळीवरील काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना काम करावे लागणार असण्याचे काँग्रेसच्या गोटातून सांगण्यात आले.

काँग्रेसच्या रश्मी बर्वेंचा उमेदवारी अर्ज अवैध

■ नागपूर, ता.२८ –

रामटेक लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार रश्मी बर्वे यांचा उमेदवारी अर्ज जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी अवैध ठरवला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. तर माजी मंत्री सुनील केदार यांच्यासाठी देखील हा मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे.

रामटेक लोकसभा मतदारसंघाची निवडणूक ही अत्यंत चुरशीची होईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. कारण, महायुतीकडून राजू पारवे तर महाविकास आघाडीने रश्मी बर्वे यांना रिंगणात उतरवले होते. रश्मी बर्वे यांच्याकडून राजू पारवे यांना कडवे आव्हान मिळेल, असे बोलले जात होते. मात्र, निवडणूक उमेदवारी अर्जाच्या छाननीत रश्मी बर्वे यांचा अर्ज अवैध ठरला. मिळालेल्या माहितीनुसार, सामाजिक न्याय विभागाकडे रश्मी बर्वे यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या विरोधात तक्रार करण्यात आली होती. त्या तक्रारीवरून जात पडताळणी समितीला प्रत्यक्षपणे आदेश देण्यात आले होते. रामटेक लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार रश्मी बर्वे यांचा अर्ज बाद झाल्याने रामटेकमधून आता त्यांचे पती श्यामकुमार बर्वे यांना उमेदवारी मिळू शकते.

भरत आरगे यांचे निधन

■ इचलकरंजी,ता.२८–

मंगलधाम परिसरातील प्रतिष्ठीत नागरिक भरत कल्लाप्पा आरगे यांचे बुधवार दि.२७ रोजी निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

उमेदवार मी आहे माझ्याशी भिडा

आ.प्रणिती शिंदे यांचा सातपुतेंवर निशाणा

■ पंढरपूर,ता.२८(प्रतिनिधी)–

सोलापूर लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून मी उभा राहिलेली आहे. सुशीलकुमार शिंदे साहेब नाहीत. त्यामुळे तुम्हाला जर भिडायचं असेल तर प्रतिस्पर्धी उमेदवार म्हणून माझ्यासोबत भिडा, माझ्या वडिलांवर काय आरोप करता अशा शब्दात महाविकास आघाडीच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांनी भाजपचे उमेदवार राम सातपुते यांच्यावर निशाणा साधला आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या वतीने काँग्रेस आमदार प्रणिती शिंदे यांना उमेदवारी देण्यात आलेली आहे. त्या पार्श्वभूमीवर वडाळा येथे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

त्या मेळाव्यात आमदार प्रणिती शिंदे यांनी भाजप उमेदवार राम सातपुते आणि भाजपवर सडकून टीका केली. यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष काका साठे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नंदकुमार पवार, शहराध्यक्ष चेतन नरोटे यांचेसह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार शिंदे म्हणाल्या, माता जिजाऊ, अहिल्यादेवी यांचे संस्कार घेऊन सुप्रिया सुळे आणि मी भाजपसारख्या शत्रू विरोधात लढत आहोत. दुसरीकडे सुशीलकुमार शिंदे साहेब आणि शरद पवार साहेब वयाच्या ८३ व्या वर्षी लोकशाही संपवायला निघालेल्या भाजपच्या विरोधात खंबीरपणे लढा देत आहेत. असे असतानाही भाजपकडून त्यांच्यावर टीका करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र हे दोन्ही ज्येष्ठ नेते महाराष्ट्राच्या जनतेसाठी लढा देत असताना भाजपकडून त्यांच्यावर जे आरोप केले जात आहेत यातून त्यांचे संस्कार दिसत असल्याची टीका यावेळी शिंदे यांनी केली आहे.

भाजपचे जे उमेदवार माझ्या विरोधात उभे राहिले आहेत त्यांना जनता पार्सल असे संबोधते, असा टोलाही त्यांनी राम सातपुते यांचे नाव न घेता लगावला. तसेच निवडणुकीसाठी मी उमेदवार म्हणून उभी आहे. तुमच्यात हिंमत असेल तर तुम्ही माझ्याशी भिडा, वडिलांवरती काय आरोप करता? आणि ज्या माणसाने सोलापूरकरां साठी संघर्ष केला तो अवघ्या सोलापूरकरांना माहिती आहे तर तुम्ही त्यांना कसले प्रश्न विचारता? निवडणुकीत मी उमेदवार आहे. मी लोकांची कामे केली म्हणूनच आमदार झाले, तो पण एक संघर्ष होता. तर जर तुम्ही त्याला संघर्ष मानत नसाल तर तो माझा मतदारसंघातील मतदारांचा अपमान असल्याचे म्हणत आमदार प्रणिती शिंदे यांनी जोरदार हल्लाबोल केला.

सोलापूरात साडेपंधरा लाखाचा गांजा जप्त

(पान १ वरून)

पोलीस आयुक्त गुन्हे श्रीमती प्रांजली सोनवणे सोलापूर शहर यांचे आदेशाप्रमाणे सपोनि संजय क्षिरसागर, पोसई अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकाने अजित जगताप याचे स्वराज विहार, सोलापूर आणि मु.पो. सोहाळे, ता.मोहोळ येथील राहते घराची झडती घेतली. दोन्ही घरात एकूण ७७.५२१ किलोग्रॅम गांजा मिळून आला. त्याची किंमत १५ लाख ५० हजार ३८० रुपये आहे. सदरचा गांजा जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अजित जगताप यास अटक करुन त्यास न्यायालयात हजर केले असता २ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||

कै. भरत कल्लाप्पा आरगे

आमचे वडिल श्री. भरत कल्लाप्पा आरगे यांचे बुधवार, दि. २७ मार्च २०२४ रोजी आकस्मिक निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो!

समस्त आरगे, खोtill, डांगे परिवार
दिपक कँडल्स, इचलकरंजी.

रक्षाविसर्जन : आज दि. २९ रोजी पंचगंगा स्मशानभूमी येथे सकाळी ८.३० वाजता

|| पाचवे पुण्यस्मरण ||

कै.मलगोंडा यलगोंडा तथा एम. वाय. पाटील (बेनाडे)

सहवास जरी सुटला,
स्मृती सुगंध देत राहील
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर,
आठवण तुमची येत राहील.
कै. श्री. मलगोंडा यलगोंडा तथा एम. वाय. पाटील (बेनाडे) यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र आदरांजली!

निरंजनकुमार पाटील, तेवगोंडा पाटील
विजयकुमार पाटील
समस्त पाटील (बेनाडे) परिवार,चंदूर.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||

कै. भरत कल्लाप्पा आरगे

जयभवानी व्यायाम मंडळाचे जेष्ठ सभासद व मार्गदर्शक
श्री. भरत कल्लाप्पा आरगे यांचे बुधवार, दि. २७ मार्च २०२४ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

बाळासो कलागते - माजी उपनगराध्यक्ष इ.न.पा.
राजेंद्र बचाटे * राजू कुडचे * गजानन अब्दागीरे
मधुकर शेळके * राजेंद्र नेमिष्टे * राजेंद्र जोंग
जयभवानी महिला मंडळ
जयभवानी व्यायाम मंडळ, सर्व कार्यकर्ते

रक्षाविसर्जन : आज शुक्रवार दि. २९ रोजी सकाळी ८.३० वा.
पंचगंगा नदीतिरी व उत्तरकार्य : दुपारी १२ वा. राहते घरी आहे.

|| प्रथम पुण्यस्मरण ||

स्व. सौ. रमा शशांक बावचकर
आमच्या स्नेही
सौ. रमा शशांक बावचकर
यांच्या प्रथम पुण्यस्मरणदिनी
भावपूर्ण श्रद्धांजली!

सुभाष विठ्ठल सावनुरे
सावनुरे परिवार, इचलकरंजी.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||

कै. श्री. महादेवराव गोपाळ काटकर
मा. नगरसेवक

आमचे व्याही,
कै. श्री. महादेवराव गोपाळ काटकर
यांचे सोमवार, दि. २५/०३/२०२४ रोजी निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

जयवंतराव जोती चव्हाण बाजीराव जोती चव्हाण
(माजी महापौर, कोल्हापूर महानगरपालिका)

समस्त चव्हाण परिवार, शिवाजी पेठ, कोल्हापूर.

राहुल आवाडे 'मशाल' हातात घेण्याच्या तयारीत

दोन दिवसात वरिष्ठांशी चर्चा करून भूमिका जाहीर करणार

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राहुल आवाडे हे शिवसेनेची मशाल हातात घेण्याच्या तयारीत आहेत. येत्या दोन दिवसांत ते 'मातोश्री'वर जाऊन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेणार आहेत. त्यामुळे हातकणंगले मतदारसंघात तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

गेल्या दोन निवडणुकांपासून आपण तयारी करत आहे, पण प्रत्येकवेळी वरिष्ठांकडून थांबवले जाते. किती दिवस दुसऱ्यांच्या विजयासाठी राबायचे. आता कोणत्याही परिस्थितीत माघार नाही, राहुल आवाडे यांनी हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरावे अशी जाहीर मागणी ताराराणी आघाडी आणि आवाडे गटाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनीही गुरुवारी केली.

शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) ही जागा लढवायची ठरविली तर प्रसंगी त्यांची मशाल हातात घ्या, पण निवडणूक लढवा असा दबावच पदाधिकाऱ्यांनी आवाडे यांच्यावर आणला. कार्यकर्त्यांच्या भावनांचा विचार लक्षात घेत येत्या दोन दिवसांत (शुक्रवारपर्यंत) वरिष्ठांची चर्चा करुन पुढील भूमिका जाहीर करु, असा शब्द आमदार प्रकाश आवाडे यांनी पदाधिकाऱ्यांना दिला. हातकणंगले लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसंदर्भात पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेण्यासाठी आवाडे गटाने कोल्हापुरातील ईर्ष्कर कॉलनीतील निवासस्थानी गुरुवारी प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

या बैठकीत 'आता माघार नाही, लढा'च असा सूर उमटल्याने धैर्यशील माने यांच्यासमोरील अडचणी वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान पदाधिकाऱ्यांची बैठक सुरु असतानाच शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख संजय पवार यांनी आमदार प्रकाश आवाडे यांची भेट घेतल्याने आवाडे गट मशाल हातात घेण्याच्या चर्चेला अधिक बळ मिळाले.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळावी यासाठी राहुल आवाडे गेल्या दोन वर्षांपासून तयारी करत आहेत. इचलकरंजीमधून अपक्ष आमदार असलेल्या प्रकाश आवाडे यांनी भाजपला पाठिंबा दिला आहे. मात्र, हातकणंगले लोकसभा मतदारसंघ शिवसेनेकडे (शिंदे गटाकडे) असल्याने तो भाजपने घ्यावा यासाठी आवाडे प्रयत्नशील होते. त्यातच खासदार माने यांच्यावर जनतेचा नाराज असल्याचे सांगत आमदार आवाडे यांनी खदखद व्यक्त केली होती. आवाडे यांच्या जाहीर मागणीनंतरही उमेदवारी धैर्यशील माने यांना दिल्याने आवाडे गट महायुतीपासून फारकत घेत वेगळी चूल मांडण्याच्या तयारीत आहे. त्या पार्श्वभूमीवरच गुरुवारी तातडीची बैठक घेण्यात आली.

इचलकरंजी : वाढत्या उष्म्याने नागरीक हैराण झाले आहेत. दुपारच्या सुमारास रस्त्यावर शुकशुकाट दिसून येत असून वाढत्या उष्म्यापासून दिलासा मिळावा यासाठी, टोपी व कलिंगड खरेदीसाठी नागरीकांची गर्दी दिसून येत आहे. (छाया. - मयूर चिंदे)

इचलकरंजी - महायुतीकडून हातकणंगले लोकसभा मतदार संघामधून विद्यमान खासदार धैर्यशील माने यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर माने समर्थकांनी इचलकरंजी शहरातून मोटरसायकल रॅली काढली तसेच विविध चौकांमध्ये फटाक्यांची आतषबाजी करून आनंद उत्सव साजरा केला त्याचे टिपलेले छायाचित्र.

वस्त्रोद्योगातील अभूतपूर्व मंदीमुळे

इचलकरंजीतील २५ ते ३० टक्के साधे यंत्रमाग बंद

इचलकरंजी,ता.२८-

गेल्या काही दिवसांपासून मंदीच्या छायेत असलेल्या यंत्रमाग व्यवसायावर बंदची कु-हाड कोसळत चालली आहे. कापडाला म्हणावी तशी मागणी तसेच दर मिळकत नसल्याने शहरातील २५ ते ३० टक्के यंत्रमाग बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे वस्त्रोद्योग व्यवसायामध्ये एक विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे.

शेती खालोखाल रोजगार मिळवून देणारा व्यवसाय म्हणून वस्त्रोद्योगाकडे पाहिले जाते. मात्र गेल्या काही वर्षांपासून विविध कारणामुळे वस्त्रोद्योग व्यवसायामध्ये मोठी मंदी आली आहे. व्यवसाय आज सुधारेल, उद्या सुधारेल या आशेवर अनेक यंत्रमागधारक नुकसानीमध्ये व्यवसाय करत आहेत. तसेच शासनानेही या उद्योगाला नव्याने लागू केलेले ५५ दिवसांची पेमेंटधारा उत्पादकांसाठी चांगले असल्याचे व्यवसायिकांतून बोलले जात आहे. पेमेंटधारेची एकंदरीत प्रक्रिया सध्यातरी किचकट असल्याचा आरोप होत आहे. तेवढा उत्पादकांबरोबर व्यापाऱ्यांनी या पेमेंटधारेची अंमलबजावणी करणे योग्य असल्याचे बोलले जात आहे.

राज्य शासनाने २७ एच.पी.वरील यंत्रमागधारकांना ७५ पैसे आणि २७ एच.पी. खालील यंत्रमागधारकांना १ रुपये अतिरिक्त वीज सवलतीची अंमलबजावणी सुरू केली आहे. मात्र शासनाकडून सदर सवलती मिळण्यासाठी १६ पानांचा फॉर्म भरण्याचे अनिवार्य केले आहे. मात्र हे फॉर्म किचकट असल्याने 'भिक नको कुत्रे आवर' अशी अवस्था कारखानदारांची झाली आहे. त्यामुळे फॉर्म भरण्याची किचकट प्रक्रिया रद्द करावी, अशी मागणी कारखानदारांतून होत आहे.

नवसंजीवनी द्यावी, अशी मागणी वारंवार केली जात आहे.

मात्र केंद्र सरकार व राज्य सरकार म्हणावे तसे लक्ष देत नाही. नुकसानीत किती दिवस व्यवसाय सुरू ठेवायचा या विचाराने अनेक कारखानदारांनी आपले यंत्रमाग बंद ठेवणे पसंत केले आहे. तसेच सुताचे भावही तेजी मंदीचे हेलखावे खात असल्याने त्याचाही विपरीत परिणाम दिसून येतो. एकंदरीत यंत्रमाग व्यवसायापुढे मोठे संकट निर्माण झाले असून शहर परिसरातील २५ ते ३० टक्के यंत्रमाग बंद असल्याचे कारखानदारांतून बोलले जात आहे. तसेच अॅटोलूमधारकांचीही अशीच परिस्थिती दिसून येत आहे.

यंत्रमाग व्यवसायामध्ये आलेल्या अभूतपूर्व मंदीमुळे शहर परिसरातील २५ ते ३० टक्के यंत्रमाग व्यवसाय बंद आहेत. त्याचा विपरीत परिणाम सायझिंग व्यवसायावर दिसून येत असून अनेक सायझिंगधारकांनी आपले उत्पादन कमी केले आहे. अशी परिस्थिती भविष्यात राहिल तर सायझिंग व्यवसायावर कुऱ्हाड कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्कॉर्पिओच्या धडकेत दुचाकीवरील दोघे गंभीर

सांगली,ता.२८ (प्रतिनिधी)-

संजयनगर ते कारखान्याकडे जाणाऱ्या मार्गावर भरधाव स्कॉर्पिओने पाठीमागून दुचाकीला जोराची धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील दोघेजण गंभीर जखमी झाले. या प्रकरणी जखमी अक्षय प्रदीप पाटील (वय ३५ रा. सांगली) याने संजयनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि, जखमी अक्षय पाटील हा आपल्या कुटुंबियांस वसंतदादा साखर कारखाना परिसरात गेलेल्या त्याच्या दुचाकी (क्र. एमएच १० एबी २६०१) वरून भाऊ अनिकेत पाटील याच्यासोबत संजयनगर ते औद्योगिक वसाहत मार्गावरून निघाला होता. सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या सुमारास पाठीमागून आलेल्या भरधाव स्कॉर्पिओ गाडीने पाटील याच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात अक्षय पाटील आणि अनिकेत पाटील हे दोघेजण जखमी झाले तर दुचाकीचे चार हजारांचे नुकसान झाले. अपघातानंतर चालक न थांबता तेथून पळून गेला. यानंतर अक्षय पाटील याने संजयनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

गुंड प्रदिप कांबळे दोन वर्षांसाठी जिल्ह्यातून हद्दपार

इचलकरंजी,ता.२८-

येथील गुंड प्रदिप शिवाजी कांबळे (रा. सहकारनगर, इचलकरंजी) याला २ वर्षांसाठी कोल्हापूर जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी दिले आहेत. कांबळे याच्या विरोधात येथील गावभाग पोलीस ठाण्यात दमदाटी, मारामारी, शिवीगाळ करत धमकी देऊन कायदा सुव्यवस्थेला आव्हान देण्यासारखे गुन्हे दाखल आहेत.

येथील सहकारनगरमधील प्रदिप कांबळे याच्या विरोधात गावभाग पोलीस ठाण्यात दमदाटी, मारामारी, शिवीगाळ करत धमकी देणे आणि कायदा सुव्यवस्थेला आव्हान देणारे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याला २ वर्षांसाठी हद्दपार करण्याचा प्रस्ताव जिल्हा पोलीस प्रमुखांच्यामार्फत उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे पाठवला होता. त्यानुसार उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी कांबळे याला २ वर्षांसाठी हद्दपारीचे आदेश दिले आहेत.

दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आणखी काही गुंडावर हद्दपारीची तसेच झोपडपट्टीदादांवरही प्रतिबंधकात्मक कायद्यानुसार कारवाई केली जाणार असून त्याचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु असल्याचे पोलीस निरीक्षक प्रविण खानापुरे यांनी सांगितले.

हजरत राजे बागस्वार दर्ग्याची आज गंधरात्र

इचलकरंजी,ता.२८-

सालाबाद प्रमाणे अवधूत आखाडा हजरत राजे बागस्वार दर्ग्याची शुक्रवार ता.२९ मार्च रोजी रात्री ७ वाजता गंधरात्र साजरी होणार असून शनिवार ता. ३० मार्च रोजी दर्ग्याचा ऊरूस भरणार आहे. याचा लाभ सर्व हिंदू-मुस्लीम भाविकांनी घ्यावा असे आवाहन ऊरूस कमिटीचे अध्यक्ष सुभाष काळे व मासुम मुजावर यांनी केले आहे.

लंगोटे मळा परिसरातील शौचालयाची दुरावस्था

इचलकरंजी,ता.,२८-

रस्त्यावर ड्रेनिजचा मैला, अस्वच्छ स्वच्छता गृह,मोडकळलेली दारे, घाणीने भरलेली शौचपात्र आणि सर्वत्र असह्य दुर्गंधीचा त्रास हे चित्र कोणा खेडे गावातील शौचालयगृहाचे नसून करोडो रूपये कर वसूल करणाऱ्या महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या लंगोटे मळा महापालिका शौचालयाची दुरवस्था आहे. या परिसरातील नागरिकांनी याची अनेकवेळा तक्रार करूनही प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने आता जर शौचालय स्वच्छ व दुरुस्त न झाल्यास भागातील नागरिक आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत.

लंगोटे मळा परिसरात मध्यवस्तीत सरकारी शौचालय आहे. स्त्री-पुरुषांसाठी २४ शौचालय असणाऱ्या या युनिटचा वापर परिसरातील अनेक नागरीक करतात. परंतु सध्या महापालिकेचे या शौचालयांकडे प्रचंड दुर्लक्ष असून यामुळे इथे स्वच्छतेचा अभाव आहे. यामुळे शौचालय तुंबून ड्रेनिजचा उलटा प्रवाह पाईपलाईनद्वारे बाहेर रस्त्यावर येत आहे. त्यामुळे हे मैलामिश्रित पाणी त्या भागात दुर्गंधी बरोबर अनारोग्याचे कारण बनत आहे. आजुबाजूच्या रहिवाश्यांना नाक दाबून इथून ये जा करत जगावे लागत आहे. तसेच या शौचालयांची मोडतोड झाली असून दारे निखळून पडली आहेत. त्यामुळे या शौचालयाच्या वापरकर्त्यांना दुर्गंधी सहन करत दारही धरून बसावे लागत आहे. पाण्याची टाकी स्वच्छ नसल्याने अशुध्द पाणी वापरावे लागत आहे. फरशी फुटल्याने तिथे पाणी साठून शैवाल झाले असल्याने अनेकांचे पाय घसरून अपघात घडले आहेत. किरकोळ ते गंभीर जखमी झाले आहेत. एखाद्या खेड्यातील शौचालयाना लाजवेल अशी परिस्थिती झाली असून यावर कळस म्हणजे याची आरोग्य व बांधकाम विभागाकडे नागरिकांनी तक्रार करून ही प्रशासन याकडे लक्ष देत नसल्याने नागरिकांच्यातून संताप व्यक्त होत आहे. लाखो रुपये कर वसूल करूनही शौचालयासारख्या गरजांकडे तत्परतेने लक्ष देत नसतील तर महापालिकेचा आम्हाला उपयोग काय असा सूर उमटत असून आता मनपा अधिकाऱ्यांनी लंगोटे मळा शौचालयाची व ड्रेनिजची दुरुस्ती न केल्यास महापालिकेवर मोर्चा काढणार असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे.

महानगरपालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष

लंगोटे मळ्यातील शौचालयाची झालेली दुरावस्था.

विजेचा शॉक लागून इलेक्ट्रिशनचा जागीच मृत्यू

घातपात झाल्याचा नातेवाईकांचा आरोप

मिरज,ता.२८ (प्रतिनिधी)-

मिरज एमआयडीसी मधील एक्सेलर पेन्सिल लिमिटेड कारखान्यात कुलर एसी दुरुस्ती करण्यासाठी गेलेल्या इलेक्ट्रिशनचा विजेचा शॉक लागून जागीच मृत्यू झाला. संतोष बाजीराव नाडे (वय ४४ मंगळवार पेठ मिरज) असे मृत इलेक्ट्रिशनचे नाव आहे. संतोष नाडे यांच्या मृतदेहावर मिरजेच्या शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. नातेवाईकांनी कारखान्याच्या घटनास्थळी जाऊन पाहणी केली. संतोष नाडे यांचा घातपात झाल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. याबाबत कुपवाड एमआयडीसीचे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

इलेक्ट्रिशन असणाऱ्या संतोष नाडे यांना मिरज एमआयडीसी मधील एक्सेलर पेन्सिल लिमिटेड कारखान्यामध्ये एसी बंद पडला असून दुरूस्त करण्यासाठी कॉल आला. एसी दुरुस्त करण्यासाठी संतोष नाडे हे सदर कंपनीत गेले होते. मात्र तीव्र विजेच्या शॉक लागल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. शवविच्छेदन करण्यासाठी त्यांचा मृत्यू देह मिरज सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आला. दवाखान्यात त्यांच्या नातेवाईकांनी गर्दी केली होती. नातेवाईकांनी घटनास्थळी पाहणी केली असता. संतोष नाडे यांचा घातपात झाल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला. याबाबत कंपनीचे मालक किंवा मॅनेजर यापैकी कोणीही नातेवाईकांशी संपर्क साधला नाही.अधिक तपास कुपवाड एमआयडीसीचे पोलीस करीत आहेत.

राजू शेट्टी यांचा भेटीगाठीवर जोर

इचलकरंजीत विविध मान्यवरांशी केला संवाद

इचलकरंजी,ता.२८-

गत लोकसभा निवडणुकीत जनतेचा कौल मान्य करून झालेल्या चुका दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला. माझ्यावर असलेली नाराजी दूर करत मतपरिवर्तन करण्यासाठी सतत जनसंपर्क ठेवला असून निवडणूक लढवण्यासाठी माझा होमवर्कही पूर्ण झाला असल्याने जनतेच्या पाठबळावर मीच निवडून येणार असा आत्मविश्वास माजी खासदार राजू शेट्टी यांनी बोलताना व्यक्त केला.

राजू शेट्टी यांनी इचलकरंजी बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन संवाद साधला.

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली असली तरी हातकणंगले लोकसभा मतदार संघात महायुती आणि महाविकास आघाडीचाही उमदेवार अद्याप निश्चित नाही. मात्र माजी खास. राजू शेट्टी यांनी एकला चलोरेची भूमिका घेतली असून ते महाविकास आघाडीचा बाहेरून पाठींबा मिळवण्यासाठी प्रयत्नशिल आहेत. त्याचबरोबर मतदारसंघातील प्रमुखांच्या गाटीभेटीही घेत आहेत. गुरुवारी इचलकरंजीत त्यांनी महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे प्रमुख मदन कारंडे, शशांक बावचकर, सागर चाळके, प्रकाश मोरबाळे, महादेव गौड, सयाजी चव्हाण, नितीन जांभळे तसेच इचलकरंजी बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवडणुकीत सहकार्य करण्याचे साकडे घातले.

यावेळी शेट्टी यांच्यासोबत विकास चौगुले, गोवर्धन दबडे, हेमंत वणकुंद्रे, विद्यासागर चराटे, आण्णासाहेब शहापूरे आदी उपस्थित होते.

वाढती महागाई, भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्य जनता हैराण आहे. आरोग्य आणि शिक्षणाचा तर बोजवाराच उडाला आहे, अशा खडतर परिस्थितीत जनता जगत असल्याने या निवडणुकीत यावर चर्चा होणे गरजेचे आहे. मात्र या जिव्हाळ्याच्या प्रश्नाऐवजी एकमेकांचा बदला घेण्याचे, खालच्या स्तरावर जावून टिकाटिपणी करण्याचे, व्यक्तिगत हेवेदावे सुरु आहेत. एकूणच अत्यंत हिनस्तरावरचं राजकारण सुरु असलं तरी मतदारांनी डोके अत्यंत शांत ठेवून मतदान करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

घरफोडी करणारा जेरबंद ; साडेसात लाखाचे दागिने हस्तगत

सांगली,ता.२८ (प्रतिनिधी)-

शहरातील विविध ठिकाणचे बंद फ्लॅट फोडून त्यातील ऐवज चोरणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगारास अटक करण्यात आली. तसेच चोरट्याकडून चोरीचे दागिने खरेदी करणाऱ्या सराफालाही अटक करण्यात आली आहे.

सुशील संजय आपटे (वय २४, रा. गारपीर चौक, सांगली) असे व्यापाऱ्याचे नाव असून सुनील नामदेव रूपनर (वय ३२, रा. कुपवाड) असे चोरट्याचे नाव आहे. आरोपींकडून पाच गुन्हे उघडकीस आले असून चोरीचे साडेसात लाखांचे दागिने जप्त करण्यात आल्याची माहिती एलसीबीचे पोलिस निरीक्षक सतीश शिंदे यांनी दिली.

जिल्ह्यातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी निरीक्षक शिंदे यांनी सहायक निरीक्षक पंकज पवार यांचे एक विशेष पथक तयार केले आहे. पथक सांगली शहरात गस्त घालत होते. त्यावेळी पथकातील बिरोबा नरळे यांना रेकॉर्डवरील गुन्हेगार सुनील रूपनर हा सांगली रेल्वे स्टेशनच्या पूर्वेस असणाऱ्या एका अपार्टमेंटजवळ चोरीचे दागिने विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती खबऱ्याद्वारे मिळाली. त्यानंतर पथकाने त्या परिसरात सापळा रचला होता. मिळालेल्या माहितीप्रमाणे सुनील रूपनर हा एका अपार्टमेंटसमोर थांबला होता. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतल्यानंतर त्याच्या कमरेला एक हातोडी तसेच खिशात दागिने सापडले. त्याबाबत त्याच्याकडे कसून चौकशी केल्यानंतर त्याने शहरातील अभयनगर, बालाजीनगर, होळकर चौक, विष्णू घाट आदी परिसरातील बंद फ्लॅट फोडून दागिने चोरल्याची कबुली दिली. तसेच ते दागिने सराफ सुशील आपटे याला विकल्याचे सांगितले. सुनील रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे माहित असूनही त्याच्याकडून चोरीचे दागिने खरेदी केल्याप्रकरणी आपटे यालाही अटक करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलिस निरीक्षक सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक पंकज पवार, उपनिरीक्षक कुमार पाटील, बिरोबा नरळे, संदीप गुरव, संदीप नलवडे, उदयसिंह माळी, सागर लवटे, अमर नरळे, कॅटन गुंडवाडे आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

विनापरवाना बोर्ड लावल्याने एकावर गुन्हा दाखल

कोल्हापूर ता.२८ (प्रतिनिधी)

महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत गुरुवारी डिजिटल बोर्ड, जाहिरात फलक यांच्यावर विशेष मोहीम घेऊन कारवाई करण्यात आली. या कारवाई अंतर्गत विनापरवाना व शहर विद्रुपीकरण कलम ३ व ४ अंतर्गत बोर्ड लावणाऱ्या उचगांव येथील शाहू मिल कॉलनी येथील निखिल दिनकर पाटील यांच्यावर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ ३ व ४ कलम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

शनिवारची पुणे-कोल्हापूर रेल्वेगाडी रद्द

कोल्हापूर ता.२८ (प्रतिनिधी):

पुणे-सातारा रेल्वेच्या जरेंड्श्वर-सातारा सेक्शनवर ट्रॅक दुहेरीकरण आणि विविध अभियांत्रिकी, मध्य रेल्वेवरील कामामुळे शनिवार दिनांक ३० मार्च २०२४ रोजी पुण्याहून सुटणारी गाडी क्रमांक ०१०२३ पुणे-कोल्हापूर या मार्गावरील वाहतूक ब्लॉकच्या कामामुळे रद्द राहील, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

■ संपादकीय ■

शाश्वती

देशात आणि पर्यायाने राज्यातही बेरोजगारांचे प्रमाण वाढले आहे. आजचा युवक हा व्यासायामिमुख शिक्षणही घेतलेला आहे. मात्र अशा कौशल्याधिष्ठीत शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण कमी असावे असेही वाटत नाही. कांही ना कांही करावेच लागते, जगण्यासाठी धडपड ही सर्वांचीच सुरु असते. मात्र शिक्षण आणि त्यानंतर नोकरी किंवा रोजगाराची संधी याकडे युवकांचे लक्ष अधिक असते. आज मात्र नोकऱ्यांची वानवा दिसत आहे. खाजगी असो वा सरकारी किंवा निमसरकारी अशा क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध असली तरी त्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य नवयुवकांकडे किंवा आत्ताच्या बेरोजगारांकडे आहे किंवा नाही याचे एकदा सर्वेक्षण तरी करायला हवे. जेणेकरुन सरकारसमोर बेरोजगारीची समस्या किती भयानक प्रकारे ठाण मांडून समोर बसली आहे हे लक्षात येण्याची शक्यता आहे. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षितांचे बेरोजगारीत एकूण प्रमाण २००० साली ३५.२ टक्के इतके होते ते २०२२ साली ६५.७ टक्के इतके भयावह झाले आहे. त्याच वेळी उत्पादन-आधारित-उत्तेजन (प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेटिव्ह ऊर्फ पीएलआय) योजनेअंतर्गत २०२३ पर्यंत खासगी क्षेत्राकडून तीन लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची अपेक्षा असताना प्रत्यक्ष गुंतवणूक १.०७ लाख कोटी रुपयांवरच थबकून राहिलेली आहे. हे दोन तपशील स्वतंत्रपणे प्रकाशित झाले आहे. याबाबत संयुक्त राष्ट्रांच्या 'इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन'चा अहवाल राजधानी दिल्लीत जन्मास आला. त्या अहवालातील निष्कर्ष अतियश धक्कादायक आहे. देशातील एकूण बेरोजगारांत तब्बल ८३ टक्के हे युवक आहेत आणि अशांच्या बेरोजगारीत २००० ते २०१९ या काळात वाढच झाली, आपल्या देशातील रोजगार हे प्रामुख्याने किरकोळ (कॅज्युअल) आणि स्वरोजगारीत (सेल्फ एम्प्लॉईड) क्षेत्रात मोडतात, याचाच अर्थ संघटित आणि दीर्घकालीन रोजगारांचे प्रमाण आपल्याकडे कमी आहे. कोरोनाच्या काळात रोजगारांचे प्रमाण कमी झाले. तथापि २००० ते २०१८ या कालावधीत बेरोजगारीचे प्रमाण सातत्याने वाढत राहिले. तथापि यात सर्वाधिक चिंताजनक मुद्दा आहे तो म्हणजे रोजंदारीवर आपले पोट भरणाऱ्यांचा. अशा बेरोजगारांना रोजंदारी उपलब्धच नसल्याने त्यांच्यात प्रचंड संताप दिसत आहे. हा संताप आगामी काळात भयावह रुप नाही घेतला तर नशीबच म्हणावे लागेल. आणि तसे भयावह स्वरुप या बेरोजगारीने घेऊ नये याची दक्षता वेळीच घेण्याची गरज आहे. निवृत्तिवेतन, निवृत्तोत्तर उत्पन्नाचे साधन वा काही वैद्यकीय सेवा-सुविधा असे काहीही लाभ या रोजंदारी करुन पोट भरणाऱ्यांसाठी नसतात. संघटित क्षेत्रातील सुरक्षित नोकरदारांपुरतीच मर्यादित अशा बाबी असतात आणि आहेतही. प्रत्यक्षात मात्र सरकारतर्फे राबवल्या गेलेल्या प्रकल्प आणि योजनांमधून एकूण लक्ष्यापैकी कशीबशी ४३ टक्के इतकीच रोजगार निर्मिती होऊ शकली. या योजनेतंर्गत सहभागी होणाऱ्या कंपन्यांना पहिल्या चार वर्षांत अधिकाधिक गुंतवणूक करावी लागते. तशी अट आहे. यातील अनेक योजना २०२१-२२ या काळात जाहीर केल्या गेल्या. म्हणजे २०२५-२६ पर्यंत या सर्वांस अपेक्षित गुंतवणूक करावी लागेल. त्याचसाठी २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात दोन लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा आराखडा सादर केला गेला. प्रत्यक्षात मात्र गुंतवणूक त्या वेगाने होत नाही, असा या ताज्या अहवालांचा अर्थ. पण दोन्ही अहवालांचा परिणाम एकच. बेरोजगारीत सातत्याने होत असलेली वाढ. त्याचमुळे भारतास तातडीने रोजगारक्षम उद्योग स्थापनेस मोठ्या प्रमाणावर गती द्यावी लागेल, असे पहिला अहवाल सांगतो. अलीकडे भांडवल मोठ्या प्रमाणावर ओतले गेले तरी स्वयंचलनाच्या (ऑटोमेशन) वाढत्या प्रसारामुळे प्रत्यक्षात तितके रोजगार तयार होत नाही, हे वास्तव हा अहवाल मान्य करतो. म्हणूनच अधिकाधिक भांडवल दीर्घकालीन रोजगार देऊ शकणाऱ्या उद्योगांत कसे ओतले जाईल याची खबरदारी भारतास घ्यावी लागेल, हा आयएलओच्या अहवालाचा अर्थ. दीर्घकालीन रोजगार निर्मितीवर भारतास अधिकाधिक लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. प्रचंड मोठ्या संख्येने बेरोजगारांची संख्या लक्षात घेता त्यांना रोजगारांची निर्मिती करुन कमाईचे साधन उपलब्ध करुन द्यावे लागणार आहे. बेरोजगारीवर मात करण्यासाठी रोजगार निर्मितीही हे एकच सूत्र नसून नव्या कल्पनांनाही वाव देण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. आणि बेरोजगारांना रोजगाराची संधी देण्याची शाश्वत अशी ग्वाही कोणीतरी यापुर्वी दिली होती. आता सुध्दा ही शाश्वती कोणी देईल ही अपेक्षा बेरोजगारांकडे असेल तर त्यात गैर कांहीच नाही. राष्ट्रातील बेरोजगारी आणि तिची वाढते प्रमाण लक्षात घेता मायबाप सरकार आता बेरोजगारांकडे लक्ष देईल असा विश्वास बाळगून कोट्यवधी बेरोजगार असतील यात शंका घेण्याचे कांहीच कारण नाही.

साहित्यिक क्षेत्रासह शैक्षणिक सुधारणांसाठी सामाजिक भान ठेवून व्यापक योगदान दिलेल्या व्यक्तीमत्वाचे स्मरण

ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. नागनाथ लालूजीराव कोत्तापल्ले यांची आज जयंती आहे. साठोत्तरी कालखंडात कविता, कथा, दीर्घकथा, कादंबरी, ललित गद्य आणि समीक्षा अशा विविध वाङ्मयप्रकारांत दर्जेदार वाङ्मयनिर्मिती करणारे नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी मुखेड (जि. नांदेड) या गावी झाला. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण देगलूर येथे झाले. बी.ए. आणि एम.ए. या दोन्ही परीक्षांत मराठवाडा विद्यापीठात ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. ते कुलपतींच्या सुवर्णपदकाने सन्मानित झाले होते. 'शंकर पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध लिहून त्यांनी १९८० साली पीएच.डी. पदवी संपादन केली. बीड येथील महाविद्यालयात १९७१ ते १९७७ या काळात मराठीचे अधिव्याख्याता म्हणून काम केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये त्यांनी अधिव्याख्याता आणि प्रपाठक या पदांवर १९७७ ते १९९६ या काळात काम केले. १९९६ ते २००५ या कालावधीत पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात प्राध्यापक आणि विभाग प्रमुख म्हणून काम केले. २००५ सालापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ते कुलगुरु झाले. व्यासंगी, अध्यापनकुशल,

उपक्रमशील आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी लौकिक मिळवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक आणि पुणे विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे समन्वयक या पदांवरुन त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्था आणि साहित्य अकादमी या संस्थांच्या विविध समित्यांचे सदस्य म्हणून काम पाहिले. महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार समितीचे अध्यक्ष (१९८८-१९८९), महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आणि विविध विद्यापीठांच्या मराठी अभ्यास मंडळांचे ते सदस्य होते. मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. श्रीगोंदा येथे १९९९ साली झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आणि २००५ साली जालना येथे झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. चिपळूण येथे २०१२ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. राज्य शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे ते अध्यक्ष होते. मराठी ग्रामीण साहित्यात त्यांचे मोठे योगदान आहे. ग्रामीण कथालेखक, कादंबरीकार, कवी, समीक्षक अशी त्यांची ओळख आहे. राजधानी, वारसा, सावित्रीचा निर्णय या त्यांच्या दीर्घकथा प्रसिद्ध

दैनंदिनी

आहेत. गांधारीचे डोळे, मध्यरात्र, पराभव या त्यांच्या कादंबऱ्या मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत. महात्मा फुले यांच्या जीवनावरील डॉ. कोत्तापल्ले यांचा ज्योतीपर्व हा ग्रंथ त्यांच्या सामाजिक व परिवर्तनवादी विचारांची साक्ष देतो.शिक्षणाच्या निमित्ताने त्यांचे औरंगाबादशी घनिष्ठ संबंध होतेच. कुलगुरूपदाने ते दृढ झाले.

विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागात शिक्षण घेताना त्यांनी मराठवाडा साहित्य परिषदेत नोकरी केली. साहित्य परिषदेच्या खोलीत राहून शिक्षण पूर्ण केले. त्यामुळे शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींची त्यांना जाणीव होती. या जाणिवेतूनच त्यांनी कमवा व शिका ही योजना बळकट करताना विद्यार्थ्यांचे मानधन वाढवले. कांपीमुक्तीसाठी त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून लिहिलेले पत्र फार प्रभावी ठरले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्त कांपीमुक्ती स्वीकारली. विद्यार्थी संघटना व विद्यापीठ प्रशासन यांच्यात समन्वय निर्माण करण्यात डॉ. कोत्तापल्ले यांना यश आले.

शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच रोखता येईल

भारताला धोकादायक प्रदूषणाचा भस्मासूर

स्वस संस्था आयक्यूएअर ने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे. कारण या अहवालात भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून बिहारमधील बेगुसराई हे जगातील सर्वाधिक प्रदूषित महानगर क्षेत्र तर जगातील १३४ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे.

या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३४ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, बेगुसराई, गुवाहाटी, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्त्वाच्या शहरांचा समावेश आहे.

या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम-२.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्त्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे.

एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र जगे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर

दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत.

न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली होती. प्रदूषणमुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणमुळे रद्द करावा होता. त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली.

जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहेत. मुंबई-दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही.

या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते.

धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे.

वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम-विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा.

नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेचा वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच हवा हा भस्मासुर रोखता येईल. ■ श्याम ठाणेदार

सर्वाधिक प्रदूषित देशांमध्ये भारत तिसऱ्या स्थानावर

स्विट्झर्लंड मधील आयक्यू एअर या संस्थेने २०२३ या वर्षात जागतिक स्तरावर हवेचा दर्जा कसा होता याविषयाचे संशोधन करण्यात आले. त्यासाठी हवेच्या दर्जाची तपासणी करणारी ३० हजारांहून अधिक केंद्र व संशोधन संस्थांमार्फत हवेच्या दर्जा मापनाची सेन्सर्स, विविध सरकारी संस्था, विद्यापीठे, शैक्षणिक व खाजगी संस्था यांचे सहाय्य आयक्यू संस्थेचा अहवाल तयार लाभले होते. विविध देशांमधील हवेचा दर्जा तपासण्यासाठी पीएम २.५ हे मापन प्रमाण म्हणून मानण्यात आले होते. भारतात प्रत्येक क्यूबिक मीटर क्षेत्रात ५४.४ मायक्रोग्रॅम २.५ पातळीचे केंद्रीकरण झाल्याचे निदर्शनास आले. १.३६ अब्ज भारतीय लोक या वाढलेल्या प्रदूषणाचा त्रास सहन करीत आहेत.



६६ शहरांत सर्वाधिक प्रदूषण :

देशातील ६६ शहरांत सर्वाधिक प्रदूषण नोंदविले गेले आहे. त्या प्रदूषणात बेगुसराय, गुवाहाटी, दिल्ली, मुल्लनपूर,सिहान, सहर्सा, गोसाईगाव, कटीहार ही प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेली प्रमुख शहरे आहेत. पाकिस्तान आणि बांगल्ला देश यांमध्ये हे प्रमाण जगभरात सर्वाधिक आढळल्याने ते देश प्रदूषणाच्या क्रमवारीत पहिल्या दोन क्रमांकावर आहेत. ताजिकिस्तान, बर्किना फासो, इराक, संयुक्त अमिराती, नेपाळ, इजिप्त, काँगो हे देश त्यानंतर प्रदूषणाने व्यापलेले देश आहेत. तर मॉरिशस, ग्रेनेडा, आइसलँड, बर्मुडा, न्यू झीलंड, ऑस्ट्रेलिया या देशांतील हवा त्यामानाने स्वच्छ आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीप्रमाणे जगातील दर नऊ मृत्यूपैकी एकाचा मृत्यू प्रदूषित हवेमुळे होतो.

७० लाख लोकांचा मृत्यू प्रदूषणामुळे :

दरवर्षी ७० लाख लोकांचा अकाली मृत्यू प्रदूषणामुळे होतो. प्रदूषण रोखण्याची गरज ओळखून केले जाणारे उपाय कमी पडताहेत. त्याचवेळी प्रदूषणात वाढ होण्यास प्रत्येक देश जे आपल्या जनतेला नव्या व आधुनिकतेच्या सोयी उपलब्ध करून देण्याच्या नादात विकासकामे, मोठमोठे प्रकल्प उभारताना पृथ्वीवरील दाट जंगलांची तोड आणि भूमीवर उत्खनन करताना पर्यावरणाचा समतोल राखू शकत नाहीत त्यामुळेच एकंदरीत वातावरण प्रदूषित होत चालले आहे. सुधारणाही हव्यात, प्रदूषणही वाढू द्यायचे नाही याचा ताळमेळ कसा साधावा यावर तोडगे काढण्याचे प्रयत्न प्रत्येक देशाने सुरू केले आहेत. ■ स्नेहा राज

वाचकांचा पत्रव्यवहार

आयुष्याचा अंदाज घेणारे संशोधन सुरु

डेन्मार्क मधील शास्त्रज्ञ मानवाच्या आयुष्याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्या मुळे मानव किती जगेल याचा अंदाज लावता येईल. एका बातमी नुसार कोट्यवधी लोकांचा डेटा यासाठी गोळा केला जात आहे. डेन्मार्क मध्ये सुमारे ६० लाख लोकांचा डेटा गोळा करण्यात आला आहे. या डेटाचे विश्लेषण करून त्या संबंधी आयुष्याचा अंदाज बांधता येईल. शास्त्रज्ञानी जेव्हा मृत्यूचा अंदाज लावण्याचा प्रयत्न केला तेव्हा तो अंदाज सुमारे ७८ टक्के बरोबर आला होता. ज मागणाचा मृत्यू अगोदर सांगता आला किंवा त्यासंबंधी अंदाज बांधता आला तर काय होईल? याची कल्पना केलेली बरी. एक म्हणजे मागूस अकार्यक्षम किंवा निराश होईल. त्याला जीवनात काही रहस्यच राहणार नाही. आज माणसाला मृत्यू केव्हा येणार हे माहित नसल्यामुळे तो काम करतो. काही ध्येये समोर ठेवतो. जीवनात आनंद घेतो व जीवन सुखमय करण्याचा प्रयत्न करतो. पण जेव्हा मृत्यू कळेल तेव्हा त्याची अवस्था अत्यंत वितंबण होईल. त्याला जीवन हे ओझे वाटेल कि काय? हा सुद्धा प्रश्न आहे. आज शास्त्र खूपच पुढे गेले आहे. मृत्यू केव्हा येईल याचे जसे संशोधन चालू आहे तसेच माणसाचे आयुष्य कसे वाढवता येईल याचेही संशोधन चालू आहे. एवढे मात्र खरे कि पूर्वी सहा सात दशकांपूर्वीचे माणसाचे आयुष्य आता वाढले आहे हे निश्चित. वैद्यकीय सुविधा, सकस आहार यामुळे तो पूर्वीपेक्षाही जास्त आयुष्य जगत आहे. एकूणच मृत्यू केव्हा येणार याबरोबरच आयुष्य कसे वाढेल या दोन्ही गोष्टीचे संशोधन जगात चालू आहे. ■ शांताराम वाघ

पर्यावरण विचार-उपाय गांभीर्यपूर्वक आवश्यक

सद्यस्थितीत पर्यावरण हा विषय महत्वाचा असून यावर्षी तर अनेक ठिकाणी महापूर काही ठिकाणी दुष्काळ यामुळे मोठे नुकसान झाले आहे. हवामानातील होणारे अचानक बदल निसर्ग-हास याचे विपरीत परिणाम भावी काळात होणार आहेत. तेव्हा पर्यावरण या गंभीर विषयावर व्यापक उपायांची गरज असून याबाबत आश्वासने असावीत तसेच वार्सदभातील विशेष योजनांबद्दल विचारमंथन चर्चा व्हावी ही अपेक्षा! भावी पिढीला कोणता वारसा आणि कोणते पर्यावरण मिळणार आहे? याचे उत्तर येत्या काही वर्षात द्यावे लागणार आहे यावर भवितव्य अवलंबून असणार आहे अन्यथा एकंदर जीवनमान अत्यंत कठीण होणार आहे. पऱ्हाबार जाणे ही कल्पना राहणार नसून जर व्यापक उपाय झाले नाही तर तशी परिस्थिती येऊ शकते. या वर्षी हवामानबदलाचे परिणाम अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, तापमानवाढ गावोगावी दिसत असताना आता पर्यावरण विचार आणि उपाय आवश्यक आहेत. ■ प्र.मु.काळे

ये रे माझ्या मागल्या!

कल्याण, डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर पालिका तसेच अंबरनाथ, कोळेगाव, बदलापूर या नगरपालिका हद्दीतील प्रवाशांना सार्वजनिक परिवहन सेवा उपलब्ध व्हावी, हा प्रस्तावित महानगर निगम प्राधिकरण स्थापन करण्याचा मुख्य उद्देश असून यातून बस सेवेचे सत्त्वावरील संचलन वाढवून खासगी वाहतुकीला आळा बसावा आणि त्याद्वारे प्रदूषण, वाहन कोंडी तसेच प्रवाशांची दमछाक कमी होईल. अशा संचलनातून व त्याच्या खर्चातून प्रवाशांना बस सेवा पुरवण्यात येईल, हा त्यामागचा मूळ उद्देश असल्याने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांना खूष करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने सामुहिक परिवहन सेवा उपक्रम सुरु करण्यास ग्रीन सिग्नल दिला आहे. तो निर्णय निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल. त्यामुळे एकच परिवहन सेवा केन्द्रास जिल्ह्यातील सर्व महापालिका आणि नगरपालिका हद्दीतील नागरीकांना सार्वजनिक वाहतूकीचा एक सक्षम पर्याय उपलब्ध होऊ शकतो. असा सरकाराचा आत्मविश्वास आहे कल्याण डोंबिवली महापालिकेचा परिवहन उपक्रम हा आर्थिक तोट्यात असल्याचे समजते.

उल्हासनगरला आणि भिवंडी महापालिकेकडेही परिवहन सेवा उपक्रम नाही. अंबरनाथ, बदलापूर पालिका हा उपक्रम चालवू शकत नाही. महाराष्ट्र सरकारने सामुहिक परिवहन सेवा उपक्रम राबवून प्रवाशांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला, असे म्हणावे लागेल. मात्र याची अमंलबजावणी कशी होते त्यावर सर्वकाही अवलंबून आहे नाहीतर पुन्हा येरे माझ्या मागल्या अशी म्हणण्याची पाळी प्रवाशांवर यायला नको! ■ राजू जाधव

दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)

शुक्रवार,ता.२९.३.२०२४, विक्रम संवत २०८०,शिवशक ३५०, शालिवहन शके १९४५, शोभन नाम संवत्सरे, उत्तरायणे, शिशिर ऋतो, फाल्गुन मासे, कृष्ण पक्षे चतुर्थी तिथी, २०.२२ नंतर पंचमी तिथी, विशाखा नक्षत्र, २०.३६ नंतर अनुराधा नक्षत्र, तुला रास १४.०९ नंतर वृश्चिक रास, वज्रयोग, २३.१२ नंतर सिद्धीयोग, बव करण, ७.४३ नंतर बालव करण २०.२२ पर्यंत, दिनमान १२.०६, सुर्योदय ६.३४, सुर्यास्त १८.४२(कोल्हापूरचे) राहुकाळ सकाळ १०.३० ते १२, गुडघ्याचे यम २०.३६ नंतर, घबाड २०.२२ पर्यंत.

ज्योःकेशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९

✲ राशीभविष्य

मेष– क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन तुम्ही शारिरीकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल. दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक केलीत तर तुम्हाला भरघोस नफा होईल.

वृषभ– इतरांचे लक्ष वेधून घेण्यासाठी तुम्हाला फारसे काही प्रयत्न करावे लागणार नाहीत कारण आजचा दिवस तुमच्यासाठी भला आहे.

मिथून– एक सरप्राईज आखा आणि आजचा दिवस तुमच्या आयुष्यातला सर्वात सुंदर दिवस असेल असे काहीतरी करा.आज तुमच्याकडे तग धरून राहण्याची क्षमता असेल

कर्क– तुम्ही भावनिकदृष्ट्या खूप असुरक्षित असाल, म्हणून तुम्ही दुखावले जाल अशा परिस्थिती-प्रसंगांपासून दूर राहा, सावध राहा.आजचा दिवसही आपल्यासाठी उत्तम आहे.

सिंह– जीवन आनंदाने जगण्याची आपल्या अपेक्षा आकांक्षा तपासून पाहा.योगसाधनेची मदत घ्या.त्यामुळे तुम्हाला जीवनाचा आनंद कसा घ्यावा हे शिकता येईल.

कन्या – तुमच्या आजाराबद्दल चर्चा करणे टाळा. तुमच्या दुखण्यावर तुम्ही जितकी जास्त चर्चा कराल तेवढी तुमची व्याधी वाढत जाणार.

तुळ– कामाच्या ठिकाणी यश मिळेल. दुसऱ्यांना पटवून देण्याच्या क्षमतेमुळे तुम्हाला लाभ होईल. तुमच्या आजूबाजूची माणसं असं काहीतरी करतील.

वृश्चिक– लहान मुलांबरोबर खेळण्यातून मौज मस्ती करणे हा आपल्या दुखावर चांगला उपाय असेल. काही अटकळी आणि अनपेक्षित लाभांमुळे आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल.

धनु– नातेवाईक आणि मित्रांना आपल्या आर्थिक बाबीचे व्यवस्थापन करू देऊ नका. एखाद्या सहलीच्या ठिकाणी जाऊन तुमच्या प्रेमी जीवनात आनंद आणाल.

मकर– वाहन चालविताना, विशेष करुन वळणावर काळजी घ्या, दुसऱ्यांचा निष्काळजीपणा तुमच्यासाठी अडचणी निर्माण करु शकतो. कोणतीही गुंतवणूक घाईगडबडीत करू नका.

कुंभ– एखाद्या सहलीच्या ठिकाणी जाऊन तुमच्या प्रेमी जीवनात आनंद आणाल.महत्वाचे व्यावसायिक करार मदार करताना आपल्या भावनांवर नियंत्रण राखा.

मीन– आरोग्य एकदम चोख असेल.धनाने आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते. तुमच्या ज्ञानलालसेपोटी नवीन मित्र जोडाल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

निवडून आल्यानंतर बेळगावसाठी रात्रंदिवस काम करणार

जगदीश शेट्टर यांचे आश्वासन;माजी मुख्यमंत्री येडियुरप्पांच्या उपस्थितीत बेळगावात प्रचारफेरी

बेळगाव,ता.२८(प्रतिनिधी)-

बेळगाव ही माझी जन्मभूमी आहे. येथून निवडून आल्यानंतर विकासासाठी रात्रंदिवस काम करण्याचे आश्वासन माजी मुख्यमंत्री तथा बेळगाव मतदार संघातील भाजपचे अधिकृत उमेदवार जगदीश शेट्टर यांनी दिले.बेळगाव येथे झालेल्या प्रचारफेरीवेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी त्यांच्या समवेत माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पाही उपस्थित होते.

तत्पूर्वी जगदीश शेट्टर हिरेबागेवाडी टोलनाक्यावरून बेळगावात दाखल झाले. नंतर किल्ला दुगद्दवी मंदिरात पूजा करून बाईक रॅलीला सुरुवात करण्यात आली. भाजप पक्षाचे चिन्ह, पक्षाची शाल आणि झेंडा घेतलेले कार्यकर्ते भगवे फेटे परीधान करून रॅलीत सहभागी झाले होते. रॅली दरम्यान भाजप कार्यकर्त्यांनी अब की बार मोदी सरकार, अब की बार चारसो पार, हर घर मोदी, घर घर मोदी, भारतमाता की जय, हमारा नेता कैसा हो, नरेंद्र मोदी जैसा हो, छत्रपती शिवाजी महाराज की जय, राणी चन्नम्मा की जय, अशा जोरदार घोषणा दिल्या.

खुल्या जीपमध्ये भाजपचे उमेदवार जगदीश शेट्टर, बी.एस.येडियुरप्पा उभे राहून मतदारांना अभिवादन करत होते. अशोक चौकातून संगोळी रायण्णा चौक मार्गे न्यायालयात आल्यानंतर जगदीश शेट्टर यांनी न्यायालयाच्या आवारातील क्रांतिकारक सांगोली रायण्णा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. चन्नम्मा चौकात आल्यानंतर राणीने चन्नम्मा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर आंबेडकर उद्यानातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. नंतर राणी चन्नमा सर्कल येथील गणपती मंदिरात

बेळगाव येथे भाजपच्या प्रचारफेरीवेळी उमेदवार जगदीश शेट्टर,माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा व इतर प्रमुख मान्यवर मंडळी.

आरती करण्यात आली.त्यानंतर कॉलेजरोड ते धर्मवीर संभाजी चौकापर्यंत पदयात्रा काढून धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून, कपिलेश्वर मंदिरमार्गे शिवाजी पार्कमार्गे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर गोवावेस महात्मा फुले मार्गालगत जगतज्योती बसवेश्वरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सदाशिवनगर येथील भाजप महानगर कार्यालयाजवळ बाईक रॅलीचा समारोप करण्यात आला.

यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना माजी मुख्यमंत्री येडियुरप्पा म्हणाले, लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान बनवण्याचे आमचे ध्येय आहे.त्यासाठी बेळगाव लोकसभा मतदारसंघात माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांचे नाव पक्षश्रेष्ठींनी सुचवले आहे. त्यांचा विजय निश्चित आहे. ते किमान दोन लाख मतांच्या फरकाने विजयी होतील, यात शंका नाही. पण आपण उदासिन राहू शकत नाही. सर्वांनी त्यांच्या विजयासाठी एकत्र काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

रॅलीत भाजप नेते एन. रविकुमार, प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार अनिल बेनके, संजय पाटील, महानगर जिल्हाध्यक्ष गीता सुतार, सरचिटणीस मुगळेंद्रगौडा पाटील, ग्रामीण जिल्हाध्यक्षा सुभाष पाटील, महापौर सविता कांबळे, उपमहापौर आनंद चव्हाण, माजी उपमहापौर रेश्मा पाटील, नगरसेवक जयतीर्थ जोशी, राजशेखर डोणी, शरद पाटील, शिल्पा केकरे, गीता कोळी यांच्यासह भाजपच्या विविध शाखांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

करनूर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सौ.मंजिरी पाटील

कागल,ता.२८(प्रतिनिधी)-

करनूर (ता.कागल) येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी माजी आमदार संजय बाबा घाटगे गटाच्या सौ. मंजिरी अमरसिंह पाटील यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. निवड सभेच्या अध्यक्षस्थानी निवडणूक अधिकारी कुलदीपक गवंडी हे होते.

येथील ग्रामपंचायतीमध्ये वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ व माजी आमदार संजयबाबा घाटगे गटाच्या युतीची सत्ता आहे.रेश्मा शेख यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. या पदासाठी सौ. मंजिरी पाटील यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक बिनविरोध झाल्याचे जाहिर करण्यात आले. बिनविरोध निवडी नंतर सत्काराला उत्तर देताना नूतन सरपंच मंजिरी पाटील म्हणाल्या, गावचा सर्वांगीण विकास,हाच माझा ध्यास असेल.वासाठी सर्वांना विश्वासात घेऊन काम करेन.ग्रामस्थांच सरपंच आहेत असे समजून माझे काम असेल.

कार्यक्रमास ग्रामसेवक साताप्पा कांबळे, तलाठी विठ्ठल जंगले, उपसरपंच तानाजी भोसले, पोलीस पाटील सुरज कांबळे ,इम्रान नायकवडी, तातोबा चव्हाण, बाळासो पाटील, प्रवीण कांबळे ,संगीता जगदाळे, अमरसिंह पाटील ,रोहन पाटील आदींसह संजय बाबा घाटगे व मंत्री हसन मुश्रीफ गटाचे कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. शेवटी फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष करण्यात आला.

देवचंदमध्ये ४ एप्रिलला शरद स्कॉलर परिक्षेचे आयोजन

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)-

यड्राव येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग याच्यावतीने बारावी सायन्सच्या सन २०२३-२४ विद्यार्थ्यांसाठी 'शरद स्कॉलर २०२४' या परिक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.

परिक्षा गुरुवार ता.४ एप्रिलला होणार आहे.यामध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला १लाख रुपयांसह अनुक्रमे ५० हजार,४० हजार,३० हजार व २० हजार रुपये बक्षिस व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील प्रथम विद्यार्थ्यास १० हजार रुपये व इतर पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी २ हजार रुपयांचे बक्षिस आहे.ही परिक्षा कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर, इचलकरंजी, जयसिंगपूर, मुरगुड, गडहिंग्लज, आजरा, चंदगड, गारगोटी तर सांगली जिल्ह्यात सांगली, मिरज, म्हैशाळ, इस्लामपूर व पलूस या केंद्रावर, सोलापूर (सोलापूर, सांगोला, दहिवाडी), सातारा-कराड, पाटण, पुणे, रत्नागिरी, निपाणीमध्ये देवचंद कॉलेज,अर्जुनगर या केंद्रावर होणार आहेत.सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळणार आहे. सदर परीक्षा ४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत देवचंद कॉलेज,अर्जुनगर येथे होणार आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो डॉ जी.डी इंगळे यांनी इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याचे आवाहन केले आहे.

प्रथम क्रमांकास एक लाखांचे बक्षिस

मंत्री हसन मुश्रीफ यांचा सत्कार करताना सुनिलराज सुर्यवंशी, शुभांगी सुतार,संपतनाना मगदूम यांच्यासह इतर मान्यवर.

निढोरीत मंत्री हसन मुश्रीफ यांचा निधी मंजूरीबद्दल सत्कार

निढोरी,ता.२८(वार्ताहर)-

निढोरी गावांसाठी विविध विकास कामांकरिता मंत्री हसन मुश्रीफ यांनी आपल्या आमदार फंडाच्या माध्यमातून हेमाडपंथी पुरातन महादेव मंदिर तीर्थक्षेत्र पर्यटन ब या योजनेतून एक कोटी ७५ लाखाचा निधी मंजूर करून दिल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

बिद्रीचे विद्यमान संचालक व्हा.चेअरमन सुनिलराज सुर्यवंशी, सरपंच शुभांगी सुतार, उपसरपंच संपतनाना मगदूम,रणजितसिंह सुर्यवंशी, एकनाथ कळमकर, सतिश चिताळे, सुधीर सुतार, प्रविण गुरव, योगेश सुतार, पांडुरंग मगदूम, संजय सुतार आदी मान्यवरांच्या हस्ते ना.मुश्रीफ यांचा करण्यात आला.सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करून मंत्री मुश्रीफ यांनी निढोरीच्या सर्वांगिण विकासासाठी यापुढेही भरघोस निधी देणार असल्याचे सांगितले.या सर्व विकासकामांचे उद्घाटन लोकसभा निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर होणार आहे.

मांजरी येथील उरूसास आजपासून प्रारंभ

मांजरी,ता.२८(वार्ताहर)-

मांजरी येथील हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेला श्री हजरत राजेबागस्वार उरूस शुक्रवार आज ता. २९ व शनिवार ता. ३० अखेर भरवण्यात येणार असून शुक्रवार ता.२९ रोजी संदल आहे.

शनिवार दि. ३० रोजी सायंकाळी वाद्यांच्या गजरात मिरवणुकीद्वारे गलीफ अर्पण करण्यात येवून नैवेद्य देण्यात येणार आहे.रात्री शाहिरी गाण्याचा कार्यक्रम होणार असून समस्त हिंदू मुस्लिम कमिटी मांजरी, उरूस कमिटी व मांजरी ग्रामस्थांच्या सहकार्यातून हा ऊरूस भरवण्यात येणार आहे.

वरुण उपाध्ये,संकेत वाणी याचे सुयश

संकेश्वर,ता.२८(प्रतिनिधी)-

बेळगाव संगीत कला मंच येथे घेण्यात आलेल्या तबला वादन परिक्षेत वरुण श्रीपाद उपाध्ये, संकेत वाणी हे द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

भारत गंधर्व महाविद्यालय मुंबई यांच्या मार्फत वेगवेगळ्या वाद्यांची बेळगांव तसेच अन्य केंद्रात परिक्षा घेण्यात आली.परिक्षेत हजारो विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आपल्या कलेचे सादीकरण केले.संकेश्वर संगीत शाळेचे शिक्षक अल्लाफ नदाफ यांचे बहुमोल मार्गदर्शन वरुण उपाध्ये, संकेत वाणी यांनी लाभले आहे.

शक्तीपीठ महामार्गाविरोधात २३० हरकती अर्ज

निढोरीतील शेतकऱ्यांचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

निढोरी,ता.२८(वार्ताहर)-

येथील शक्तीपीठ महामार्गातून निढोरी गावातील शंभर एकर पिकाऊ जमिनी व शेत शिवारातील जनावरांची व राहती घरे जाणार आहेत.त्यामुळे २३० शेतकरी भूमिहीन होणार आहेत.या सर्व शेतकऱ्यांनी साधानगरी ,कागलचे प्रांताधिकारी उपविभागीय भुसंपादन अधिकारी सुशांत बनसोडे यांना १ ते ७ नमुन्यातील भुसंपादीत जमिनीच्या विरोधात आक्षेप व हरकती अर्ज २३० शेतकऱ्यांनी सादर केले.

निढोरीचे माजी सरपंच अमित पाटील म्हणाले, यापूर्वी जमिनी जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्राथमिक बैठका, चर्चा, वारंवार घेऊन सर्व

प्रांताधिकारी यांना निवेदन देताना निढोरीचे माजी सरपंच अमित पाटील व इतर मान्यवर

अर्ज शासकीय अधिकारी यांना सुपुर्द केले आहेत. तर आता नाही तर कधीच नाही ही भूमिका घेत पाटील यांनी आपले मत अधिकारी वर्गाला सविस्तर पटवून दिले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य राहुल सुतार, बाजीराव चौगले, प्रशांत पाटील, विनायक मगदूम, सुभाष कळमकर, रोहीत कळमकर, रघुनाथ पावले, दत्तात्रय पाटील, सचिन पाटील आदी शेतकरी उपस्थित होते.

ओल्या-सुक्या चाऱ्यासाठी पशुपालकांची कसरत

पशुखाद्याच्या वाढत्या दराने दूध व्यवसाय अडचणीत

कोगनोळी,ता.२८(प्रतिनिधी)-

शेतीला जोडधंदा म्हणून शेतकरी दुग्ध व्यवसायाला प्राधान्य देतो. पण साखर कारखान्यांचे गळीत हंगाम संपत आल्यामुळे जनावरांसाठी उसाचे वाडे मिळणे बंद झाले आहे. त्यामुळे पशुपालकांना दुभत्या जनावरांसाठी अद्याप पावसाळा सुरु होईपर्यंत हिरव्या व सुक्या चाऱ्याची जमवाजमव करताना कसरत होत आहे. यामुळे दूध उत्पादनात कमालीची घट झाली आहे. त्यातच पशुखाद्य कंपन्यांनी खाद्याच्या दरात केलेल्या दरवाढीमुळे दुग्ध व्यवसायही अडचणीत आला आहे.

हुकमी पैसा देणारा व्यवसाय म्हणून शेतकरीवर्ग दुध व्यवसायाला प्राधान्य देऊ लागला आहे. सध्या ऊस हंगाम संपल्याने ओल्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ओला चारा कमतरतेमुळे पशुखाद्याच्या दरात दिवसेंदिवस वाढच होत चालली आहे.जानेवारी महिन्यापासून पशुखाद्यामध्ये सर्वच कंपन्यांच्या सामान्य पॅलेटच्या दरात ५० किलोचे पोते १०५० रुपये ते १९५० रुपयांपर्यंत झाले आहे. भुशाचे ४५ किलोचे पोते १३५० रुपये झाले आहे. सरकीच्या ४० किलोच्या पोत्याचा दर १२०० ते २००० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. साखर कारखान्यांच्या गळीत हंगाम समाप्तीनंतर काही शेतकऱ्यांनी स्वतःच्या जनावरांसाठी हिरवा चारा म्हणून हत्तीगवत, शाळू, मक्का ही पिके केली आहेत. पण ती विक्रीसाठी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यामुळे बहुसंख्य पशुपालकांना पावसाळा सुरु होऊन हिरवा चारा उपलब्ध होण्यासाठी अद्याप तीन-चार महिने अवधी आहे. यामुळे जनावरे जतन करणे नाकीनऊ येणार आहे. त्यामुळे पशुपालकांनी विक्रीसाठी उपलब्ध होणाऱ्या तयार कडबाकुट्टी व मक्का पिक घेण्यावर भर दिला आहे. ओल्या व सुक्या चाऱ्याची कमतरता आणि पशुखाद दरातील अव्वाच्या सव्वा वाढ झाल्याने शेतकरी मोठ्या कोंडीत सापडल्याचे चित्र ग्रामीण भागात सर्रास पहावयास मिळत आहे.

तब्बल २६ दिवस चालली दहावीची परीक्षा

गारगोटी,ता.२८(प्रतिनिधी)-

जीवनाला वळण देणारी आणि महत्वाच्या टप्प्यावरील परीक्षा म्हणजे दहावीची परीक्षा असते.ही परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी कमालीची धाकधूक आणि प्रचंड असे दडपण असते.यंदा ही परीक्षा तब्बल २६ दिवस चालली आणि शेवटचा भूगोलाचा पेपर दिल्यानंतर गेले वर्षभर तणावात असलेले विद्यार्थी खूपच आनंदले.

त्यांनी आपल्या आनंदाला अनेक मार्गांनी वाट मोकळी करून दिली.प्रत्येकाच्या जीवनात ही दहावीची परीक्षा येते.पूर्ण वर्षभर अभ्यासामुळे प्रचंड तणावात आणि

दहावीची परीक्षा संपल्यानंतर गारगोटी येथील परीक्षा केंद्राबाहेर आनंद व्यक्त करताना विद्यार्थी,विद्यार्थिनी.

दडपणाखाली हे वर्ष जाते.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची परीक्षा म्हणजे बोर्डाची परीक्षा असल्याने विद्यार्थी खूप अभ्यास करतात.यंदा दहावी आणि बारावी परीक्षा कांही अंतराव सुरू झाल्या.दहावीची परीक्षा १ मार्च रोजी मराठी विषयाच्या पेपरने सुरू झाली.बऱ्याच केंद्राव बैठक व्यवस्थांसाठी इमारत अपुरी पडते, पर्यायाने यंदा या दोन्ही परीक्षांचे पेपर एकाच दिवशी न घेता वेगवेगळ्या दिवशी घेण्यात आले.त्यामुळे यंदा ही दहावीची परीक्षा तब्बल २६ दिवस चालली. शेवटचा भूगोल विषयाचा पेपर होता.तो दुपारी १ वाजता संपला आणि विद्यार्थी परीक्षागृहातून आनंदाने बाहेर आली,गेले वर्षभर असलेला तणाव मावळला.

दुपारी एक वाजता परीक्षा गृह व परीक्षा केंद्रातून बाहेर आल्यानंतर हे विद्यार्थी व विद्यार्थिनी आपल्या मित्र परिवारास आलिंगन देत होते.पुन्हा भेटण्याचे आश्वासन देत एकमेकांचा निरोप घेत होते.परीक्षा केंद्राच्या बाहेर उत्साह आणि आनंदाबरोबर एक वेगळेच आणि काहीसे भावनिक वातावरण जाणवत होते.

उकाड्यापासून सुटकेसाठी मुलांची विहिरींकडे धाव

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

दिवसेंदिवस तापमानात प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे.त्यामुळे दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे देखील मुश्कील होत आहे. सध्या सर्वत्र सकाळच्या सत्रात शाळा सुरू असून, दुपारी अनेक शाळकरी मुले थंडावा मिळवण्याबरोबर पोहायला शिकण्यासाठी विहिरींवर गर्दी होत आहे.

कराड तालुक्यात उष्णतेच्या झळा जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे दुपारच्या वेळी बालचमूंनी आपला मोर्चा आंधोळीसाठी नदी, विहिरीकडे वळवला आहे. त्यामुळे सध्या विहिरी व नदीवर बालकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. उकाड्यापासून सुटका मिळवण्यासाठी युवकांचा विहिरी, नदीकडे ओढ वाढत असला तरी छोट्या मुलांवर पालकांनी लक्ष देण्याची गरज आहे.

पारायण सोहळ्या निमित्त काढण्यात आलेला दिंडी सोहळा.

खोतवाडीत पारायण सोहळ्याची सांगता

चरण,ता.२८(वार्ताहर)

खोतवाडी (ता.शिराळा) येथे श्री.संत तुकाराम महाराज विजोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या आखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळ्याची भक्तीमय वातावरणात सांगता झाली.

खोतवाडी येथील पारायण सोहळ्याचे व्यासपीठ चालक म्हणून हभप एकनाथ महाराज (खोतवाडी) यांच्या नेतृत्वाखाली सप्ताह कालावधीत काकड आरती,गाथावाचन,हरीपाठ,किर्तन असे दैनंदिन कार्यक्रम झाले.यामध्ये प्रामुख्याने अनंत महाराज सपकाळ (शिवरवाडी), शिवाजी महाराज मजे(मलेवाडी),बाजीराव महाराज भाडुगळे (भाडुगळेवाडी),मधुसुदन महाराज (फलटण),नारायण महाराज सलते(सलतेवाडी),शंकर महाराज मोरे(आंबवडे),पुरुषोत्तम महाराज पाटील(आळंदी),बाजीराव जाधव महाराज(सोनवडे) यांनी किर्तनातून ज्ञानदान केले. यावेळी प्रमोद कुंभार यांनी मृदंग वादनाने किर्तनात रंगत भरली.तसेच या पारायण सोहळ्यानिमित्त दिंडी सोहळा काढण्यात आला. यामध्ये महिला,पुरुष युवक,मुले मुली मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.दरम्यान हा सोहळा यशस्वी होण्यासाठी शंकरदादा मोहीते,यशवंत खोत,आनंदा कंदरे,तुकाराम खोत,सोपान खोत यांच्यासह सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

निधन वार्ता

आण्णाप्पा रवंदे

इचलकरंजी,ता.२८-

इचलकरंजीतील अवधूत आखाडा येथील प्रतिष्ठित नागरिक आण्णाप्पा गणपती रवंदे (वय ७५)यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून,तीन मुली,नातवंडे असा परिवार आहे.

प्रकाश कुलकर्णी

नृसिंहवाडी,ता.२८(प्रतिनिधी)- येथील संगीत विशारद प्रकाश उर्फ मोरेश्वर कुलकर्णी-आलासकर (वय ७३) यांचे निधन झाले. ज्योतिष, पंचांग व अनेक धर्मग्रंथांचे ते जाणकार होते.त्यांच्या पश्चात दोन भाऊ, बहीण असा परिवार आहे.



कर्नाटक-महाराष्ट्र हद्दीत वाहनांची अडवाअडवी

किरकोळ चुका शोधून पोलिसांकडून चालक, प्रवाशांना त्रास देण्याचा प्रकार

कोगनोळी,ता.२८(प्रतिनिधी)-

कर्नाटक-महाराष्ट्र हद्दीत सातत्याने वाहनांची अडवाअडवी होत आहे. किरकोळ चुका शोधून पोलिसांकडून चालक, प्रवाशांना त्रास देण्याचा प्रकार वारंवार घडत आहे. अशा प्रकारच्या अडवाअडवीमुळे गाडीमध्ये बसलेल्या प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

कर्नाटक हद्दीत जास्तीत जास्त एम.एच ०९ तर महाराष्ट्र हद्दीत जास्तीत जास्त के.ए २३ पासिंगच्या गाड्यांची अडवाअडवी करण्यात येत असल्यामुळे दोन्ही राज्यात येणाऱ्या प्रवासी व भाविकांना या अडवणुकीचा त्रास सहन करावा लागत आहे. एन्ट्री किंवा पावती ही करावीच लागत असल्याने वाहन चालकांना आर्थिक भुर्दंड ही सोसावा लागत आहे.

महाराष्ट्र राज्यातील विशेष करून

कोल्हापूर जिल्ह्यातील भाविक कर्नाटक राज्यातील चिंचली मायाक्का, सौंदत्ती, परशुरामगड, सोगल सोमनाथ, मंगसुळी खंडोबा यासह इतर प्रमुख देवस्थानांना मोठ्या प्रमाणात वर्षभर दर्शनासाठी जात असतात. सौंदत्ती यात्रेसाठी तर कोल्हापूर जिल्ह्यातून लाखो भाविक जात असतात. यावेळी कर्नाटक पोलीस या मार्गावर काही ठिकाणी वाहनांच्या तपासणीसाठी थांबलेले असतात. एम.एच ०९ असलेली गाडी हमखास थांबवितात आणि नियमानुसार सर्व कागदपत्रांची मागणी करत असतात. इतक्या लांब जाणाऱ्या प्रवासी वाहनांमध्ये काहीतरी त्रुटी आढळून येतच असते. परवडत नसल्याने एक-दोन प्रवासी जादा असतात. याचे कारण सांगून दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जातो. अशावेळी चालक-मालक प्रवाशांना होणारा त्रास, अडवणूक, गैरसोय, आडवळणी ठिकाण अशा अनेक कारणांमुळे पोलीस आणि चालक यांच्यामध्ये चर्चा होऊन मार्ग काढतात आणि पुढे निघून जातात.

महाराष्ट्र राज्यात कोल्हापूर जिल्ह्यातील महालक्ष्मी अंबाबाई, जोतिबा, कणेरीमठ, बाळूमामा, पन्हाळगड व इतर ठिकाणी दर्शनासाठी कर्नाटक राज्यातून मोठ्या संख्येने भाविक वर्षातील पावसाळ्यातील काही दिवस सोडले तर वर्षभर भाविक दर्शनासाठी येत असतात. कर्नाटकमध्ये जशा एम.एच ०९ च्या गाड्या तपासल्या जातात तशाच गाड्या महाराष्ट्रात देखील कागल लक्ष्मी टेकडी, उजळाईवाडी, सरनोबतवाडी, उंचगाव, कापशी लिंगनूर यासह अन्य ठिकाणी के.ए २३ नंबरच्या गाड्या हमखासपणे अडवून तपासल्या जातात आणि नंतर गाड्या पुढे सोडल्या जातात.

कर्नाटकातील घटप्रभा, येरगट्टी, सौंदत्ती डँमच्या पुढे अशा काही ठिकाणी हमखास पोलीस हात आडवे करून गाड्यांची तपासणी करतातच. व्यवस्थित दर्शन व्हावे आणि इतर पूजा करण्याकरिता भाविक रात्रीचा प्रवास करीत असतात. मध्यरात्री देखील पोलीस आपली ड्युटी बजावत असतात.एम.एच ०९ क्रमांकाची गाडी अडविल्याशिवाय राहत नाहीत. कोणतीही ओळख सांगितली तरी दखल घेतली जात नाही. कारवाईवर ठाम राहतात.अशा प्रकारच्या अडवाअडवीमुळे वाहनधारक व चालक धास्तावले आहेत.

पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

* खरेदी विक्री *

मेन रोड उत्तराभिमुख हिराप्पा लस्सीसमोर अरोमा बेकरीशेजारी बेसमेंट गाळा ९२५ स्के.फुट विकणे तसेच ग्राऊंड फ्लोअर पहिला व दुसरा मजला प्रत्येकी १२४ स्के.फुट एकत्रीत भाड्याने देणे. संपर्क- ९०३९६९३९६९

१ बीएचके व २ बीएचके फ्लॅट रेडी पझेशन विक्रीसाठी उपलब्ध, २४ तास पाण्याची सोय, लिफ्टची सोयीसह गणेश प्लाझा, कोल्हापूर बेकरी जवळ, जवाहरनगर इचलकरंजी. मो.९८९०११६१६१, ९४२२०४६११९

कोरोचीमध्ये वर्ग १ जमीन १०० गुंठे अर्जंट विकणे. हातकणंगले रामलिंग रोडटच ४ एकर औद्योगिक एन. ए. जमिन विकणे. मो. ८१४९९६५६९९.

ईदकरिता लखनवी कुर्ते, क्रोचेट, भरपूर व्हरायटीत कुर्ता मिळेल. शांती गारमेंट, गुरु चित्रमंदिर समोर, इचलकरंजी. मो. ७४८३४०३३०६.

लहान मुलांच्या रेडीमेड कपड्याचे दुकान बंद करणार असल्यामुळे सर्व कपडे एकदम विकणेचे आहे. संपर्क - धनराज, ९४२११००६०७, नितीन - ९९२३४५६८४९.

वेस्टर्न कंपनीची डिस्प्ले कोल्ड्रींक्स फ्रीज ३८० लिटर विकणे आहे. संपर्क- ९१११९४५५०५६, ८३०८६१६२७१

दोन मजली घर विकणे आहे. कबनूर, मो. ८४२१२९७८१२, ९५२९८९१२७४

रुई कबनूर रोडटच सर्व सोयीनियुक्त १९००,१२५०,२५००स्के.फुटचे एन ए प्लॉट देणे आहेत. मो. ९६७५७७१९८६, ७५१९५२०१४८

विकणे आहे - राधाकृष्ण थिएटर चौकात सर्व सोयीनियुक्त तयार केक सेटअप चालवणे/विकणे आहे. संपर्क - ८४२१४०८१९७, ९०११९२२५०७.

इचलकरंजीमध्ये मध्यवर्ती ठिकाणी जनता बँकेजवळ, नामांकित मल्टीब्रॅण्ड मेन्स शोरुम, आजवर हजारो ग्राहकांना सेवा देत सुरु असलेली सर्व अत्याधुनिक फर्निचर व फॅसिलिटीसहीत मालासहीत देणे आहे. मो. ७६२०३०८५०१.

जागा विकणे - मराठा चौक, जवाहरनगर, येथे १५ X ७० जागा शेडसह, सर्व सोयीनियुक्त, मो. ८८३०९७८५५२, इचलकरंजी.

वड्डी येथे ११ एकर बागायत शेतजमीन विकणे आहे. नदीची पाइपलाइन. मो. ९८२२३४७६८९

घर विकणे- २५X४० सर्व सोयीनियुक्त पुर्वमुखी बाथरुम गड्डी नं२ जवाहरनगर इचलकरंजी.मो.९६५७८३६२८७

जागा विकणे - कबनूर दर्गापासुन धुळोबा गॅस एजन्सी मागे थोड्याच अंतरावर ७०० स्के फुट एन ए प्लॉट अर्जंट विकणे आहे मो. ९५२७२८०२१७

बोअरवेल विषयक

चौगुले बोअरवेल्स इचलकरंजी ४१ वर्षाची परंपरा असलेली एकमेव डॉक्टरेट पदवीने सन्मानित कंपनी एका दिवसात ४॥। व ६॥। इंच बोअर मारुन मोटर बसवून देऊ. तसेच अर्थिकची कामे करू. डॉ.संजय चौगुले जुन्या बस स्टॅण्डसमोर इचलकरंजी ९३२५१४६८८४, ९४०४७४६८८४.

व्यवसाय विषयक

शेअर मार्केट बेसिक्स, इंट्राडे, ऑप्शन, सोप्या भाषेत शिका. प्रॉफिट फर्स्ट,कल्पना टॉकीज समोर मो. ७७६८९५००२१, ९६६५४०८८२८

वॉटर फिल्टर कँडल आणि सुपारी कटींग मशिनदुरुस्त करून मिळेल भरघोस कमवा. मो. ७०३०९३६६४०.

छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद

* नोकरी विषयक *

कामगार पाहिजे. संपर्क - ९५११८८६६२०,

मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण योजनेअंतर्गत ३५ बॅचेसना प्रवेश सुरू. १००% नोकरी व व्यवसायाभिमुख प्रशिक्षण CCOA, Tally, DTP,Ms- office कोर्सेस, दर्जेदार सखोल प्रशिक्षण, ISO Certificate नाममात्र नोंदणी फी, युनिव्हर्स कॉम्प्युटर्स, संपर्क ९०५५०५११७७.

पाहिजेत - ऑफिस कामासाठी एच. आर. इंटर्न व टेलीकॉलर लेडीज पाहिजे. संपर्क - ९३२२४९२६३५, इचलकरंजी.

लेडीज पाहिजेत - उत्कृष्ट पद्धतीने नाष्टा, जेवण, घरकाम करणेसाठी लेडीज पाहिजेत. मल्हारेश्वर बॉईज हॉस्टेल, मंगळवार पेठ, इचलकरंजी. मो. ९४२१२०६४७७, ८३९०२१४४९९.

इचलकरंजी येथे चालू असलेला हॉटेल लॉजीमसाठी संध्याकाळी, रात्री मॅनेजर व साफसफाईसाठी पुरुष पाहिजेत. संपर्क - ८४८४९८९३०१.

पॅकींगसाठी लेडीज पाहिजे. कामासाठी मुलगा पाहिजे. गारमेंटचे शिलाईचे काम घरी देऊ. मो. ८२०८०७९१३४, ९४०४२६८२५४.

पेट्रोल पंपावर काम करण्यासाठी कामगार पाहिजे. नदीवेस नाका, अशोक ऑटो मोबाईल, इचलकरंजी. मो. ९२३९६९३९६९.

कार ड्रायव्हर पाहिजे. इचलकरंजीमध्ये निर्व्यसनी सकाळी ९ ते सायं. ८, रविवार सुट्टी पगार १२-१३ हजार अनुभवानुसार. संपर्क - ९४२२४१८८७०.

नोकरीची संधी - सीएनसी/ व्हीएमसी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकसह शिका व नोकरी मिळवा. मो. ९३७२५५१२३४, इचलकरंजी.

हातकणंगले येथे व्हेज रेस्टॉरंटमध्ये तंदूर, चायनीज उस्ताद, किचन हेल्पर, वेटर व टेबलबॉय पाहिजे. मो. ८२९९५८१९९१.

आर्किटेक्ट ऑफिसमध्ये अनुभवी लेडीज/जेन्टस् रिसेप्शनिस्ट पाहिजे. शैक्षणिक पात्रता - बी.कॉम, कॉम्प्युटर ज्ञान तसेच इंग्रजी व मराठी टायपिंग आवश्यक. मो. ७८८९३००१७.

जयसिंगपूर येथे नवीन सुरु होणाऱ्या आईस्क्रिम पार्लरमध्ये कामाकरीता मुले/मुली पाहिजेत. मो. ८२९९५८१९९१.

कामगार पाहिजे - साडी दुकानामध्ये काम करणेसाठी अनुभवी लेडीज व जेंटस् कामगार पाहिजेत. चौकशी - शैलजा कापड केंद्र, मेन रोड, हॉटेल कुबेर शेजारी, इचलकरंजी. मो. ९८२२२५६६६६.

अर्जंट सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. शिक्षण १० वी, पगार १२ हजार १२ तास, संपर्क - ८४४६४६५११३७.

पाहिजेत - व्हीएमसी ऑपरेटर-२, अकौंटंट -२, लेथ ऑपरेटर -२, संपर्क - दत्तछाया इंजिनिअरिंग वर्क्स, इचलकरंजी. मो. ७२७६४४२८१३, ९९६०३०९३३९.

शिकाऊ/अनुभवी मेकॅनिक/ सेल्ससाठी लेडीज (१२ वी पास) बेसीक कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. संपर्क - बादशहा ई-बाईक शोरुम, इचलकरंजी. मो. ८००७८८२२००.

Wanted Teachers - For Science Academy 11th/12th Physics, Chemistry Faculty, Good Salary, Contact - 9822037778.

वाईन शॉपमध्ये गरजू आणि विश्वासू कामगार पाहिजे. वयाची अट १८ ते ३५ संपर्क - ९४०३२२८३८३.

Staff Required staff required for Audit, Taxation Finance and subsidy. Qualification - C.A./CA Inter/ CA Final Grduate post graduate Contact - Chougale & Associates Chartered Accountants, Near Bhagyarekha Talkies, Above Yes Bank, Ichalkaranji. Mo. 9423858214, Chougaleassociate@gmail.com Salary No. bar for Competent candidate.

शैक्षणिक क्षेत्रात कौन्सिलर पाहिजेत. अनुभवी प्राधान्य. पगार १०००० ते ३०००० (Target Base) इच्छुकांनी संपर्क साधावा. मो. ९९२२३१४३०९, ९१०५७४४३०६.

लेडीज रिशेप्सनिस्ट पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. समक्ष भेटा. पाटील आर्थोपेडीक हॉस्पिटल, चांदणी चौक, श्रीपाद नगर, इचलकरंजी.

कामगार पाहिजे. इचलकरंजी येथे फार्म हाऊसकरिता शेती कामाचा अनुभव असलेला कामगार पाहिजे. मो. ८४५९४५११५६.

सेल्स ऑफिसर नेमणे आहेत. (अनुभव आवश्यक) पत्ता - दास फूड ॲण्ड बेवरेजेस, पार्वती इंड. इस्टेट, यड्राव. मो. ९९२३०३४००६, ८२०८६३७७७६.

एअर कंडीशनर आणि कोल्ड स्टोरेज मेंटेनन्स व इंस्टॉलेशन कामासाठी शिकाऊ व होतकरु मुले पाहिजे. मो. ९६५१०७७८६९७.

पाहिजेत - शिटमेटल/ऑरगन वेल्डर सी.ओ.२ वेल्डर/हेल्पर पाहिजे. विशाल इंडस्ट्रिज, पार्वती गेट, खोतवाडी. मो. ९१४६७६९६५६, ८९९९५००७७३.

सरस्वती गारमेंट अनुभवी किंवा शिकाऊ ऑपरेटर पाहिजे. १ महिना मोफत ट्रेनिंग,२४० फिक्स पगार व मॅनेजर पाहिजे. पगार ७०००/- मो. ९८८१२३०००२.

ऑफिस कामासाठी १० वी, १२ वी जेन्टस् पाहिजे. टू व्हिलर आवश्यक. मो. ९५१९९५६०३०.

पाहिजेत - अनुभवी टर्नर, सेन्टर लेस ग्रायडिंग ऑपरेटर पाहिजेत. केदार प्रेसिजन कॉम्पोनन्टस, आंबेडकर पुतळ्याजवळ, इंड. इस्टेट, इचलकरंजी. मो. ९९१२२७३७०१, ९४२२४८२९९६.

सी.ए. ऑफिसमध्ये विवाहीत महिला पाहिजे. शिकाऊ/अनुभवी कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. पात्रता - बी.कॉम. मो. ९३२६६१६१२५.

लेडीज टेलीकॉलर पाहिजे. मराठी, हिंदी भाषेचे संभाषण कौशल्य व इंग्रजी बेसीक ज्ञान आवश्यक. पगार १० ते १५००० अनुभवानुसार, मो. ८८०५४१२५७७, ९१३००००९१०, इचलकरंजी.

इचलकरंजी येथे मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. ड्युटी ८ तास, दु. ३ ते रा. ११ कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. मो. ८३१९०२८१४४.

आयटीआय पदवीधारक अनुभवी/ शिकाऊ शिटमेटल कामगार/हेल्पर आणि अनुभवी वेल्डर पाहिजेत. अष्टविनायक इंडस्ट्रिज, इचलकरंजी. मो. ७०७५९५०९९.

प्रिंटींग पॅकेजिंग कामासाठी हेल्पर व ऑपरेटर पाहिजे. प्रभाकर इंडस्ट्रिज, इचलकरंजी. मो. ९३२५८२२२८८.

शुद्ध शाकाहारी हॉटेलमध्ये वेटर कामासाठी वेटर पाहिजेत. रहाणेची, जेवणाची सोय. मो. ८९७५६९८४७४, इचलकरंजी.

नेमणे आहे. मारुती अॅथोराईज्ड सर्व्हिस सेंटरमध्ये मारुती व्हेईकल रिपेअरिसाठी ट्रेन्ड मेकॅनिक पाहिजे व सर्व्हिसिंगसाठी लेडीज/जेंटस् पाहिजे. समक्ष भेटा. साई ऑटो लिंक्स, सांगली रोड, महासत्ता चौक, इचलकरंजी.

कामगार पाहिजे - बिअर शॉपीसाठी कौंटरवर कामगार पाहिजे. मो. ७०२०४६८९६४.

जयसिंगपूर कोंडिग्रे धरणगुत्ती इचलकरंजी येथे सिक्युरिटी गार्डस् व हाऊस किपिंग पाहिजेत. आकर्षक पगार, मो. ८४५०१०१०८७, ८४३२४७३२३१, ८५५१९४३२३१.

हॉस्पिटलसाठी जीएनएम/एएनएम नर्सिंग स्टाफ पाहिजे. मो. ९८८४७५७८९९, ८९७५५१९५०४५, इचलकरंजी.

लेडीज कामगार पाहिजे - संगमनगर, कोंडीग्रे, यड्राव, चिपरी, जांभळी येथील उमेदवारास प्राधान्य. मो. ७७२००१८४०६.

अनुभवी ऑफिसबॉय पाहिजे. मो. ७७२००१८४०६

कामासाठी मुले हवीत - वेळ संध्या ५ ते ११ वय १८ ते २५ पत्ता- हेवन पिझ्झा सुंदर बागेजवळ, इचलकरंजी - ८९९९५०८९३८

पतसंस्थेमध्ये वसुली अधिकारी नेमणे आहेत. स्वतःची दुचाकी आवश्यक. अनुभवींना प्राधान्य. मो. ७४४७४४४४९१, ७४४४४४५३९०.

लेडीज अकौंटट पाहिजे. पूर्ण वेळेकरिता शिकाऊ किंवा कॉम्प्युटर माहिती असलेली अकौंटट्स पाहिजे. पत्ता - शिवराज बॅटरी, कबनूर, मो. ९९२३९६०००८.

अनुभवी सेल्समन व शिकाऊ मुले फुल टाईम/पार्ट टाईम्स पाहिजेत. नूतन क्लॉथ सेंटर, मराठा मंडळ, इचलकरंजी. मो. ९४२२८२५९९४.

पाहिजेत - टू व्हिलर इलेक्ट्रीक शोरुमकरिता १) अकौंटट - लेडीज १ जागा, २) सेल्स एक्झीक्युटिव्ह ०२ जागा, जेंटस्, ३) मेकॅनिकल २ जागा जेंटस्, पेट्रोल किंवा इलेक्ट्रीक टुव्हिलरमधील कामाचा/ रिपेअरींगचा अनुभव असल्यास प्राधान्य. संपर्क -इथिक्स ऑटोमोटीव्ह (डिलर ऑफ कायनेटीक ग्रीन) मादुम मळा, सांगली रोड, फॉर्च्युन प्लाझाजवळ, बळवंत प्लाझासमोर, इचलकरंजी. मो. ७०३०६६४५४५, ९८६७५२२३४८.

साऊथ इंडियन कुक हवा आहे. संपर्क - ८८०६८७८७२९, ७५८८८३४४६१.

खोतवाडी-तारदाळ परिसरातील, ऑफिस कामासाठी लेडीज पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. संपर्क - आर्यन डायग्नोस्टिक्स, रिक्षा स्टॉपजवळ, खोतवाडी, मो. ९५१८३४८८५९, ९३७१७१७००१.

पार्ट टाईम/फुल टाईम कामगार पाहिजे. पत्ता - बालाजी बेकरी, एएसली कॉलेजवळ, इचलकरंजी. मो. ९९६०००२८२९.

बजाजसाठी कामगार व अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. झाले ब्रदर्स, कबनूर, मो. ९५५९२२२३४५, ९९६०९९८५९०.

शैक्षणिक संस्थेमध्ये टेलीकॉलर, शैक्षणिक सल्लागार पाहिजेत. आकर्षक पगार + इन्सेंटीव्ह + पेट्रोल भत्ता. संपर्क - ८६२४९८३४८६.

त्वरीत पाहिजेत - इचलकरंजी तारदाळ, हातकणंगले नामांकित कंपनीमध्ये सीएनसी/व्हीएमसी ऑपरेटर - ५०, शिक्षण १० वी, १२ वी, आयटीआय/डीएमई, अनुभव, फ्रेशर व अनुभवी सुरुवातीपासून पीएफ/ईएसआयसी, मो. ८८३०२६७३३०.

त्वरीत अनुभवी व्हीएमसी ऑपरेटर पाहिजे. पत्ता - हॉटेल राज केंसेलमागे, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९१३९९३४३११५, ७०७०१८९९४.

पाहिजेत - अनुभवी शेती मदतनीस पाहिजे. शैक्षणिक पात्रता - बीएससी ॲग्री किंवा ॲग्रीकल्चरल डिप्लोमा उत्तीर्ण. मो. ९८८१४८१९५८२.

सिक्युरिटी गार्डस् त्वरीत पाहिजेत. आकर्षक पगार, मो. ७०२०१९७९८०, ८२०८५११९९८८.

पूर्णवेळ रजिस्टर फिमेल फार्मासिस्ट पाहिजे. आकर्षक पगार, श्रद्धा मेडीकल, डॉ. बनकर यांच्या शेजारी, पंचवटी टॉकीज, इचलकरंजी.

त्वरीत सिक्युरीटी गार्डस भरती आहे, ठिकाण आवाडे पार्क, तारदाळ, हातकणंगले ८ तास ड्युटी पगार १२०००+पीएफ+ इएसआयसी,ठिकाण इचलकरंजी, १२ तास पगार १३०००+ पीएफ+ इएसआयसी,संपर्क- ८६६९५९९६४

शैक्षणिक विषयक

शेअर मार्केटमध्ये एक्सपर्ट होण्यासाठी सुनिश्चित नफा मिळवण्यासाठी प्रशिक्षण कोर्स प्राईम स्टॉक मार्केट अकॅडमी, इचलकरंजी मो. ७०२०६२३४२१, ९३०७७१९२४४

छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद

* भाड्याने देणे - घेणे *

सर्व सोयीनीयुक्त शेड भाड्याने मिळेल. कोल्हापूर रोड, व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूल मागे, पाटील मळा, कबनूर, मो. ९४२०४५४२२२.

२ बीएचके रो बंगलो भाड्याने देणे. भाडे १० हजार, डिपॉझीट २५ हजार, शांतीदूत अपार्टमेंटमागे, सोलगे मळा, इचलकरंजी. मो. ९८२२३२२०५३.

गाळा भाड्याने देणे - १२ X २० आण्णा रामगोंडा शाळेजवळ, भाजी मार्केटसमोर, इचलकरंजी. मो. ७७७६८०३०२३, ९३२६०२९४९३.

सर्व सोयीनीयुक्त १ बीएचके भाड्याने गहाणवट देणे आहे. (शाकाहारी फॅमिली) सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९७७००९१३५७, ८२२२०१००८.

घर भाड्याने देणे. प्रशस्त ३ रुमचे घर सर्व सोयीनीयुक्त, बोअरसह सिद्धेश्वर हौसिंग सोसायटी, शहापूर. मो. ९५५२६१२२०९.

१ बीएचके सर्व सोयीनीयुक्त आरसीसी भाड्याने देणे आहे. दातार मळा, गल्ली नं. १, लिंबू चौक, मथुरा हायस्कूलजवळ, इचलकरंजी. मो. ९५९५१८९६०३.

शेड भाड्याने पाहिजे. एएसली कॉलेजजवळ, ३००० ते ५००० स्के. फूट ७० एचपी लाईटसह ३ कनेक्शन, लाईट पर युनिट दर ३.९१ ते ४ प्लेन कोटा फ्लोअरींग. संपर्क - ९४२३८५७९९४.

१ बीएचके भाड्याने देणे तिसरा मजला/शाकाहारी, अरिहंत अपार्टमेंट, कागवाडे मळा, विकली मार्केट जवळ, इचलकरंजी. मो. ९३२६१४५०१९, ९४२१२०४०१२.

१ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे. अकॅडमीची मुले-पालक/सरकारी नोकरदारांसाठी सर्व सोयीनीयुक्त शहराच्या मध्यवस्तीत, मो. ७०२०१८२३३१, इचलकरंजी.

भाड्याने देणे आहे. १ बीएचके, फर्स्ट फ्लोअर सर्वसोयीनीयुक्त, शिक्षक सोसायटी, ठाकरे चौक, मो. ९४२१२०३८६५, जवाहरनगर, इचलकरंजी.

भाड्याने देणे - सर्व सोयीनीयुक्त २४ मागाची शेड/ऑफिस योगश्रम शहापूर येथे व १ आरके रुम आवाडे अपार्टमेंट येथे त्वरीत भाड्याने देणेचे आहे. संपर्क - ९४२२०४४९५१.

चालू स्थितीतील मेडिकल दुकान चालविणेस देणे आहे. राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. मो. ९९२३५१४४३३.

आरसीसी १ बीएचके सर्वसोयीनीयुक्त भाड्याने देणे आहे. पत्ता - सावित्रीनगर, शहापूर. मो. ८४१५०१९८७७, ७५०७९०९५५५.

२ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. ग्राऊंड फ्लोअर, नदी व बोअरचे पाण्याची सोय. शहापूर रोड, दत्त मंदिरशेजारी, मो. ९४२२५२३७७१.

ए.एस.सी. कॉलेज मागे पुजारी मळा, तिरंगा चौक, सर्व सोयीनीयुक्त आत बाहेर खोल्या भाड्याने देणे आहे. (छोटया फॅमिलीसाठी), मो. ९०११९२३२९९.

सर्व सोयीनीयुक्त १ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. अलायन्स हॉस्पिटलजवळ, जामदार मळा, गल्ली नं. ३, इचलकरंजी. मो. ९९६६८७५६८४.

२ बीएचके भाड्याने देणे. सर्व सोयीनीयुक्त बोअरसह, सरोजनी हॉस्पिटलजवळ, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९०७५९१२००९.

रो हाऊस बंगला भाड्याने देणे. १ बीएचके यशवंत रेसिडेन्सी, तोरणा नगर, नवचैतन्य अनाथालयाच्या मागे, सांगली रोड, इचलकरंजी. हणमंतसिंग राजपूत, मो. ९३७००५१८७७.

इचलकरंजीपासून ५ ते ७ किलोमीटर अंतरापर्यंत शेत जमीन भाडे तत्वावर पाहिजे. (तुती लागवडीसाठी) योग्य भाडे देऊ. मो. ८००७१९२७९०.

१ बीएचके फ्लॅट सर्वसोयीनीयुक्त लहान कुटुंबासाठी बोरींगसह भाड्याने देणे. संपर्क- ९६५७९४३४०६

आरसीसी डबल रुम पहिल्या मजल्यावर भाड्याने देणे आहेत, २४ तास पाणी, गुड लोकेशन, आदर्श कॉलनी, शिवमंदिरजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी, पाटील सर. मो. ९८८१८६२२३१, ७०२०७७८४४३

भाड्याने देणे आहे- शाहू पुतळ्याजवळ ३६लुमचा हॉल भाड्याने देणे आहे, संपर्क- ९०२१७७६२०० इचलकरंजी.

पॉवरलुम असोसिएशनच्या मालकीच्या मेन रोडवरील(एस.टी. स्टँड जवळ) मुख्य इमारतीतील पहिल्या मजल्यावरील १२५० स्के.फुटाचा हॉल व ११०० स्के.फुटाची स्वतंत्र इमारत त्वरीत भाडे तत्वावर देणे आहे. मो. ९४२२४१९९४३, ९९७५१३७७७६

२ बीएचके घर सर्वसोयीनीयुक्त भाड्याने देणे आहे. मो. ९५११२००१०४, बंडगर माळ, कलानगर, इचलकरंजी.

१५०० फूटांचा आरसीसी हॉल गोडावून, गारमेंटसाठी भाड्याने देणेचा आहे. सुर्वेनगर, चंदूर रोड परिसर, मो. ९६८९४४२०४३.

१ बीएचके आरसीसी सर्व सोयीनीयुक्त प्लॉट भाड्याने देणे. जवाहरनगर, इचलकरंजी (शुद्ध शाकाहारी) मो. ९३२६०११०५४.

शेड भाड्याने देणे - आरसीसी ४० X ४० इंडस्ट्रियल एरिया, आंबेडकर पुतळ्याजवळ, कमललक्ष्मी वेअर हाऊसनजीक, इचलकरंजी. मो. ७४४८२३९४४०.

आरसीसी ५५० स्के. फूटाचा दुकानगाळा भाड्याने देणे. ऑफिस, बँक, पतसंस्थाकरीता उपयुक्त संपर्क - एएसली कॉलेजसमोर, पाटील फोटो शेजारी, इचल. मो. ९०२२११०१९८.

कोरोची चिंतामणी गणेश मंदिराच्या डाव्याबाजूस गाळे व खोल्या (एच.के.) सर्व सोयीनीयुक्त भाड्याने देणे. मो. ९४२३८००७२३/ ८४८२५०६३५.

सांगली रोड बडबडे हॉस्पिटलसमोर, शाकाहारीसाठी नवीन २ बीएचके फ्लॅट व दुकान गाळा भाड्याने देणे आहे. मो. ९८८१३७६६०१.

कर्ज विषयक

होमलोन,मॉर्गेज लोन, करुन देऊ, कोणतीही प्रॉपर्टी चालेल. ज्यादा व्याजदराने कर्ज कमी व्याजदराने BT करुन मिळेल.मो. ८८३०९६९१३४, ९१३००६५०७१

मुद्रा लोन, आण्णासो पाटील व्याज परतावा, होम लोन, मॉर्गेज, खरेदी एन ए असो नसो ५ कोटीपर्यंत, फास्ट मंजूरी. मो. ९०९६०६६५०५, ७०५८७२१३२५.

मुद्रा लोन, बिन व्याजी व्यवसायासाठी लोन तयार घर किंवा रिकामा प्लॉट घेण्यासाठी कर्ज, मो. ८९९९९६४४२५.

एनए जागा साधे घर आरसीसी, कौलारु सर्व प्रॉपर्टीवर तारण कर्ज तसेच घर घेण्यासाठी बांधकामासाठी ३ लाख ते २० कोटीपर्यंत कर्ज मिळेल. मो. ९५९५१९९६२५, ९१३०६९००१०.

विवाह विषयक

लिंगायत वधुवर मेळावा रविवार ७ एप्रिल महालक्ष्मी मंदिर समुदाय भवन, गांधी चौक, कुंभार गल्ली. संकेश्वर, बेनाडे- ९८२३९९३४९०, ९७०१९६८५११

हुपरीत मराठा व सर्व धर्मीय वधुवर भव्य मेळावा रविवार दि.३१ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत पैसा फंड बँकेजवळ सपाटे मंगल कार्यालय, हुपरी. संपर्क- ९८८०३७५२३०, ९२९४४८६६८८

नृसिंहवाडी येथे मराठा वधुवर महामेळावा रविवार दि.३१ मार्च २०२४ रोजी सकाळी १०वा सर्व जातीय (प्रथम/पनर्विवाह इच्छुक) दुपारी २.वा स्थळ. श्री, अष्टविनायक संस्कृतीक हॉल, शिरोळ रोड, नृसिंहवाडी.मो. ७१४९६६०५९९

आरोग्य विषयक

दारूचे व्यसन खात्रीने सोडवा. १००% आयुर्वेदिक परिणामकारक. महिन्याच्या १, ३, ५ व्या रविवारी सकाळी ९ ते २, तानाजी चौक, लोकमान्य नगर, पंचगंगा साखर कारखान्याजवळ, कोरोची. मो. ७४९८००५१११

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलार, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग मिश्री इ. व्यसनमुक्तिसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) आणि नागाळा पार्क (कोल्हापूर). संपर्क- ८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६.

इतर

स्वतःचा भाजीपाला स्वतः पिकवा (ऑरगॅनीक व्हेजीटेबल) टेरेस गार्डनींग योग्य दरात करुन देऊ. मो. ९८९०९१६६०९

वडगाव विद्यालयात गुणवंत महिलांचा सत्कार

हेरले,ता.२८(प्रतिनिधी)- वडगाव विद्यालय व ज्युनिअर कॉलेज वडगाव मध्ये श्रीमती सुशीला देवी मल्हारराव देसाई युवती सचेतना फाउंडेशन तसेच इंडियन वुमेन सायंटिस्टस असोसिएशन कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त गुणवंत महिलांचा सत्कार करण्यात आला.

२५ हातागाड्यांसह, खोकी जप्त; कार्वे नाका ते भेदा चौक परिसरात कारवाई

कराड, दि. २८ (प्रतिनिधी) - येथील नगरपालिका प्रशासनाने शहरातील अतिक्रमण हटाव मोहिम हाती घेतली आहे. शहरात गुरुवार, दि. २८ रोजी कार्वे नाका ते भेदा चौक परिसरात राबवण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत तब्बल २५ हातागाड्यांसहीत खोकी पालिकेच्या पथकाने जप्त केली आहे. त्यात तब्बल ३० कर्मचारी, पाच ट्रक्टर, अधिकारी सहभागी झाले होते. पालिका प्रशासनाने मोहिम सुरु करण्याआधी पूर्व कल्पना दिल्याने काहींनी त्यांचे हातगाडे हलवले होते. काहींनी अतिक्रमणेही हटवली होती.

कराड पालिकेची अतिक्रमण हटाव मोहिम

कराड शहरात नगरपालिका प्रशासनाने तीन वर्षांपूर्वी शहरातील अतिक्रमणे नगरपालिका व पोलिसांच्या संयुक्त कारवाईत जमीनदोस्त केली होती. त्यानंतर शहरात अतिक्रमण हटाव मोहिम थंडावली होती. परंतु, सध्या निवडणूक आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर पालिकेने थेट अतिक्रमण हटाव मोहिम हाती घेतली आहे. शहरात १३ वर्षांपासून अतिक्रमण विरोधी पथक आहे. मात्र, त्याचे अस्तीत्व केवळ कागदावरच असल्याचे दिसून येत होते. आता ते पथक कार्यरत करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून पालिकेने अतिक्रमण हटाव मोहिम पहिल्या टप्प्यात हाती घेतली आहे.

त्यानुसार आज ३० पेक्षाही जास्त अतिक्रमणे हटविण्यात आली. त्यात पालिकेने २५ हातगाड्यांसहीत टप्न्या जप्त केल्या आहेत. येथील कार्वे नाका परिसरातून सकाळी ११ वाजता प्रत्यक्षात मोहिमेस प्रारंभ झाला. त्यात पालिका कार्यालय विभागाचे ३० पेक्षाही जास्त कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच या पथकात सर्व मुकादमही सहभागी झाले होते. अभियंता आर. डी. भालदार यांच्या नेतृत्वाखाली पालिकेची ही मोहिम सुरू आहे. कार्वे नाका ते भेदा चौकापर्यंत ती मोहिम राबविण्यात आली. यावेळी रस्त्यात विक्रीस बसलेल्यांना सूचना देण्यात आल्या. त्यासोबत त्यांचे साहित्य त्यांना नेवून देण्यात आले. ज्यांनी सूचना ऐकल्या नाहीत. त्यांचे साहित्य जप्त करण्यात आले. तब्बल २५ पेक्षा जास्त हातागाड्यांसहीत टप्न्या पालिकेने जप्त केल्या आहेत.

मोहीम सुरूच राहणार

दरम्यान, शहरातील बस स्थानक परिसरासह अन्य भागातही ही अतिक्रमण हटाव मोहीम सुरु राहणार आहे. यासह शहरातील अन्य परिसरात असलेली अतिक्रमणे संबंधितांनी स्वत:हून काढून घ्यावीत. अन्यथा, त्यावर पालिकेच्या पथकाकडून कारवाई करण्यात येईल. तसेच सदरचे साहित्य जप्त करण्यात येणार असल्याचे अभियंता आर. डी. भालदार यांनी सांगितले.

नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान बनविण्यासाठी भाजपला निवडून द्या : जगदीश शेट्टर

बेळगाव,ता.२८(प्रतिनिधी)- बेळगाव भाजपमध्ये कोणतेही मतभेद नाहीत.आम्ही सर्व एकसंघ आहोत. माजी मुख्यमंत्री येडियुराप्पा यांच्या उपस्थितीने सर्व मतभेद दूर झाले आहेत. यंदा पुन्हा बेळगाव मतदारसंघातून भाजप उमेदवाराला निवडून देत नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान बनवण्याचे आवाहन बेळगाव भाजप लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार जगदीश शेट्टर यांनी केले.आज बेळगाव शहरात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

बेळगाव: पत्रकार परिषदेत बोलताना उमेदवार जगदीश शेट्टर.

ते पुढे म्हणाले, बेळगाव ही माझी कर्मभूमी असून बेळगावच्या विकासासाठी अनेक योगदान मी दिलेले आहे. विरोधी नेते मी बाहेरून आल्याचा अपप्रचार करीत आहेत. याआधी बेळगाव जिल्हा पालकमंत्री म्हणून मी बेळगावचा विकास साधला आहे.माजी मुख्यमंत्री बी.एस.येडियुरप्पा यांच्या उपस्थितीत बेळगाव भाजपमधील मतभेद आता दूर झाले आहेत. ज्यानुसार दिवंगत सुरेश अंगडी आणि त्यांच्या पत्नी मंगला अंगडी यांना पाठिंबा दिला होता त्या प्रकारे आपल्यालाही पाठिंबा देऊन यंदा पुन्हा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान बनवण्यासाठी आपल्याला आशीर्वाद देण्याचे आवाहन केले.

यावेळी त्यांनी काँग्रेस सरकारवर जोरदार टीका केली. गोहत्या कायदा , धर्मांतर कायदा रद्द करण्याची घोषणा केलेल्या काँग्रेस नेत्यांकडून निवडणुकीवेळी भगव्याचा वापर केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

काँग्रेसला पराभवाची भीती वाटू लागली आहे. तसे त्यांचेच आमदार उघडपणे सांगत आहेत. आगामी निवडणुकीनंतर काँग्रेस सरकार पडेल असा दावा त्यांनी केला.

पत्रकार परिषदेला आमदार अभय पाटील, भाजप महानगर जिल्हाध्यक्ष गीता सुतार, ग्रामीण भाजप जिल्हाध्यक्ष सुभाष पाटील, राज्यसभा सदस्य इराण्णा कडाडी, राजशेखर डोणी, खासदार मंगला अंगडी, ॲड. एम. बी. जिरली, माजी विधान परिषद सदस्य महांतेश कवठगीमठ यांच्यासह भाजपचे नेते उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

दै.महासत्ता वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहिरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या आधारे आपल्या व्यवहारापुर्वी दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

व्यवस्थापक

कोल्हापुरात तिघा फाळकुटदादांना अटक

कोल्हापूर ता.२८ (प्रतिनिधी)–

लक्ष्मीपुरी परिसरातील एका बारच्या दारात दोघा युवकांना बेदम मारहाण करून त्यांच्या खिशातील मोबाईल काढून घेतला होता. या प्रकरणी तिघा अनोळखी युवकांवर संतोष संभाजी मोहिते (वय २९ रा.तामगांव ता.करवीर) याने लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलीसांना केवळ संशयीतांचे वर्णन समजले होते. या आधारे त्यांना जेरबंद करून त्यांच्याकडून मोबाईल जप्त केला.

आशुतोष विकास देवरे (वय १९ रा.दळवी कॉलनी, उजळाईवाडी), रोहित सतीश गोसावी (वय २८ रा.शिवाजी पेठ), प्रतिक कृष्णात कोकणे (वय ३१ रा.जगतापनगर, पाचगाव) या तिघांना पोलीसांनी अटक केली. त्यांच्याकडून चोरलेला मोबाईल जप्त केला आहे.

पोलीस निरीक्षक दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विठ्ठल जाधव तपास करीत आहेत.

खून प्रकरणी चौघांना चार दिवसांची पोलीस कोठडी

कराड,ता.२८ (प्रतिनिधी) –

म्होप्रे, ता. कराड येथे जागा वाटपावरुन धारदार चाकूने वार करून एकाचा खून केल्याची घटना बुधवारी घडली होती. याप्रकरणी चौघांना पोलिसांनी पाठलाग करुन अटक केली. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, चाकू हल्ल्यात जखमी झालेल्या अन्य दोघांवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगीतले.

प्रकाश बाबुराव पाटील (वय ६०) रा. म्होप्रे, ता. कराड असे खून झालेल्याचे नाव आहे. तर चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झालेले किराण संकपाळ आणि किशोर संकपाळ यांच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी रणजीत माणिकराव जाधव (वय ३१), रा. गोळेश्वर व अनिल रमेश संकपाळ (वय ३०), सुनील रमेश संकपाळ (वय २४) दोघेही रा. म्होप्रे आणि सुरज निवास सावंत (वय २२) रा. सूर्यवंशी मळा, कराड यांना पोलिसांनी अटक केली आहे.

कराड : खून प्रकरणी ताब्यात घेतलेल्या चौघांसह पोलीस अधिकारी व कर्मचारी.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, म्होप्रे येथील दिलीप संकपाळ व त्यांचा भाऊ रमेश संकपाळ यांच्यात पत्र्याच्या शेडच्या जागा वाटपावरून वाद होता. बुधवारी दिलीप संकपाळ हे शेडचे काम करीत असताना रमेश यांची मुले अनिल व सुनील यांनी शेडच्या कामाला विरोध केला. त्यावेळी दिलीप संकपाळ यांची मुले किरण व किशोर यांच्याशी त्यांचा वाद झाला. हा वाद सुरू असतानाच प्रकाश पाटील हे मध्यस्थी करण्यासाठी त्याठिकाणी आले. मात्र, अनिल व सुनील या दोघांनीही कोणाचेच ऐकले नाही. त्यानंतर प्रकाश पाटील तेथून निघून गेले. दरम्यान, अनिल व सुनील यांनी त्यांचा नातेवाईक असलेल्या रणजीत जाधव याला बोलावून घेतले. रणजीत जाधव हा त्याचा मित्र सुरज सावंत याला घेऊन कारमधून म्होप्रे येथे आला. त्याठिकाणी त्यांनी किरण आणि किशोर संकपाळ यांच्यावर सुरूवातीला वार केले. त्यानंतर बसथांब्यानजीक प्रकाश पाटील यांच्यावरही चाकूने वार करून त्यांचा खून केला.

उपअधीक्षक अमोल ठाकूर, पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप, सहाय्यक निरीक्षक अभिजीत चौधरी, अर्चना शिंदे, उपनिरीक्षक सचिन भिलारी यांच्यासह गुन्हे शाखेचे अंमलदार नितीन येळवे, सज्जन जगताप, उत्तम कोळी, सचिन निकम, प्रफुल्ल गाडे यांच्यासह पथकाने दोन आरोपींना मलकापूर येथून, तर दोन आरोपींना कजहाडातील शिवाजी स्टेडियम येथून ताब्यात घेतले. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक सचिन भिलारी तपास करत आहेत.

बेळगावात दुचाकी चोरी प्रकरणी एकाला अटक ; ४ दुचाकी जप्त

बेळगाव,ता.२८(प्रतिनिधी)–

बेळगाव शहरातील सदाशिवनगर व खडेबाजार येथे पार्क केलेल्या दुचाकी चोरणाऱ्या आरोपीला एपीएमसी पोलिसांनी अटक केली. संजू मल्लाप्पा मेकली असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून १,३५,००० रू.किमतीच्या ४ दुचाकी पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

सदाशिवनगर आणि खडेबाजार येथे पार्क केलेल्या दुचाकी चोरल्याच्या घटना घडल्यानंतर अशा दुचाकी चोरांना शोधण्याच्या सक्त सूचना पोलिस आयुक्त इडा मार्टिन यांनी दिल्या होत्या. त्यानंतर आरोपी संजू मल्लाप्पा मेकली याला पोलीस स्थानकात आणून चौकशी केली असता, त्याने दुचाकी चोरल्याची कबुली दिली. याप्रकरणी एपीएमसी स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुभाष शेटके यांचे निधन

इचलकरंजी,ता.२८–

आण्णा रामगोंडा शाळेजवळील प्रतिष्ठीत नागरीक सुभाष रामचंद्र शेटके यांचे गुरूवार दि. २८ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

मयताच्या वारसांना १५ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश

इचलकरंजी,ता.२८–

राधानगरी– माजगाव येथील नंदकुमार पांडूरंग गायकवाड (वय–४४) हे मोटरसायकल (क्रं. एम.एच.०९–ईएच४०४२) वरून गारगोटी ते उत्तूर प्रवास करताना पांगिरे गावचे हद्दीत रोडवरती समोरून येणारे ट्रक (नं. एम.एच.०९–एफएल–२००३) ने धडक दिलेने ते मयत झाले होते. याप्रकरणी अपघात नुकसान भरपाईचा दावा ट्रक मालक व चालक अमोल बापूसाहेब गायकवाड विमा कंपनी एचडीएफसी इरगो जनरल इन्शुरन्स कंपनी यांचेवरती दाखल केला होता. त्याचा नुकताच निकाल होऊन विमा कंपनीने १५ लाखांची नुकसान भरपाई मयताचे वारसांना देणेचा आदेश केला.

फिर्यादीच्यावतीने ॲड.सी.बी. कोरे (रेंदाळकर) यांनी काम पाहिले.

बेकायदेशीर दारू विकणाऱ्यावर कारवाई

सांगली,ता.२८ (प्रतिनिधी)–

आनंद टॉकीज परिसरात चोरून बेकायदेशीर देशी दारू विक्री करणाऱ्या तरुणावर सांगली शहर पोलिसांनी कारवाई केली. या व्यक्तीकडून ४७ हजार ९७० रुपयांची बेकायदेशीर दारू जप्त केली आहे. राहूल अरुण हिंगमिरे (वय ३४ रा. जामवाडी, सांगली) असे कारवाई केलेल्या तरुणाचे नाव आहे. सदरची कारवाई बुधवार दि. २७ मार्च रोजी सायंकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. या प्रकरणी कॉन्स्टेबल सुमित सूर्यवंशी यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सध्या सुरु आहे. या पार्श्वभूमीवर अवैध दारू विक्रीवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांनी दिले आहेत. त्या प्रमाणे सांगली शहर पोलीस ठाण्याचे कॉन्स्टेबल सुमित सूर्यवंशी हे बुधवार दि. २७ मार्च रोजी सायंकाळी शहरात पेट्रोलिंग करत होते. यावेळी त्यांना संशयित राहुल हिंगमिरे हा मारुती रोडवरील आनंद टॉकीज जवळ भिंतीच्या आडोशाला सायंकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास स्वतःच्या कब्जात देशी दारू ठेऊन त्याची बेकायदेशीर विक्री करताना आढळला. यावेळी त्याला ताब्यात घेतले असता मोठ्या प्रमाणात देशी दारू सापडली. यावेळी त्याच्याकडून एकूण ४७ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत सांगली शहर पोलीस ठाण्यात कारवाई करण्यात आली.

आठ वर्ष पसार असलेल्या आरोपीला अटक

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)–

सैन्य दलात नोकरी लावतो असे सांगून ३८ लाख रुपयांची फसवणूक केल्याबदद्‌ल संशयीत आरोपी बाजीराव शामराव मोहिते (वय ४६ रा.नागाळा पार्क,सध्या महालक्ष्मीनगर,मणेर मळा) याच्यावर २०१६ रोजी शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा घडल्यापासून संशयीत मोहिते फरारी होता. मोहिते कोल्हापुरात आल्याची माहिती शाहूपुरी पोलीसांना समजल्यानंतर गुरुवारी सकाळी पोलीसांनी तातडीने त्याला अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता २ एप्रिल, पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. रणजित विष्णू सावरतकर यांनी पोलीसात फिर्याद दिली होती.

कडब्यासह झाडे–झुडपे आगीच्या भक्षस्थानी

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

निपाणी समाधीमठरोड सुतार ओढा शेजारी असणारी मधुसूदन (राजन) शंकरराव चिकोडे यांच्या पिकाऊ शेत जमीन मधील कापुन ठेवलेली ज्वारी व कडबा यास आज दुपारी २ वाजणेच्या सुमारास अचानक आग लागल्यामुळे जवळपास ३० हजार रूपयांची आर्थिक हानी झाली आहे. रयत पुंडलिक माने, बंडा बलगुडे,सुरज माने इत्यादी शेतकरी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करीत होते .पण ही आग आटोक्यात न येता ओढ्याकडील झाडे झुडपे, कडबा,ज्वारीची कणसे याकडे पेट घेतल्याने निपाणी अग्नीशामन गाडी मागवून घेतली. अग्नीशमन दलाचे अधिकारी जकाप्पा कोरवी, बसवरा दोणवाडे, डी.एल.कोरे एल व्ही.बंजत्री,जे.डी.कमते यांनी शर्थीने आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केला.

पाईप लाईन मधून चोरून पाणी कनेक्शन ; दोघांवर गुन्हा

मिरज,ता.२८ (प्रतिनिधी)–

मिरज तालुक्यातील नावरसवाडी गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईन मधून चोरून पाणी कनेक्शन घेतल्याचा प्रकार उघडकीस आला. दि. ०१ मे २०२२ ते बुधवार दि. २७ मार्च २०२४ या कालावधीत पाणी चोरीची घटना घडली. या प्रकरणी ग्रामविकास अधिकारी बसगोंडा आनंदा पाटील यांनी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी पाणी चोरी प्रकरणी धोंडीराम भाऊ जाधव (वय ६०) आणि प्रदीप धोंडीराम जाधव (वय ४० दोघे रा. नावरसवाडी) या दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि, मिरज तालुक्यातील नावरसवाडी वस्ती साठी पाणी पुरवठा करण्याची पाईप लाईन टाकली आहे. सदरच्या पाईप लाईन मधून संशयित धोंडीराम जाधव आणि प्रदीप जाधव यांनी दि. ०१ मे २०२२ ते बुधवार दि. २७ मार्च २०२४ या कालावधीत विना परवाना अर्धा इंच पाईप लाईन टाकून पाणी कनेक्शन चोरून घेतले होते. गेल्या दोन वर्षांपासून सदरचे पाणी चोरून ते वापरात होते. सदरचे पाणी हे त्यांच्या शेतीसाठी आणि व्यवसायासाठी वापरत असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी बसगोंडा पाटील यांना मिळाली होती. यांनतर सदरची पाईप लाईन चेक करून कनेक्शन बंद केले होते. यानंतरही त्यांनी पुन्हा कनेक्शन जोडून घेतले होते.

सदरचा प्रकार उघडकीस आल्यानंतर पाटील यांनी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी संशयित दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

हातकणंगले मधून लढण्यास डॉ. चेतन नरकेंचा नकार

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी) –

जनता हाच माझा पक्ष म्हणत गोकुळचे संचालक डॉ. चेतन नरके यांनी हातकणंगले लोकसभा मतदार संघातून मविआकडून लढण्यास नम्रपणे नकार दिला आहे.मात्र कोल्हापूर लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक रिंगणात आपण शंभर टक्के असणार असून जनता हाच माझा पक्ष म्हणज डॉ. चेतन नरके यांनी कोल्हापूर लोकसभा मतदार संघातून लढण्याचे दिले स्पष्ट संकेत.

गेल्या तीन वर्षांपासून कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून निवडणुक लढविण्यासाठी तयारीला लागलेले आणि महाविकास आघाडीतून इच्छुक असलेले गोकुळचे संचालक डॉ. चेतन नरके यांनी हातकणंगले लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढविण्याच्या शिवसेना (उबाठा) पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या प्रस्तावाला नम्रपणे नकार दिला असून उध्दव ठाकरे, खासदार संजय राऊत यांनी आपल्यावर विश्वास व प्रेम दाखविले असून त्यांचे तसेच खासदार शरदचंद्र पवार,माजी मंत्री जयंत पाटील तसेच काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचे आभार व्यक्त केले, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत यांनी माझ्यावर विश्वास ठेवला. माझ्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून त्यांनी हातकणंगलेचा पर्याय दिला. मात्र, खासदार राऊत यांच्याशी फोनवरून संपर्क करून त्या प्रस्तावाला नम्रपणे नकार दिला असल्याचेही ते म्हणाले.

शिवसेना (उबाठा) पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांनी हातकणंगले मधून निवडणूक लढविण्याचा प्रस्ताव दिला होता, मात्र या प्रस्तावाचा सन्मानपूर्वक नकार देत कोल्हापूरमधूनच निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे डॉ. चेतन नरकें यांनी आज पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. ते म्हणाले, कोल्हापूरची जागा शिवसेनेच्या वाट्याला आली असती तर माझी उमेदवारी नक्की होती. मात्र, जागा काँग्रेसला गेली. मात्र, मी अजूनही कोल्हापूर मतदार संघाच्य निवडणूक रिंगणातून बाहेर पडलेलो नाही. मी शंभर टक्के कोल्हापूरच्या रिंगणात असणार असून जनताच माझा पक्ष असल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

दोन दिवसांपूर्वी शिवसेना (उबाठा) पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांची डॉ. चेतन नरके यांनी भेट घेतली होती. या भेटीत नरके यांना हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून ठाकरे गटाकडून उमेदवारी घ्यावी, असा प्रस्ताव ठेवला होता. त्यानंतर नरके हे काय भूमिका घेणार याकडे साऱ्या जिल्हयाचे लक्ष लागून राहिले होते.

भ्रष्टाचार प्रकरणात पुराव्याअभावी प्रफुल्ल पटेलांना सीबीआयकडून क्लीनचीट

नवी दिल्ली,ता.२८–

भ्रष्टाचार प्रकरणात कोणताही सबळ पुरावा नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांना सीबीआयकडून क्लीनचीट देण्यात आली आहे. त्यामुळे पटेल यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सीबीआयने दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टात क्लोजर रिपोर्ट दाखल केला. त्यानंतर आता प्रफुल्ल पटेल यांच्याविरोधातील ही केस बंद झाली आहे.

नागरी विमान वाहतूक मंत्री असताना प्रफुल्ल पटेल यांनी भ्रष्टाचार करुन कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप त्यांच्यावर होता.

जाहीर नोटीस

जि. कोल्हापूर, ता. शिरोळ पैकी मौजे कोंडिग्रे येथील ग.नं. २०६ पैकी क्षेत्र हे ०.२६.०० आर यासी चतु:सिमा पुर्वेस–श्री.भुजगडे यांची मिळक्त,पश्चिमेस–श्री. हांडे यांची मिळक्त, दक्षिणेस – ओढा, उत्तरेस– श्री. शिरगावे यांची मिळक्त येणेप्रमाणे चतु:सिमेतील शेत जमिन मिळक्त ही श्री. गणेश केशव नेमिष्टे, रा. इचलकरंजी यांचे मालकी कब्जा वहिवाटीची मिळक्त असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकारदाखल रक्कम स्विकारुन त्यांना तोंडी करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचा, कोणताही हक्क,करार,दावा, पोटगी, इजमेंट इ. वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसाच्या मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.मुदतीनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस. ता. २८/०३/२०२४.

ॲड.दिपक मारूती कदम

वेताळपेठ, तारदाळ,
ता. हातकणंगले,जि. कोल्हापूर.
मो. ९९२२५८५२८८.

जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नंबर ९९ पैकी बिगरशेती प्लॉट नंबर ८ चे क्षेत्र ४३०९–०० चौरस फुटची खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस–बशीर जमादार यांची मिळकत पश्चिमेस – प्लॉट नंबर ७ ची मिळकत दक्षिणेस– २० फुट रस्ता, उत्तरेस– नरेंद्रकुमार जैन यांची मिळकत सदरची मिळकत ही राजाराम निवृत्ती व्हरवडे रा– इचलकरंजी यांचे मालकीची मिळकत त्यांनी आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्वीकारून त्यांना वर नमुद मिळकतीचा खरेदीपूर्व करार दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. २८/०३/२०२४

ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे

रा.३/१५३, देवमोरे वाडा,
टाकवडे वेस, राणाप्रताप
चौक, इचलकरंजी
मो.नं. ९८८१०१४७२५

जाहीर नोटीस

१) ता. हातकणंगले पैकी मौजे तारदाळ व श्री चाडेश्वरी सहकारी गृह निर्माण संस्था मर्या. तारदाळ या संस्थेच्या हद्दीतील क. ग. नं. ४८०, ४८१, ४८३, ४८४, ५०५ ते ५०९ यापैकी बिगरशेती भुखंड नं. ३४२ याचे क्षेत्र १८५ .७७ चौ.मी.ची खुली भुखंड मिळकत यांसी चतु:सिमा पुर्वेस :– भुखंड नं . ३४३ ची मिळकत, पश्चिमेस :– भुखंड नं. ३४१ ची मिळकत, दक्षिणेस :– भुखंड नं. ३६० ची मिळकत व उत्तरेस :– सरकारी रस्ता. येणेप्रमाणे चतु:सिमेतील खुली भुखंड मिळकत. २) वरील मिळकत ही श्री चाडेश्वरी सहकारी गृह निर्माण संस्था मर्या. तारदाळ यांचे मालकीची असुन त्यांनी वरील मिळकत 'श्री अरविंद शंकरराव बागडे' यांना ॲलॉट केलेली आहे व ते सदरील संस्थेचे सभासद आहेत. सदरील वरील मिळकत संस्थेचे मान्यतेने हस्तांतरण करून देणेचे ठरवुन त्यांनी आमच्या अशिलांशी करारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे. ३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क, करार, तारणगहाण दस्त, कोर्ट केसेस, वारसा हक्क वगैरे हक्कसंबध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती लेखी कळवावे. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही ता.२७–०३–२०२४

ॲड. पंकज आ. पाटील

ऑफिस– 'श्री दत्त अपार्टमेंट'
गाळा नं. १, सांगली नाका,
इचलकरंजी.
मो. ९०२१२३७६८७

जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ६५४ पैकी प्लॉट १अ चे क्षेत्र – ११८ – ६३ चौ. मी खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस –प्लॉट नं.१ ची मिळक्त, पश्चिमेस – प्लॉट नं. २ ची मिळकत, दक्षिणेस – २० फुट रूंदीचा रस्ता, उत्तरेस – नलवडे यांची मिळक्त. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळक्त ही मुळ किरण लक्ष्मण डंबाळ यांचेकडून विनोद दत्तात्रय कोराणे रा. तारदाळ यांनी करारपत्राने घेतलेली व त्यांनी आमचे अशिलांशी मिळक्त निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन भरीव संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस. सही ता. २७/०३/२०२४

ॲड. बाबासो एम. पाटील

ॲडव्होकेट ॲन्ड नोटरी पब्लिक, रा.१७/७७,
स्वामी विवेकानंद कॉलनी,
इचलकरंजी
मो.नं.९२२६८८७००१

जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ६३९, ६४१,६४२ व ६४३ पैकी प्लॉट नंबर ६१ चे क्षेत्र ९६–६५ चौरस मिटर ची खुली जागा मिळकत यासि चतु:सिमा पुर्वेस – प्लॉट नं ६०, पश्चिमेस – ३० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस– १० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस– प्लॉट नं ४४. सदर ची मिळकत गजानन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित तारदाळ यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यानी सदर मिळकत श्री. नामदेव यल्लाप्पा वडर व श्री महादेव रामा पवार रा. इचलकरंजी यांना ॲलोट केलेली आहे.व त्यांनी आमचे अशिलांचेकडुन संचकार रक्कम स्वीकारून त्यांना हस्तांतरणपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. २७/०३/२०२४.

ॲड.आनंद प्रकाश पटवा

रा.आसरानगर, बसस्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

जाहीर नोटीस

मौजे शहापूर इचलकरंजी महापालिका हद्दीतील गट नंबर ४६९ पैकी प्लॉट नंबर २८ पैकी पश्चिम बाजूचे क्षेत्र ९२–९३ चौ. मी म्हणजेच १००० चौरस फुट याचा सि.स.नंबर १९६३२ यासि चतु: सिमा– पुर्वेस – सि. सि. नंबर – १९६३२ ची उर्वरीत मिळकत, पश्चिमेस – भुखंड क्र. १९६३४ ची मिळकत, दक्षिणेस– भुखंड क्र. १९६३४ ची मिळकत, उत्तरेस– ३० फुट रुंदीचा रस्ता. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत श्री पंकज राजू निप्पाणे रा. इचलकरंजी यांच्या मालकी ची

असून त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असललेचा निर्वाळा देवून आमचे अशिलांना खरेदी देवू केलेली आहे. सबब, सदर मिळकती बाबत कोणाचाही कसलाही हक्क सबंध, करार, बोजा वैगेरे असलेस तो त्यांनी आजपासून ०७ दिवसाचे आत आम्हास खालील पत्त्यावर कागदपत्रांसह लेखी पटवून द्यावा. म्हणुन दिली जाहीर नोटीस अशी दि. २८/०३/२०२४

ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे

रा.३/१५३, देवमोरे वाडा,
टाकवडे वेस, राणाप्रताप
चौक, इचलकरंजी
मो.नं. ९८८१०१४७२५

जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की, मिळकतीचे वर्णन – जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी मौजे वडगाव येथील सि.स.नं. ३२८ क्षेत्र २३६.२० चौ.मी. ची खुली मिळकत याचा ग्रा.पं. मालमत्ता नं. २४५ असा नमूद असून यांसी चतु:सिमा– पुर्वेस – मौजे वडगाव ग्रामपंचायतीची मिळकत, पश्चिमेस – रस्ता, दक्षिणेस– दत्तात्रय परीट यांची मिळकत व उत्तरेस– हसन गौस हजारी यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत.

वर नमूद मिळकत ही प्रविण प्रल्हाद लोहार व विठ्ठल चंद्रकांत गरड, दोघे रा. मौजे वडगाव यांचे समाईक मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल यांना खरेदी देणेचा तोंडी करार करुन संचकारदाखल भरीव रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी असलेचा निर्वाळा मिळकत मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे. तथापि, सदर मिळकतीबाबत कोणाचाही, कोणताही, कसलाही हक्कसंबंध, करार, तारण, गहाण, तसेच वित्तीय संस्था कर्ज बोजा, दावा, पोटगी, बक्षिस, कुळहक्क वगैरे हितसंबंध असलेस त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी मुळ कागपदत्रासह खात्री पटवून द्यावी. मुदतीनंतर कोणतीही तक्रार आमचे अशिल अगर त्यांनी खरेदी केले सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही.

ता. २८/०३/२०२४

ॲड. सी.बी. साळुंखे

रा. ९/१३/१, सांगली रोड, इचलकरंजी.
मो. ९४२२०४४२११.

जाहीर नोटीस

ॲड. श्रीधर ए. पाटील यांनी ता. २०–११–२०१३ इ. रोजी प्रकाश उर्फ रामगोंडा सिदगोंडा पाटील रा. चंदूर हे

व्यसनाधिन झालेचे, मानसिकदृष्ट्या विकलांग झालेचे तसेच ते काय करतात याचे भान नसले बाबत जाहीर नोटीस दै. महासत्ताचे अंकात प्रसिध्द केली होती. त्यापूर्वीपासून म्हणजेच सन डिसेंबर २०१२ पासून प्रकाश उर्फ रामगोंडा सिदगोंडा पाटील हे बेपत्ता असलेने त्यांचा अनेक पाहुण्यांचेकडे व परगांवी जाऊन तपास केला होता. परंतु त्यांचा ठावठिकाणा थांगपत्ता अद्याप लागलेला नाही शिवाय त्यांची आई श्रीमती लक्ष्मीबाई, त्यांची पत्नी कविता तसेच मुलगा स्वप्नील व मुली स्नेहल व दिपाली पाटील हे सर्व वारसदार म्हणून शेतीवाडी व घराची देखभाल करीत आहेत. तसेच चंदूर गट नं. ११९ बाबत दावे चालू असलेची नोटीस यापूर्वी दै. महासत्ताचे अंकात ता. ०३–०४–२०१५ इ. रोजी वारसा मार्फत प्रसिध्द केली आहे. तरी बेपत्ता प्रकाश उर्फ रामगोंडा सिदगोंडा पाटील यांचा तपास लागत नसलेने यापूर्वी पोलीस पाटील चंदूर तसेच ग्रामपंचायत चंदूर यांना कळविले होते परंतु अद्याप तपास लागलेला नाही अगर ते आढळून आलेले नाहीत. तरी कोणाही इसमास सदर प्रकाश पाटील यांचा ठावठिकाणा लागलेस खालील सही करणार यांचेकडे त्वरीत संपर्क साधावा. त्यांना हजर केलेस योग्य ते बक्षिस देणेत येईल म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता. २८–०३–२०२४

स्वप्निल प्रकाश पाटील

रा. चंदूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. ४१६ ११५.
मो.नं. ९५९५६८६८६५.

क्रीडाक्षेत्राच्या विकासासाठी शाहू महाराजांना विजयी करावे

शहाजीराजेंचे खेळाडू,क्रीडा संघटनांना आवाहन

कोल्हापूर,ता.२८ (प्रतिनिधी)

विभागीय क्रीडा संकुल, दुधाळी आणि मेरी वेदर यासह विविध मैदानात जात शहाजीराजे यांनी खेळाडू आणि क्रीडा संघटनांची संवाद साधला. त्यांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या. जिल्ह्याच्या विकासाबरोबर क्रीडा क्षेत्रातही पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी श्रीमंत शाहू छत्रपतींना विजयी करावे असे आवाहनही त्यांनी केले.

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील इंडिया व महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या प्रचारार्थ त्यांचे नातू शहाजीराजे यांनी विभागीय क्रीडा संकुलला भेट दिली. त्यांनी सरावासाठी आलेले खेळाडू, भरतीसाठी सराव करणारे उमेदवार, क्रीडा संघटक यांच्याशी चर्चा केली, तसेच क्रीडा संकुलातील फुटबॉल, जलतरण, कुस्ती, टेनिस यासह अन्य मैदानांना भेट दिली. यावेळी खेळाडूंनी विभागीय क्रीडा संकुलातील समस्यांची शहाजीराजे यांनी माहिती दिली. क्रीडा संकुलात पायाभूत सुविधांची वानवा असून महिलांसाठी चेंजिंग रूम उपलब्ध नसल्याचे यावेळी महिला खेळाडूंनी निदर्शनास आणून दिली. स्वच्छतागृहात अस्वच्छता असल्याचे सांगितले. यावेळी शहाजीराजे यांनी क्रीडा अधिकाऱ्यांशी संपर्क साधून खेळाडूंच्या समस्या सोडवण्यासाठी विनंती केली. शहाजीराजे यांनी यावेळी फुटबॉलचा सरावही केला. गेल्या तीन वर्षात एकही राजकीय नेता खेळाडूंच्या भावना जाणून घेण्यासाठी आला नाही याची खंतही खेळाडूंनी व्यक्त केली.

विभागीय क्रीडा संकुलातील खेळाडू,क्रीडा संघटनांशी संवाद साधताना शहाजीराजे.

शाहू महाराज हे क्रीडाप्रेमी असून ते पायाभूत सुविधांसाठी प्रयत्नशील राहतील, आगामी लोकसभा निवडणुकीत त्यांना विजयी करण्यासाठी खेळाडूंनी जिवाचे रान करावे, असे आवाहन शहाजीराजे यांनी केले.

यावेळी अमित पोवार , राजू मोरे, सुनील शिंत्रे, गजानन कुऱ्हाडे,रमेश मोरे, योगेश मांगोरे पाटील, संतोष महाडिक, राजू वायकर, डोंगळे सर उपस्थित होते. त्यानंतर शहाजी छत्रपती यांनी दुधाळी मैदानाला भेट देऊन खेळाडूंची संवाद साधून मैदानातील पायाभूत सुविधांची पाहणी केली.

दुधाळी व्यायामशाळा आणि बॅडमिंटन हॉलला ही भेट दिली. त्यांनी मॉर्निंग ग्रुपमधील क्रिकेट खेळाडू, फुटबॉल खेळाडूंशी ही संपर्क साधला. यावेळी शिवतेज खराडे भगवान सरनोबत, श्रीधर गाडगीळ, चंदू घारगे, दीपक घारगे, अमित पवार उपस्थित होते.माजी उपमहापौर अर्जुन माने, नितीन सावंत, जॉनी यादव , निवास वाघमारे, रवी मानकर, वीरधवल शिंदे, मिलिंद देसाई, मिलिंद ठाकूर, संजय साळोखे ,योगेश देशपांडे आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी भविष्याचा वेध घेऊन करिअर निवडावे

चंद्रकांत भाट

शिरोळ,ता.२८(प्रतिनिधी)

शैक्षणिक क्षेत्रात अमुलाग्र बदल झाला आहे सध्या व्यावसायिक शिक्षणाला फार महत्व आले आहे यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्याचा वेध घेऊन आपले पालक व गुरुजनांचे मार्गदर्शन घेऊनच आपली कोणत्या क्षेत्रात आवड आहे याचा विचार करूनच शिक्षणातील करिअर निवडण्याची गरज आहे असे प्रतिपादन चंद्रकांत भाट यांनी केले.

शिरोळ येथील मयूर ज्ञानप्रबोधिनी ट्रस्टच्या वतीने इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते

बोलत होते. प्राचार्य के. एम. भोसले हे या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.१० वी नंतर ११ वी मध्ये विज्ञान व तंत्रज्ञान शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मयूर ज्ञानप्रबोधिनी ट्रस्टच्यावतीने शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परिक्षेत शिरोळ ,जयसिंगपूर व कुरुंदवाड परिसरातील तब्बल ६०८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.त्यापैकी ५७४ विद्यार्थी या परिक्षेत उत्तीर्ण झाले. त्यांना ५००० रुपयेपासून २१००० रुपयापर्यंतची शिष्यवृत्ती देण्यात आली आली. स्वागत संचालक विक्रमसिंह भोसले यांनी तर प्रास्ताविक प्रा. श्रीकांत माळकर यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. दहावी नंतर काय ? या विषयावर प्रा. हुसेनी यांनी मार्गदर्शन केले.यावेळी ज्येष्ठ बालरोगतज्ञ डॉ.अतुल पाटील,राधा महिला फौंडेशनच्या अध्यक्षा जयश्री पाटील, इम्रान कोठीवाले,आत्माराम मुळीक, सौ. वर्षा भोसले, सौ. पाटील शिवाजीराव पाटील कौलवकर ,पालक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

थोडक्यात

कर्ज योजनांचा दिव्यांग व्यक्तींनी लाभ घेण्याचे आवाहन

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)

राज्यातील १८ ते ६० वयोगटातील दिव्यांगांना स्वयंरोजगारासाठी अल्प व्याज दराने कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य करण्याकरीता महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळामार्फत राज्य शासनाची वैयक्तिक थेट कर्ज योजना व राष्ट्रीय दिव्यांगजन महामंडळाची दिव्यांग स्वावलंबन कर्ज योजना राबविण्यात येते.

महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज योजनांचा जास्तीत जास्त दिव्यांग व्यक्तींना लाभ मिळावा, यासाठी महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या www.mshfdc.co.in या संकेतस्थळावरील डाऊनलोडमध्ये कर्ज योजनांचे अर्ज व महामंडळाचे माहितीपत्रक https://mshfdc.co.in/index.php/ २०१३-०४-१२-१३-२०-५६ या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी दिली आहे.

करंजफेण येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर संपन्न

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)

करंजफेण (ता.शाहुवाडी) येथे शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट मधील समाजकार्य विभागामार्फत लायन्स लॅब रुग्णालय मिरज रोटरी क्लब हातकणंगले यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी शिबीर संपन्न झाले. या नेत्र तपासणीसाठी गावातील सुमारे ७० नागरिक उपस्थित होते.

लायन्स लॅब नेत्र रुग्णालय मिरज रोटरी क्लब गडहिंग्लज यांचे ट्रस्टी डॉ. नंदकुमार सुतार यांनी आलेल्या रुग्णांना ट्रस्ट बद्दल माहिती व समुपदेशन केले. नेत्र तपासल्या नंतर ४० भर रुग्ण मोतीबिंदू झालेले आढळले.रुग्णांना महात्मा फुले या योजनेतून अल्प खर्चामध्ये ऑपरेशन करण्याची हमी दिली. या शिबिराचा उपयोग गावातील गरजू लोकांना झाला . गावातील वयस्कर रुग्णांची त्यांच्या घरी जावून तपासणी करण्यात आली. यावेळी गावाचे उपसरपंच प्रवीण पाटील उपस्थित होते. हर्षदा पाटील हिने सूत्रसंचालन केले. त्यानंतर प्राजक्ता माने हिने प्रास्ताविक केले. कु.मोनाली साळुंखे हिने आभार मानले.

डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठाचा सामंजस्य करार

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)

डी वाय पाटील अभिमत विद्यापीठ कोल्हापूर आणि मिड स्वीडन विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे विद्यार्थ्यांना संशोधनासाठी नवे व्यासपीठ मिळणार आहे. या करारावर डी वाय पाटील अभिमत विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल व कुलसचिव डॉ.व्ही.व्ही. भोसले यांनी तर स्वीडन विद्यापीठाकडून उप. कुलगुरु प्रा. हॅन्स एरिक निल्सन यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

प्रा. नेल्सन म्हणाले, ऊर्जा साधनांच्या निर्मितीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात एकत्र संशोधन करता येणार आहे. हरित ऊर्जा साधनांची निर्मिती क्षमता लक्षात घेता त्यामध्ये वृद्धी करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. स्वीडन विद्यापीठात कार्यरत असलेल्या डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या माजी संशोधक डॉ. मनीषा फडतरे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करताना विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट ट्रेनिंग व संयुक्तरित्या संशोधन करता येणार असल्याचे सांगितले. कुलपती डॉ. संजय डी पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, विश्वस्त तेजस पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा करार करण्यात आला. यावेळी रिसर्च डायरेक्टर डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. विश्वजीत खोत, डीन डॉ. राकेश कुमार शर्मा, डॉ. शिंपा शर्मा, डॉ. मेघनाथ जोशी आदी उपस्थित होते.

कामगारांची कामे तात्काळ निकाली काढावीत

प्रातांधिकारी यांना निवेदन

इचलकरंजी,ता.२८-

सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयातील ज्या अधिकाऱ्यांना निवडणूक ड्युटी दिली आहे अशा अधिकाऱ्यांची निवडणूक ड्युटी रद्द करून कष्टकरी कामगार वर्गाचे व बांधकाम कामगारांचे सर्वच प्रलंबित कामे ताबडतोब निकाली काढण्यासाठी सूचना कराव्यात, अशी मागणी महाराष्ट्र बांधकाम कामगार सेनेच्या शिष्टमंडळाच्या वतीने प्रातांधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात शिरोळ, हातकणंगले तालुक्यातील बांधकाम

प्रांत कार्यालयातील अधिकाऱ्यांना निवेदन देताना संघटनेचे राजेंद्र निकम, सद्दाम मुजावर, केप्पाण्णा हलगेकर, बादल हेगडे.

कामगार व इतर उद्योगातील कामगारांची कामे गेली अनेक वर्षे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात प्रलंबित आहेत. आचारसंहितेच्या नावाखाली सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयातील सर्वच अधिकारी कामगार वर्गाची दिशाभूल करीत आहेत त्यामुळे कार्यालयातील सर्व कामे प्रलंबित आहेत. इचलकरंजी शहर हे कष्टकरी कामगार वर्गाचे असल्याचे ओळखले जाते परंतु सध्या इचलकरंजी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय हे कामगारांचे आहे की नाही असा संभ्रम निर्माण होत आहे. कामगारांना आपल्या न्याय हक्कासाठी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहेत असेही निवेदनात म्हटले आहे. निवेदनावरती महाराष्ट्र कामगार सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र निकम, सद्दाम मुजावर, केप्पाण्णा हलगेकर, बादल हेगडे, शहानवाज चांदकोटी, राजेश कांबळे, बेगम नदाफ, सुवर्णा शिंदे इत्यादी पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

भटक्या कुत्र्यांचे लसीकरण पूर्ण करा

प्रशासक के.मंजूलक्ष्मी

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)

शहरातील उनाड व भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करण्यात येत असून कुत्र्यांना रेबीज प्रतिबंधक लस लवकरात लवकर देण्याची विशेष मोहिम हाती घ्यावी,अशा सूचना प्रशासक के.मंजूलक्ष्मी यांनी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विजय पाटील यांना दिल्या.

आयुक्त कार्यालयात उनाड व भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरणाबाबत आढावा बैठक आयोजित केली होती. यावेळी उपआयुक्त साधना पाटील, शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत, जल अभियंता हर्षजीत घाटगे, अन्न औषध प्रशासनाचे सहा.आयुक्त तुषार शिंगाडे,खाडे, अतिक्रमण विभाग प्रमुख सचिन जाधव उपस्थित होते.

प्रशासक के.मंजूलक्ष्मी यांनी यावेळी भटक्या कुत्र्यांना मिळणारे खाद्यपदार्थ प्रामुख्याने मटण, चिकन वेस्ट व खाद्यपदार्थ मधील चिकन ६५ वेस्ट खाण्यास मिळत असलेबाबत वारंवार नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. अशा मटन, चिकन, मासे व चायनीज पदार्थ विकणारे सर्व विक्रेत्यांमध्ये उघड्यावर शिल्लक मांस व वेस्टेज न टाकणेबाबत जनजागृती करावी.

'कृष्णा'ट्रस्टकडून स्वच्छता मशिन प्रदान

कराड,ता.२८(प्रतिनिधी)

येथील कृष्णा चॅरिटेबल ट्रस्टकडून कराड उपविभागीय कार्यालयाला स्वच्छतेसाठी अत्याधुनिक मशिन देण्यात आले. ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले व कृष्णा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. अतुल भोसले यांच्या हस्ते उपविभागीय अधिकारी अतुल म्हेत्रे व तहसिलदार विजय पवार यांना हे मशिन प्रदान करण्यात आले.

कृष्णा चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने लोकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. या अंतर्गत कृष्णा विश्व विद्यापीठाच्यावतीने कराड तालुक्यातील शेरे, दुशेरे, गोंदी व खुबी आणि वाळवा तालुक्यातील लवंडमाची ही गावे दत्तक घेण्यात आली असून या ठिकाणी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबरच पिण्याचे शुद्ध पाणी,

कराड उपविभागीय कार्यालयाला स्वच्छतेसाठी अत्याधुनिक मशिन भेट देताना डॉ.सुरेश भोसले, डॉ.अतुल भोसले व अन्य मान्यवर.

सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन या बाबींकडे लक्ष देऊन सुधारणा केल्या जात आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून कृष्णा चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने कराड येथील उपविभागीय कार्यालयाला स्वच्छतेसाठी अत्याधुनिक मशिन प्रदान करण्यात आले. याप्रसंगी कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे, कार्यकारी संचालक पी. डी. जॉन, उपकुल सचिव एस. ए. माशाळकर, पर्चेस ऑफिसर राजेंद्र संदे, उपविभागीय कार्यालयातील गोपाल वसू, महेश पाटील, प्रवीण साळुंखे, कुबेर भिलवडे, दीपक कानकेकर, सचिन निकम, राजू चावरे, अमोल चव्हाण, युवराज सावंत यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाटील टेक्निकल कॅम्पस्मध्ये रक्तदान शिबीर संपन्न

वारणानगर,ता.२८(प्रतिनिधी)

डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस तळसंदे येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने व डॉ डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या 'ज्ञान शांती' रक्त पेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबीर पार पडले. यावेळी ८७ जणांनी रक्तदान केले.

डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसचे अधिष्ठाता प्रा. आर. एस. पोवार यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. या शिबिरात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी, रक्तदाब तपासणी करण्यात आली. शिबिराचे नियोजन कॅम्पसचे रा. स. यो अधिकारी

रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित अधिष्ठाता प्रा आर.एस. पोवार, प्रा.केदार रेडकर व इतर मान्यवर.

केदार रेडकर यांनी केले . यासाठी डॉ.बी.जी.कांबळे ,प्रसिद्ध विभागाचे सतीश आवटे, डॉ.ऐश्वर्या, डॉ.अभिषेक, टेक्निशयन रंजना शिंदे, अस्मिता पाटील, नर्सिंग अर्जुन, रितू कामत,विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज उर्फ बंटी डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता,कॅम्पस डायरेक्टर डॉ. सतीश पावसकर, रजिस्ट्रार प्रकाश भागाजे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

श्रीदत्त
शुक्रवार, ता.२९ पासून
रोज ४ खेळ - १ * ४ * ७ व १० वा.
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
थ्री सेक्स
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

श्रीहरी
शुक्रवार, ता.२९/०३/२४ पासून
रोज १ वा.
मस्त रोमॅन्टीक हिंदी चित्र
नॉटी लेडी
४ व ७ वा.
प्रौढांसाठी
A कवारी A

पंचवटी DOLBY 7.1 DIGITAL PLUS
शुक्रवार ता. २९ पा.
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज 2 खेळ 12 व 9
रोज 2 खेळ 3 व 6

क्रू (हिंदी)
स्वातंत्र्यवीर सावरकर (हिंदी)

भाग्यरेखा DOLBY DIGITAL
लेझर प्रोजेक्टर
QUBE CINEMA NETWORK DIGITAL The Power of Cinema. Delivered.
शुक्रवार दि.२९पा. ४ खेळ *१२ *३*६*९ वा.
मुंबई बरोबर धुमधडाक्यात... प्रत्येकाने आवर्जुन चित्रपट पाहिलाच पाहिजे
अे.आर. रेहमान यांचे संगीत...सत्य घटनेवर आधारीत पटकथा
तिकीट दर रु.४० संपूर्ण देशात रिलीज

द गोएट लाईफ (हिंदी)

गुरु
शुक्रवार ता. २९ पासून
रोज ४ खेळ १ * ४ * ७ * १० वा.
ऑनलाईन बुकींग bookmyshow
नवा पिक्चर, नवी ॲक्शन,नवा थरार

गॉडझिला X कॉंग (द न्यु एंपायर)
(हिंदीमध्ये) जागतिक रिलीज
महाप्रचंड गॉडझिला व महाशक्तीमान किंग कॉंग येत आहेत.

RK CINEMAS 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
Real 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND Only in RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
bookmyshow

गॉडझिला X कॉंग 3D हिंदी	क्रू हिंदी
10.00 AM, 12.30 PM, 03.00 PM, 08.00 PM, 10.30 PM	10.15 AM, 12.45 PM, 03.15 PM, 07.45 PM, 10.00 PM
गॉडझिला X कॉंग 2D हिंदी	05.30 PM
अलीबाबा आणि 'चाळीशी' तले चोर मराठी	05.30 PM
मडगांव एक्सप्रेस हिंदी	स्वतंत्र वीर सावरकर हिंदी
01.00 PM, 04.00 PM, 10.30 PM	10.00 AM, 06.30 PM

चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह खासकरून पिज्झा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच.

फॉर्च्युन सिनेप्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortunecineplex.in

क्रू (U/A) (HIN)	12.15, 02.45, 05.15, 07.45, 10.15pm
गॉडझिला एक्स कॉंग द न्यू एम्पायर (3D) (U/A) (HIN)	12.00, 02.15, 04.45, 10.00pm
स्वातंत्र्य वीर सावरकर (U/A) (HIN)	11.15am, 10.30pm
शैतान (U/A) (HIN)	02.30pm
मडगाव एक्स्प्रेस (U/A) (HIN)	05.00, 07.45pm
अलीबाबा आणि चाळीशी तले चोर (U/A)(MAR)	07.30pm

आज पहा गॉडझिला एक्स कॉंग(3D) मुव्ही व्यतिरिक्त इतर कोणताही मुव्ही 110 रु. मध्ये
अधिक माहितीसाठी संपर्क : +91 88 88 01 51 11

उत्तर कोरेगावमध्ये निकृष्ट खाद्यपदार्थांची विक्री

ढाबा,हॉटेल,बेकरी व्यावसायिकांकडून नियमांचे उल्लंघन अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष

पिंपोडे बुद्रुक,ता.२८(वार्ताहर)-

कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागात अन्न व औषध प्रशासनाची धास्ती राहिली नाही. त्यामुळे अनेक ढाबा,हॉटेल आणि बेकरी व्यावसायिकांकडून नियम धाब्यावर बसवत मनमानी सुरू झाल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी निकृष्ट दर्जाच्या जेवणाची आणि पदार्थांची विक्री सुरू आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य बिघडण्याचा धोका आहे.

कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागातील वाठार स्टेशन आणि पिंपोडे बुद्रुक या मोठ्या गावासहित इतर गावात मोठ्या

हॉटेल आणि ढाबा यांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. कोरोना संसर्गाच्या काळापासून लोक खाद्यपदार्थ, आरोग्य याबाबतीत खूपच दक्ष झाले आहेत. आजारी पडू नये यासाठी ताजे व चांगले पदार्थ खाण्यावर लोकांचा भर आहे.अन्न आणि औषध प्रशासन विभागा मार्फत हात ओला तर मैतर भला ही म्हण अंमलात आणून या भागात फक्त दिखाव्यासाठी केली जात आहे.उत्तर भागातील काही हॉटेलमध्ये शिळे अन्न फ्रीज मध्ये ठेऊन ग्राहकांना खायला दिले जाते अशी कुजबुज नागरिकांकडून ऐकायला मिळत आहे.काही हॉटेल मध्ये कोणतीही साफसफाई नसते तसेच निकृष्ट दर्जाचे चिकन मटण ग्राहकांना दिले जाते.तरीही अन्न आणि औषध प्रशासन विभागामार्फत फारशी कारवाई झालेली दिसून येत नाही. कोणत्याही प्रकारची तपासणीच नसल्याने ढाबे, हॉटेल,स्वीट मार्ट, विविध खाद्यपदार्थ उत्पादकही बिनधास्त झाले आहेत. अनेक बेकरींमध्ये विक्री होत असलेल्या उत्पादनांवर उत्पादन, एक्स्पायरीची तारीख दिसून येत नाही. त्यांना विचारले तर उडवाउडवीची उत्तरे दिली जातात.अनेक ठिकाणी स्वच्छतेचा पूर्ण अभाव आहे.त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भीती आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाने तपासणीत आणि कारवाईत सातत्य ठेवावे, अशी लोकांची अपेक्षा आहे.

कारवाई केली नाही तर आंदोलन

उत्तर कोरेगाव भागातील आकर्षक मिठाई, खवा, फराळाचे पदार्थ यामध्ये भेसळ दिसून येत आहे.तसेच मोठ्या हॉटेलमधील भेसळीचे अन्नपदार्थ खाल्ल्याने नागरिकांना अनेक आजार होत आहेत. नागरिकांच्या जीवाशी खेळणे चुकीचे आहे. त्यामुळे अन्न व औषध विभागाने तपासणी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

गुटखा, मावा यांची खुलेआम विक्री

लोकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये, यासाठी सरकारने राज्यात गुटखा, मावा यावर बंदी घातली आहे. मात्र त्यांची खुलेआम विक्री आणि फारशी होत नाही. पानपट्टीत गुटखा, मावा मिळतो आहे.या सर्वांकडे अन्न प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. त्याबाबतही कारवाई फारशी झालेली दिसून येत नाही.

हॉटेलमधील पाणी पिण्यासाठी धोकादायक

अनेक हॉटेलमध्ये बोअरचे पाणी वापरले जाते. काही ठिकाणी ते पिण्यासाठीसुद्धा देण्यात येते. काही ग्राहक हॉटेलमध्ये पिण्याचे पाणी विकत घेतात. मात्र, काही ग्राहक हॉटेलमधीलच पाणी पितात. हे क्षारयुक्त पाणी आरोग्यासाठी धोकादायक आहे. त्याकडे सुद्धा अन्न-औषध प्रशासन यांचे दुर्लक्ष आहे. यातून नागरिकांना विविध आजार होण्याची शक्यता आहे.

ऊस तोडणी कामगार परतीच्या वाटेवर

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

आपली पोटाची खळगी भरण्यासाठी बीड, उस्मानाबाद, अहमदनगरमधून दरवर्षी अनेक ऊसतोडणी कामगार आपल्या कुटुंब कबिल्यासह साखरपट्ट्यात येतात. तब्बल सहा महिने ऊस या पट्ट्यातील शेतात रात्र-दिवस कष्ट करून पांढरं सोनं पिकवतात. घरदार, शेतीवाडी सोडून तब्बल सहा महिन्यांचे स्थलांतर या कष्टकरी ऊसतोड कामगारांचे होत असते.

कराड तालुक्यात पूर्णक्षमतेने ऊस गाळप करणारे कृष्णा सहकारी साखर कारखाना, सह्याद्री सहकारी साखर कारखाना, जवयंत शुगर हे मोठे कारखाने आहेत. वाशिवार शेजारील राजारामबापू पाटील साखर कारखाना, रयत कारखाना, हुतात्मा, सोनहिरा इथूनही ऊसतोड कामगार कराड तालुक्यात ऊस तोडणीसाठी येतात. शेतातच वस्ती करून राहणारे हे कामगार सहा महिने शहर, गाव यापासून दूरच असतात. सध्या ऊसतोड गळीप हंगाम संपला असल्याने ऊसतोडणी कामगारांच्या टोळ्या परतीच्या मार्गावर निघाल्या आहेत.

जनरल मोटर्सच्या कामगारांचा प्रश्न निकाली

कामगार मंत्री खाडेंची शिष्टाई

मिरज,ता.२८(प्रतिनिधी)-

तळेगाव दाभाडे (जि. पुणे) येथील जनरल मोटर्सचा प्रकल्प ह्युंदाई कंपनीने खरेदी केला. मात्र आम्हाला यामध्ये विश्वासात घेतले गेले नाही, आम्हाला न्याय मिळाला पाहिजे अशा प्रमुख मागण्या करणाऱ्या कामगारांना अखेर कामगार मंत्री खाडे यांनी योग्य न्याय देत यशस्वी शिष्टाई केली आहे.

यामुळे नुकसान भरपाईचे २०० कोटी रुपये लवकरच कामगारांच्या खात्यावर वर्ग होणार आहेत. काही गैरसमजापोटी आम्ही मिरज मतदारसंघात आलो व आम्ही कामगार मंत्री यांच्यावर टीका केली मात्र खुद्द कामगार मंत्र्यांनीच हा प्रश्न मार्गी लावल्यामुळे जनरल मोटर्सच्या कामगारांचा प्रश्न सुटला असल्याचे युनियनचे अध्यक्ष संदीप भेगडे यांनी जाहीर केले.

जनरल मोटर्सचा प्रकल्प ह्युंदाई कंपनीने खरेदी केल्यानंतर कामगार संघटना आणि कंपनी यांच्यातील वाद विकोपाला गेला होता. याप्रकरणात कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्यावरही चिखलफेक झाली. कामगारांना जनरल मोटर्सकडून समाधानकारक भरपाई मिळवून देत तब्बल २०० कोटी मिळवून देण्याची तरतूद करण्यात आली होती.या प्रकरणात न्यायालयात गेल्यानंतर कोर्टाने युनियनच्या विरोधात निर्णय दिला. खाडे यांनी यावेळी ही कामगारांना सहकार्य करीत कंपनीला त्वरित नुकसान भरपाईचे आदेश दिले.

जनरल मोटर्स कामगारांचा प्रश्न सोडवून कामगारांना २०० कोटी रुपये मिळवून दिले त्याबद्दल मंत्री खाडे यांचेसह पुण्याचे अप्पर कामगार आयुक्त पोळ यांचेही आभार मानले आहेत.

श्री नाईकबा यात्रेत सुविधांबाबत हयगय नको

नेटक्या नियोजनासाठी बैठकीत विविध यंत्रणांना सूचना; पोलीस बंदोबस्तही वाढणार

ढेबेवाडी,ता.२८(प्रतिनिधी)-

महाराष्ट्र-कर्नाटकातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र नाईकबा देवाची येत्या १३ व १४ एप्रिलला होणारी यात्रा आचारसंहितेचे नियम पाळून; परंतु परंपरेला छेद न देता साजरी करण्याचे आवाहन यात्रा नियोजनाच्या बैठकीत प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

पाणी व वीजपुरवठा, आरोग्य व पोलीस बंदोबस्त, वाहतूक, पार्किंग आदींच्या अनुषंगाने बैठकीत काही महत्वपूर्ण सूचना करण्यात आल्या.श्री नाईकबा मंदिरात आयोजित बैठकीत तहसीलदार अनंत गुरव, सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलजा पाटील, परिवहन अधिकारी सुनील राजमाने आदींनी मार्गदर्शन केले. महिंद धरणातून यात्रेपूर्वी नदीपात्रात बंधाऱ्यात पाणी सोडावे. वाहन तळाची नेटकी व्यवस्था करावी. बंदोबस्तात वाहतूक पोलिसांची संख्या वाढवावी. पालखी मार्गावर अडथळे होणार नाहीत, याची काळजी घ्यावी.सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढवावी. यात्रे नंतर रविवारच्या पाकळण्यांनाही बंदोबस्त ठेवावा. पार्किंग व गर्दीच्या ठिकाणी पाणपोई काढण्यात. दुकानदारांना प्लॅस्टिक पिशव्या न वापरण्याबाबत सूचित करावे. स्वतंत्र अग्निशमन सेवा उपलब्ध करण्याबरोबरच दुकानदारांनीही अशी वैयक्तिक मिनी यंत्रणा दुकानात ठेवण्याबाबत सूचना काढण्यात. वणवा प्रतिबंधक उपाययोजना राबवाव्यात. यात्रेनंतर ग्रामपंचायत, यात्रा समिती, ट्रस्ट, ग्रामस्थ यांनी स्वच्छता मोहीम राबवावी आदी सूचना देऊन जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या.

बनपुरीचे सरपंच मनोज पाटील, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विलासराव जानुगडे, दादासाहेब माने,तानाजी माने, ॲड. अविनाश जानुगडे, ॲड.शिवाजी माने,मंडल अधिकारी श्रीमती एम. एस.कुलकर्णी,नागेश निकम, यात्रा समितीचे अध्यक्ष अनिल पाटील,पोलिस पाटील दत्तात्रय कुंभार व संग्राम पांढरपट्टे, विस्तार अधिकारी डी.एम कर्चे,तलाठी विशाल शेवाळे,दीपश्री थेटे, ग्रामसेवक आर. एम. राठोड, मालती कांबळे, सचिन जानुगडे, जयवंत जानुगडे, शिवाजीराव जगदाळे,विक्रम जगदाळे, अशोकराव पाटील,बळवंत जानुगडे,प्रसाद जानुगडे आदींसह बनपुरी व जानुगडे वाडीचे पदाधिकारी, ग्रामस्थ,विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सरपंच मनोज पाटील, विलासराव जानुगडे यांनी स्वागत तर अमर जानुगडे यांनी आभार मानले.

कवठेमहांकाळमध्ये बेदाणा निर्मितीकडे वाढता कल

सांगली,ता.२८(प्रतिनिधी)-

कवठेमहांकाळ तालुक्यात बेदाणा निर्मितीचे नेटींग मशीन उभारले गेले आहेत. बेदाणा निर्मिती शेड, नेटींग मशीनमुळे दुष्काळातील मंदावलेले अर्थकारणचक्र गतीने फिरू लागले आहे.कवठेमहांकाळ पूर्व भागातील नागज, आगळगाव, चोरोची, शेळकेवाडी या भागांत मोठ्या प्रमाणावर बेदाणा निर्मिती केली जाते.

उष्ण व कोरडे हवामानाने बेदाणा निर्मितीस पोषक वातावरणामुळे दर्जेदार, गुणवत्तापूर्ण उत्कृष्ट बेदाणा निर्मिती या पट्ट्यामध्ये होते. त्यामुळे बेदाणा निर्मितीचे शेड उभा राहिले आहेत. तालुक्यात द्राक्षाचे क्षेत्र १२ हजार ८७० एकर क्षेत्र आहे. द्राक्षे पीक नगदी पीक म्हणून

बेदाणा करण्यासाठी नेटींग मशीन आहेत. बेदाणा प्रक्रिया सुलभ झाली आहे. वेळ व श्रमात बचत झाली आहे. मशीनमध्ये बेदाणा प्रतवारी केली जाते. शेळकेवाडी, नागज, आगळगाव, चोरोची येथे बेदाणा नेटींग मशीन आहेत.

आगळगाव,नागज,शेळकेवाडी,चोरोची भागातील चित्र

घेतले जाते. निर्यातक्षम द्राक्षेचे उत्पादन घेतले जाते. बेदाणाला चांगला दर मिळत आहे. हिरव्या रंगाचा, सुरेखाण प्रतीचा बेदाणाची निर्मिती केली जाते.उष्ण व कोरड्या वातावरणामुळे बेदाणा लवकर सुखतो. त्याला रंग, चकाकी येते. दर्जेदार व उच्च प्रतीचा बेदाणा तयार होतो. साधारण चार किलो द्राक्षापासून एक ते दीड किलो बेदाणा तयार होतो. यावर्षी बेदाणा निर्मितीच्या औषधात दीड पटीने महागली सुका मेवा बेदाणास देशाबरोबर परदेशात मोठी मागणी आहे. तालुक्यात बेदाणाचे उत्पादन लक्षात घेता मार्केटिंगची सोयी उपलब्ध करून दिल्यास फायदा होणार आहे. शीतगृह (कोल्डस्टोरेज) तासगाव, सांगली येथे आहेत. हे अंतर लांब आहे. शीतगृह व मार्केट उपलब्ध झाल्यास फायदा होणार आहे.

आहेत. एक किलो बेदाणाला ३१ रुपये खर्च येतो. सध्या बेदाणाला दर चांगला मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना आहे. बेदाणा शेड भाड्याने दिले जातात तीन महिने बेदाणा शेडला भाडे मिळते. महिला व पुरुषांना रोजगार उपलब्ध होतो. द्राक्षे काढणे, वाँशिग करणे, पॅकिंग करणे, रॅकवर टाकणे, बेदाणा झाडणे अशाकामात रोजगार उपलब्ध होतो. बेदाणाचे उत्पादन सर्वच दृष्टीने खर्चिक असल्याने सवलतीचा दरात औषधे, रॅक उपलब्ध करुन दिल्यास फायदा होणार आहे.

थोडक्यात

महामार्गावरील पार्किंगमुळे वाहतुकीस अडथळा

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

कराड-पाटण मार्गाच्या चौपदरीकरणानंतर या रस्त्यालगत लोकवस्ती तसेच उद्योग, व्यवसाय मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. त्यातच रस्त्यालगत हॉटेल, ढाब्यांचेही प्रमाण जास्त आहे. कामानिमित्त अथवा जेवण, नाष्ट्यासाठी आलेले अनेकजण आपली वाहने महामार्गावरच पार्क करतात. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण होत असून, वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे.

कराड ते पाटण हा मार्ग वर्दळीचा आहे. याच मार्गावरून वाहनांची रात्रंदिवस वाहतूक सुरू असते. काही वर्षांपूर्वी या मार्गाचे चौपदरीकरण झाले आहे. पाटण तिकाटणेपासून विजयनगरपर्यंत रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक उभारण्यात आले आहेत. या रस्त्याच्या चौपदरीकरणामुळे दोन्ही बाजूला मोठमोठे उद्योग, व्यवसाय सुरू झाले आहेत. अनेक कंपन्यांनी आपली शोरूम रस्त्यालगत उभी केली आहेत. मात्र, त्याठिकाणी पार्किंगची व्यवस्था नाही. त्यातच विजयनगरपर्यंत अनेक हॉटेल व ढाबेही थाटले गेले आहेत. त्यामुळे ग्राहक वाहने रस्त्यावरच पार्क करून हॉटेल व ढाब्यामध्ये जेवणावर ताव मारत असतात. परिणामी, वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.अपघाताची शक्यताही निर्माण होते.त्यामुळे पोलिसांनी संबंधित हॉटेल चालकांना याबाबत सूचना देण्याची मागणी होत आहे.

पाटण येथे उद्या महाविकास आघाडीचा संवाद मेळावा

पाटण,ता.२८(प्रतिनिधी)-

सातारा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील मित्र पक्षांचा संवाद मेळावा शनिवार (ता.३०) रोजी ऋचा हॉल, काळोली (कराड-चिपळूण रोड) येथे होणार आहे.

या संवाद मेळाव्यासाठी माजी मुख्यमंत्री व राष्ट्रीय काँग्रेसचे प्रमुख नेते पृथ्वीराज चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी मंत्री बाळासाहेब पाटील, माजी मंत्री शशिकांत शिंदे, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ.भारत पाटणकर, शिवसेना ठाकरे पक्षाचे प्रवक्ते नितीन बानुगडे-पाटील, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शंकरराव गोडसे, राष्ट्रीय काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस हिंदुराव पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, शिवसेना उ.बा.ठाकरे गटाचे सातारा जिल्हाध्यक्ष हर्षद कदम या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती शरदचंद्र पवार पक्षाचे पाटण विधानसभा मतदारसंघाचे नेते व सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर व पाटण तालुका अध्यक्ष राजाभाऊ शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

आगामी सातारा लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने हा संवाद मेळावा अत्यंत महत्त्वाचा आहे. पाटण विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या मित्रपक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना या मेळाव्यातून उपस्थित मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत मित्रपक्षांचे पदाधिकारी,कार्यकर्त्यांनी या संवाद मेळाव्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन या पत्रकात करण्यात आले आहे.

धनेश पक्ष्यांची घटती संख्या चिंताजनक

शिराळा,ता.२८(वार्ताहर)-

सह्याद्रीच्या जंगलातील धनेश पक्ष्यांच्या संवर्धनासाठी त्यांच्या घरट्यांचे संरक्षण आणि महावृक्षांची नोंदणी व संवर्धन, अधिवासाचे पुनरुजीवन, खाद्यफळांच्या वृक्षांची लागवड, खाजगी जागेत धनेश पक्ष्यांच्या घरट्यांचे संवर्धन आणि जनजागृती या पातळ्यांवर काम करणे आवश्यक असल्याचे देवरुखमध्ये झालेल्या धनेशमित्र संमेलनात नमूद करण्यात आले. धनेश संवर्धनाविषयी संमेलनात नोंदवलेले प्रमुख मुद्दे सरकार दरबारी मांडण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्थांनी एकत्र येऊन स्थापन केलेले धनेशमित्र निसर्ग मंडळ आणि देवरुख मधील सह्याद्री संकल्प सोसायटीच्या संकल्पनेतून हे संमेलन आयोजित करले होते.येथील आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाच्या एस. के. पाटील सभागृहात महाराष्ट्रातील पहिले धनेशमित्र संमेलन पार पडले. या संमेलनाला नेचर कॉन्झर्वेशन फाऊंडेशन आणि गोदरेज कन्झ्युमर प्रोडक्ट्स लिमिटेड यांनी साह्य केले.

देवरुख येथे भरवलेल्या धनेश मित्र संमेलनात चांदोली राष्ट्रीय उद्यान परिसरातील धनेश प्रजाती व त्यांचे संवर्धन याबद्दल शिराळा तालुक्यातील निसर्ग अभ्यासकांकडून काळजी व्यक्त करण्यात आली. धनेश पक्षाच्या संवर्धनासाठी चांदोली परिसरातून प्लॅनेट अर्थ फाऊंडेशन संस्थेने पुढाकार घेतला आहे. सदर संस्थेच्या सदस्यांकडून देवरुख येथील धनेश मित्र संमेलनात सहभाग नोंद केला व चांदोली अभयारण्य परिसरातील मनदुर, उखळू, शिदूर, गुढेपाचगणी, कांडवन, आंबा, धनगरवाडी, उदगिरी इत्यादी परिसरात धनेश पक्ष्यांच्या चार प्रजाती आढळतात.

या चार प्रजातीमधील ग्रेट हॉर्नबिल, मलबार पायिड हॉर्नबिल, मलबार ग्रे हॉर्नबिल व इंडियन ग्रे हॉर्नबील अशा प्रजाती असून त्याचे संवर्धन आणि संरक्षण होणे महत्त्वाचे आहे. धनेश पक्षाला जंगलाचा शेतकरीपक्षी असे म्हटले जाते.तो जंगलातील विविध झाडांची फळे खातो व त्याच्या विष्ठेतून जंगलात झाडांच्या बिया दूरवर पसरल्या जातात व रुजतात.

चांदोली अभयारण्य परिसरातील चित्र

अशा प्रकारे जंगलात झाडांचे बिजरोपण व बीजप्रसार करण्याचे काम दरोज करत असतो. जंगलातील जीवनचक्रात धनेश पक्षाचे महत्व मोठे आहे. ज्या जंगलात धनेश पक्षी असतात तिथले जंगल व अधिवास हा उत्तम अधिवास मानला जातो. परंतु सध्या हा जंगलाचा शेतकरी धोक्यात आहे तसेच वृक्ष तोडीमुळे यांची संख्या कमी होत चालली आहे. धनेश प्रजातींचे संरक्षण होण्यासाठी चांदोली परिसरातील मोठी झाडे जपणे आवश्यक आहे. मोठ्या झाडांच्या डोल्यामध्ये हा पक्षी घरटे बनवतो. तसेच त्याची घरटी सुरक्षित राहिली तर हा पक्षी प्रजनन करून त्याची संख्या वाढू शकते. चांदोली परिसरात महा धनेश पक्ष्यांची एक जोडी आढळते. सदर जोडी कायमस्वरूपी परिसरात राहावी यासाठी सदर पक्ष्याचे खाद्य असणाऱ्या भेरली माड, बेहडा, वृक्षांची संख्या वाढवणे आणि जुने महावृक्ष जपणे गरजेचे आहे. ऊस शेतीचे उत्पन्न वाढवण्यासाठी मोठ्या झाडांची तोड होत आहे. सदर पक्ष्यांच्या संवर्धनासाठी धनेश पक्ष्यांचे खाद्य झाडे,तसेच घरटी करण्याची झाडे ओळखून ती संवर्धित करणे अथवा दत्तक घेणे गरजेचे आहे असे मत प्लॅनेट अर्थ फाउंडेशनचे उपाध्यक्ष, वन्यजीव अभ्यासक प्रणव महाजन यांनी व्यक्त केले. चांदोली अभयारण्य परिसरात धनेश पक्षी संवर्धनासाठी प्लॅनेट अर्थ फाउंडेशन मार्फत सर्व निसर्ग प्रेमींना व धनेश मित्रांना एकत्र करून प्रयत्न करण्यात येत आहेत. स्थानिकांनी आपल्या खाजगी जागेत असलेली मोठी झाडे तोडू नये त्याचे संवर्धन करावे अशी विनंती सर्व धनेश मित्रानी केली आहे.

विविध रंगांनी कराडची बाजारपेठ सजली

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

लहानग्यांसह मोठ्यांच्या आवडीचा रंगपंचमीचा सण शनिवारी साजरा होत आहे. त्यासाठी पिचकाऱ्या व विविध रंगांनी कराडची बाजारपेठ सजली आहे.

खेरेडीसाठी बालचमुंची गर्दी होत आहे. यंदाच्या रंगपंचमीत नैसर्गिक रंगाचा फवारा उडवणाऱ्या फ्लोरोसेंट सिलिंडरचे आकर्षण असून युवा वर्गातून मागणी वाढत आहे.रासायनिक हजार व पाचशे टक्का रंगाची मागणी घटली असून नैसर्गिक रंगांना मागणी वाढली आहे. त्यामुळे विविध प्रकारच्या फुलांपासून तयार करण्यात आलेले नैसर्गिक रंग बाजारात मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत.बाजारात सध्या फक्की रंग १० किलोची बॅग ६० रुपयांना विकली जात आहे. तर नैसर्गिक रंग पावडर ७० किलो दराने विकली जात आहे.

जिल्ह्याची विश्वासार्हता टिकवण्यासाठी शाहु महाराजांना साथ द्या

संभाजीराजे छत्रपती;भुदरगड तालुक्यातील आकुर्डे व गारगोटी जि.प.मतदार संघात संपर्क दौरा

कुर,ता.२८(वार्ताहर)-

देशात सध्या सर्वत्र अविश्वासाचे वातावरण तयार झाले आहे.देशात धार्मिक तेढ निर्माण करण्यात आले आहे.आपला कोल्हापूर जिल्हा हा पुरोगामी विचारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.जिल्ह्यात निर्माण झालेले विचार देशभर पोहचतात हीच विश्वासार्हता कायम ठेवण्यासाठी लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार शाहु महाराज छत्रपती यांना साथ द्या असे आवाहन माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी केले.

ते भुदरगड तालुक्यातील आकुर्डे व गारगोटी जिल्हा परिषद मतदार संघातील कार्यकर्ते भेटी व गावोगावी संपर्क दौऱ्याप्रसंगी बोलत होते.यावेळेस संभाजीराजे छत्रपती यांचे गावोगावी कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात आले.

नाधवडे येथे प्रचार दौरा प्रसंगी बोलताना संभाजीराजे छत्रपती यावेळेस उपस्थित समोर जनसमुदाय.

संभाजीराजे छत्रपती पुढे म्हणाले की,आपण आपल्या माध्यमातून कोल्हापूरच्या विकासासाठी नेहमी प्रयत्नशील राहिलो आहे व यापुढे हि विकासासाठी व शाहु,फुले,आंबेडकर यांचे विचार जपण्यासाठी शाहु महाराज छत्रपती यांना पाठबळ व साथ द्या असे ते म्हणाले.

यावेळी आकुर्डे जिल्हापरिषद मतदार संघातील कुर येथे माजी जिल्हापरिषद सदस्य जीवन पाटील आपल्या मनोगतात म्हणाले की,आपण केलेले कोट्यवधींची विकास कामे व मतदार संघातील जनतेचे असलेले प्रेम तसेच मतदार संघातील जनतेच्या छत्रपती घराण्यावरती असलेली विश्वासाहर्ता यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार शाहु महाराज छत्रपती यांना मोठ्याप्रमाणात मताधिक्य देणार असे ते म्हणाले.

यावेळी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश पाटील,काँग्रेस नेते सचिन घोरपडे,तालुका अध्यक्ष शामराव देसाई, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते संतोष मेंगाणे यांनी मनोगत व्यक्त केले.

आकुर्डे मतदार संघातील कुर, नाधवडे, टिकेवाडी, पंडिवरे, कोनवडे, निळपण, दारवाड, म्हसवे, बसेरवाडी, पाचवडे,मिणचे खुर्द, लोटेवाडी, मिणचे बुद्रुक अंतर्गत वाड्या, नवरसवाडी,कोळवण,हेदवडे पंचक्रोशी, भाटीवडे, महालवाडी,आकुर्डे,शेणगांव, फये तर गारगोटी मतदार संघातील गारगोटी,खानापूर, मडीलगे,कलनाकवाडी, वाघापूर व इतर गावोगावी संभाजीराजे छत्रपती यांनी भेटी दिल्या.

या संपर्क दौऱ्यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख अविनाश शिंदे,संजय सरदेसाई, सुरेश नाईक, अनिकेत देसाई, भैरवनाथ कुंभार,सचिन भांदिगरे,सरपंच ऋषिकेश पाटील,संजय पोवार, मा.जि.प.सदस्य पी.डी.पाटील,आर.व्ही देसाई, कुर सरपंच मदन पाटील,माजी सरपंच अनिल हळदकर, संदीप पाटील, सुरेंद्र घोंगडे,संदिप हळदकर, सात्तापा परिट, एम.जी.सारंग,आबाजी कांबळे,राम देसाई, सरपंच शितल पाटील, संतोष कांबळे, दिलीप पाटील, राजेंद्र देसाई, दिनकर कुंभार, जीवन ढेरे,आण्णासो पाटील, बाळासो केनवडे, दामोदर देवेकर, भिकाजी मोरे,बाळासो मोरे,बापूसाहेब देवेकर,दत्तात्रय पाटील, दशरथ शिंदे,धोंडीराम तुपारे,अरूण कवडे,बंडेराव देवेकर,मधुकर राजिगरे,शामराव मोरे, भिकाजी कांबळे,पांडुरंग देसाई, दामाजी पाटील, तानाजी साठे,संजय कांबळे,दिपक पोलेकर,युवराज सावंत,सतिश लोहार, सुरेश धुरे,विष्णु केसरकर आदि सह आकुर्डे व गारगोटी जिल्हापरिषद मतदार संघातील कार्यकर्ते,युवक ग्रामस्थ मोठ्याप्रमाणात सर्वत्र उपस्थित होते.

महासत्ता रंगारंग
शुक्रवार,२९ मार्च २०२४

लागोपाठ १६ फ्लॉप चित्रपटांबद्दल अखेर अक्षय कुमारने सोडलं मौन



बॉलिवूडचा खिलाडी अर्थात अभिनेता अक्षय कुमारने अनेक हिट चित्रपट दिले आहेत. मात्र त्याच्या करिअरमध्ये असाही काळ होता, जेव्हा त्याचे चित्रपट लागोपाठ फ्लॉप झाले. आता तो बडे मियाँ छोटे मियाँ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या प्रमोशननिमित्त दिलेल्या एका मुलाखतीत अक्षय त्याच्या फ्लॉप चित्रपटांबद्दल व्यक्त झाला. सेल्फी, मिशन रानीगंज यांसारखे त्याचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर दणक्यात आपटले होते. याविषयी अक्षय म्हणाला की चित्रपटाला यशस्वी करण्यासाठी तो बरीच मेहनत घेतो, मात्र बॉक्स ऑफिसवर त्याचं काय नशीब असेल हे त्याच्या हातात नाही.

बडे मियाँ छोटे मियाँ या चित्रपटाच्या ट्रेलर लाँच कार्यक्रमात अक्षय म्हणाला, आम्ही प्रत्येक प्रकारच्या चित्रपटासाठी प्रयत्न करत असतो. मी एकाच चौकटीत अडकून बसत नाही. एका जॉनरवरून दुसऱ्या जॉनरवर मी सतत उड्या मारतच असतो. मग त्यात यश मिळो किंवा न मिळो. मी नेहमीच अशाच पद्धतीने काम केलंय. यापुढेही तसंच करत राहीन. काही सामाजिक, काही चांगल्या कथेचे, काही कॉमेडी आणि काही ॲक्शन.. मी नेहमी विविध प्रकारचे चित्रपट करत राहीन. लोक म्हणतात म्हणून मी एकाच प्रकारच्या कामात अडकून पडणार नाही. सर आजकाल कॉमेडी आणि ॲक्शन खूप चालतंय, असं लोक म्हणतात. पण याचा अर्थ असा नाही की मी फक्त ॲक्शनच करेन. एकाच प्रकारचे चित्रपट करून मी स्वत: कंटाळून जाईन. टॉयलेट: एक प्रेम कथा असो, एअरलिफ्ट असो किंवा रुस्तम.. जेवढे चित्रपट मी केले आहेत, त्यापैकी काहींना यश मिळालं तर काहींना नाही, असं तो पुढे म्हणाला.

निवडीविषयी बोलताना अक्षय त्याच्या फ्लॉप चित्रपटांविषयीही व्यक्त झाला. एकेकाळी त्याचे लागोपाठ १६ चित्रपट फ्लॉप ठरले होते. मी असा काळ याआधी पाहिला नाही, अशातला भाग नाही. माझ्या करिअरमध्ये एक काळ असा होता, जेव्हा माझे १६ चित्रपट लागोपाठ फ्लॉप झाले होते. पण मी तिथेच उभा राहून माझं काम करत राहिलो. यापुढेही मी काम करत राहीन. यावर्षातला हा एक असा चित्रपट आहे, ज्यासाठी मी खूप मेहनत घेतली आहे. आता त्याचे परिणाम बघण्यासाठी मी सज्ज आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून आम्हाला यश मिळेल, अशी अपेक्षा आहे, अशा शब्दांत अक्षय व्यक्त झाला.

अदिती राव हैदरीने गुपचूप उरकलं लग्न

अभिनेत्री तापसी पन्नूनंतर आता अदिती राव हैदरीनेही बॉयफ्रेंड सिद्धार्थशी गुपचूप लग्न केल्याची माहिती समोर येत आहे. तेलंगणामधील एका मंदिरात या दोघांनी लग्नगाठ बांधली आहे. सिद्धार्थ आणि अदिती हे गेल्या काही वर्षांपासून एकमेकांना डेट करत होते.

अभिनेत्री अदिती राव हैदरीने बॉयफ्रेंड सिद्धार्थशी तेलंगणामधील एका मंदिरात गुपचूप लग्न केल्याचं कळतंय. गेल्या काही वर्षांपासून हे दोघं एकमेकांना डेट करत होते. विविध कार्यक्रमांमध्येही सिद्धार्थ-अदितीला एकत्र पाहिलं गेलंय.

सिद्धार्थ आणि अदिती हे सोशल मीडियावर एकमेकांसोबतचे फोटो, व्हिडीओ पोस्ट करायचे. मात्र दोघांनी कधीच नात्याविषयी प्रतिक्रिया दिली नाही. बुधवारी (२७ मार्च) या दोघांनी तेलंगणामधील एका मंदिरात लग्न केल्याची माहिती समोर येत आहे.

'ग्रेट आंध्र'ने दिलेल्या वृत्तानुसार, तेलंगणामधील वनपार्थी जिल्ह्यातील श्रीरंगपुरमइथल्या रंगनायकस्वामी मंदिरात या दोघांनी लग्न केलं. हे दोघं लवकरच त्यांच्या लग्नाची अधिकृत घोषणा करणार आहेत.

२०२१ मध्ये महा समुद्रम या चित्रपटाच्या सेटवर अदिती आणि सिद्धार्थ एकमेकांच्या प्रेमात पडले. गेल्या वर्षी अदितीच्या ३६ व्या वाढदिवशी, सिद्धार्थने तिच्यासोबतचा खास फोटो पोस्ट करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या. तेव्हापासून त्यांच्या डेटिंगच्या चर्चांवर चाहत्यांनी शिक्कामोर्तब केला.

अदिती आणि सिद्धार्थचं पहिलं लग्न अयशस्वी ठरलं. सिद्धार्थने २००३ मध्ये लग्न केलं होतं. मात्र हे लग्न फार काळ टिकलं नाही. २००७ मध्ये त्याने घटस्फोट घेतला. तर अदितीचं पहिलं लग्न सत्यदीप नावाच्या व्यक्तीशी झालं होतं. दोघांनी लग्नाची बातमी उघड केली नव्हती. मात्र घटस्फोटानंतर दोघांचं नातं सर्वांसमोर आलं होतं.

पैसा आल्यानंतर बदलला कपिल शर्मा?

विनोदवीर आणि अभिनेता कपिल शर्मा याला आज कोणत्याही ओळखीची गरज नाही. स्वतःचं कौशल्य आणि मेहनतीने कपिल याने इंडस्ट्रीमध्ये स्वतःचं स्थान भक्कम केलं आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कपिल आपल्या विनोदबुद्धीने चाहत्यांचं मनोरंजन करत आहे. द कपिल शर्मा शोचा कायम चाहत्यांमध्ये बोलबाला असतो. काही दिवसांपूर्वी द कपिल शर्मा ऑफएअर गेला होता. पण मोठ्या ब्रेकनंतर पुन्हा द कपिल भेटीसाठी येणार आहे. सध्या त्याच्या आगामी शोची चर्चा द ग्रेट इंडियन कपिल शोच्या भेटीस येणार आहे. आता ओटीटी प्लॅटफॉर्म पाहता कपिल शो ३० मार्च पासून

शर्मा शो चाहत्यांच्या सर्वत्र कपिल शर्मा आणि रंगली आहे.कपिल शर्मा आता माध्यमातून चाहत्यांच्या चाहत्यांना कपिल याला येणार आहे. द ग्रेट इंडियन नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. पत्रकार परिषदेत अर्चना पुरन सिंग हिला कपिल याच्याबद्दल एक प्रश्न विचारण्यात आला. एवढ्या वर्षांमध्ये कपिल किती बदलला आहे? असा प्रश्न विचारल्यानंतर अर्चना म्हणाली, कपिल याच्यामध्ये कोणतेही बदल झालेले नाहीत. तो पूर्वी जेवढी कॉमेडी करायचा आता त्यापेक्षा जास्त करतो..

कॉमेडी शिवाय कपिलमध्ये कोणतेही बदल झालेले नाहीत. तो छोट्या शहरातून आला आहे. पण त्याचं मन फार मोठं आहे. मी कपिल याला खूप वर्षांपासून ओळखते, त्याच्यामध्ये कोणतेही बदल झालेले नाहीत आम्ही प्रत्येक जण एकमेकांसोबत प्रेम आणि आदराने राहतो आमच्या कोणामध्ये कोणतेच मतभेद नाहीत. कपिल याची सर्वात मोठी आणि खास गोष्ट म्हणजे, तो कधीच सेटवर कोणत्याही प्रकारणाचा नकारात्मक वातावरण तयार होऊ देत नाही. असं देखील अर्चना कपिल याच्याबद्दल म्हणाली. सध्या सर्वत्र फक्त आणि फक्त अर्चना हिच्या वक्तव्याची चर्चा रंगली आहे.

कार्तिकने केले वजन कमी



कार्तिक आर्यन सध्या त्याच्या आगामी चंदू चॅम्पियन आणि भूल भुलैया या चित्रपटासाठी चर्चेत आहे.बॉलिवूड स्टार कार्तिक आर्यन लवकरच आगामी स्पोर्ट्स ड्रामा 'चंदू चॅम्पियन'मध्ये दिसणार आहे.या चित्रपटाच्या तयारीसाठी अभिनेत्याने १४ महिने बॉक्सिंगचे प्रशिक्षण घेतले या चित्रपटात हा अभिनेता पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेत्याच्या भूमिकेत दिसणार आहेकार्तिकने त्याच्या व्यक्तिरेखेत पूर्णपणे उतरण्यासाठी कठोर फिटनेस मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले. यासाठी अभिनेत्याने २० किलो वजनही कमी केले.यासोबतच त्यांनी आपल्या खाण्याच्या सवयींचीही काळजी घेतली, त्यात त्याने साखर पूर्णपणे सोडून दिली चित्रपटाचा कॅनव्हासही बराच मोठा आहे. याचे शूटिंग भारत आणि यूकेमध्ये झाले आहे.

एअर हॉस्टेस बनून करीना, क्रिती व तब्बू करणार धमाल!

मागील काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या 'द क्रू' चित्रपटाची प्रेक्षक मोठ्या आतुरतेने वाट पाहत होत,अखेर ती प्रतीक्षा आता संपली आहे.आजपासून चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. 'द क्रू' या चित्रपटाचे पोस्टर आणि टीझर रिलीज करण्यात आले आणि या माध्यमातून छोटीशी झलक प्रेक्षकांना पाहता आली होती. यामुळे आणखीनच उत्सुकता शिगेला पोहोचली होती. या चित्रपटात तब्बू, करीना कपूर आणि क्रिती सेनन पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत. तब्बू, करीना कपूर आणि क्रिती सेननसह दिलजीत दोसाझची एक दमदार झलक ट्रेलरमध्ये दिसली आहे.

या चित्रपटात बेशुद्ध प्रवासी आणि त्यांनी लपवलेली सोन्याची बिस्किटे सापडतात आणि अधिकारी म्हणतो, सोनं कुठे आहे? या संवादानंतर या तिघीही गोंधळात पडतात. गदारोळ आणि गोंधळात सुरु

असलेला प्रवास यात दाखवण्यात आला आहे. या चित्रपटात कोहिनूर नावाची एक विमान कंपनी आहे, जिच्याभोवती चित्रपटाची कथा मांडण्यात आली आहे.

या चित्रपटामध्ये तब्बूला समजत कि त्यांची कंपनी दिवाळखोर झाली आहे. ती गोष्ट करीना कपूर आणि क्रिती सेननला सांगते, त्या तिघींच्याही आयुष्यात आपापले संघर्ष आहेत.विशेष म्हणजे त्या तिघींमधील अंडरस्टॅण्डिंग खूप सुंदर पद्धतीने मांडण्यात आली आहे. दरम्यान, त्यांना एक प्रवाशी भेटतो, जो मृत असून त्याच्याकडे सोन्याची बिस्किटे आहेत. इथून कथेत ट्विस्ट येतो. आपली सगळी स्वप्नं पूर्ण करण्यासाठी, त्या या व्यक्तीकडचे सोने चोरायचे ठरवतात. कस्टम अधिकारी म्हणून दिलजीत दोसांझची एन्ट्री झाल्यानंतर कथेत आणखी नवा ट्विस्ट येतो. या चित्रपटात कॉमेडियन कपिल शर्माची भूमिकाही खूप महत्त्वाची असल्याचे दिसते आहे. एकूणच, 'द क्रू' एक पूर्ण मनोरंजन पॅकेज प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. ज्याला सोशल मीडियावर खूप पसंती दिली जात आहे. तब्बू, करीना कपूर आणि क्रिती सेनन या चोरीतून सुटू शकतील का? हे चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरच कळणार आहे. पण हे त्रिकूट चित्रपटगृहांमध्ये खळबळ उडवून देणार आहे. या चित्रपटात तिघीही एअर होस्टेसच्या भूमिकेत दिसणार आहेत. तिन्ही स्टार्सच्या दमदार अभिनयासोबतच धमाकेदार कॉमेडी देखील या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. 'द क्रू' हा चित्रपट आज २९ मार्चला थिएटरमध्ये रिलीज होत

ईशान धवन म्हणतो, ध्रुव आणि ताराचे पुनर्मीलन

सोनी सबवरील ध्रुव तारा समय सदी से परे मालिकेत एक वेधक होळीचे दृश्य प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे. प्रेक्षक बऱ्याच काळापासून ध्रुव (ईशान धवन) आणि तारा (रिया शर्मा) यांच्या पुनर्मीलनाची प्रतीक्षा करत होते आणि आता ताराला हे समजले आहे की, ध्रुव तिचा पती आहे. यानंतर बरेच नाट्य घडते आणि सूर्यप्रताप (करण व्ही. ग्रोव्हर) चे पितळ उघडे पडते.हे नाट्य उलगडत जाते, त्या दरम्यान मालिकेचे प्रेमी-युगुल ध्रुव आणि तारा यांचा एक रोमँटिक डान्स आणि आनंदी आनंद दाखवणारा होळीचा उत्सव प्रेक्षक बघणार आहेत. बराच काळ एकमेकांपासून दुरावलेले ध्रुव आणि तारा पुन्हा एकत्र आले आहेत. त्या दोघांवर चित्रित हे सुंदर दृश्य साकारताना पडद्याच्या मागे काय गंमत जम्मत झाली हे ईशान धवनने सांगितले. होळीची जादू जिवंत करणाऱ्या या क्षणांविषयी हा अभिनेता काय म्हणतो, बघू या-

होळीच्या दृश्यासाठी काय तयारी केली असा प्रश्न विचारला असता ईशान धवन उत्तरला, होळीचे दृश्य चित्रित करताना फारच मजा आली. डान्सची दृश्ये तशी हलकीफुलकी होती. त्यात हावभावांवर विशेष भर होता. कोरिओग्राफरचे आभार की, हे दृश्य त्याने आमच्यासाठी सोपे ठेवले. रोमान्स आणि रंगांनी भरलेले हे दृश्य नयनरम्य झाले आहे. आणि ध्रुव व तारा अखेरीस पुन्हा एकत्र आले आहेत.या शूटिंगमधली आव्हाने आणि आगामी दृश्यांविषयी तो म्हणतो, सगळ्यात मोठी समस्या होती, उष्णता. त्यामुळे आउटडोर शूटिंग करणे अवघड झाले होते. पण माझी सह-कलाकार रिया, प्रॉडक्शन टीम आणि या दृश्यावर काम करणारे सर्व क्रू सदस्य या सर्वांच्या सहकार्यामुळे हे दृश्य खूप छान उतरले आहे. होळीचा उत्सव आणि त्याच्या पाठोपाठ येणारी दृश्ये भावनांचा हिंदोळा घेऊन येतील. त्यात अश्रू, दुःख, प्रेम, सूड आणि पुनर्मीलन असेल. प्रेक्षकांसाठी ही मस्त पर्वणी असेल. होळी अगदी जवळ येऊन ठेपली आहे, तर मी सर्वांना होळीच्या शुभेच्छा देतो आणि तोपर्यंत मला अशा आहे की, प्रेक्षक आमच्या ध्रुव तारा कुटुंबाच्या माध्यमातून होळीचा आनंद अनुभवतील!

रंगात रंगणारी गाणी

रंगांचा उत्सव. शनिवारी प्रत्येक जण आपल्या जवळच्या व्यक्तींना रंगपंचमीच्या शुभेच्छा देत रंग लावणार.. तर नेहमीप्रमाणे यंदाच्या वर्षातील रंगपंचमी खास करण्यासाठी काही खास गाणी तुमच्या ओठांवर आली नाही तर, ती रंगपंचमी कसली? तर उद्याच्या रंगपंचमीच्या निमित्ताने या गाण्यांवर नक्की ठेका धरा

१. आली रे आली पंचिम आली (सुशीला)
ब्लॅक अँड व्हाईट काळामधलं हे गाणं आजही तितकच प्रेक्षकांच्या आवडीचं आहे. आजच्या पिढीला फारसं माहिती नसलेलं सुशिला या चित्रपटातील आली रे आली पंचिम आली हे गाणं होळीसाठी विशेष प्रसिद्ध आहे. अशोक सराफ आणि रंजना यांची सदाबहार जोडी या चित्रपटात पाहायला मिळते.राम कदम यांनी या गाण्याला संगीतबद्ध केलं आहे.

२. खेळताना रंग बाई होळीचा
ज्येष्ठ लावणी गायिका सुलोचना चव्हाण यांच्या आवाजत संगीतबद्ध झालेलं हे गाणं आहे. खेळताना रंग बाई होळीचा या गाण्याने प्रेक्षकांनाही तितकीच भुरळ पाडली. आजही मराठी गाण्यांवर थिरकताना हे गाणं आवर्जुन वाजवलं जातं.

३. अगं नाच नाच राधे उधळ्या रंग (गोंधळात गोंधळ)
'गोंधळात गोंधळ' हा चित्रपट जितकं प्रेक्षकांच्या मनावर राज्य करतो तितकचं त्यातील गाणीही प्रेक्षकांच्या कायमच पसंतीस उतरतात. याच चित्रपटातील अगं नाच नाच राधे उधळ्या रंग हे गाणं सुरेश वाडकर यांनी गायलं आहे. रविंद्र महाजनी, रंजना देशमुक आणि अशोक सराफ ही कलाकार मंडळी या चित्रपटात पाहायला मिळतात.

४. सख्या चला बागामंदी रंग खेळू चला (सामना)
उषा मंगेशकर यांच्या आवाजात संगीतबद्ध झालेलं सख्या चला बागामंदी रंग खेळू चला हे गाणं सामना या चित्रपटातील आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन जब्बार पटेल केलंय.

५. आज गोकुळात रंग खेळतो हरी
श्रीकृष्ण आणि राधेच्या गोकुळातील लिलांवरील हे गाणं गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या आवाजत संगीतबद्ध करण्यात आलं आहे. सर्व संगीतप्रेमींच्या पसंतीस पडणारं हे गाणं खास रंगपंचमीच्या सणासाठी तयार करण्यात आलंय.

६. आला होळीचा सण लई भारी (लय भारी)
लय भारी या गाजलेल्या चित्रपटातली गाणीही तितकीच गाजलीत. लय लय भारी असं म्हणत आला होळीचा सण लई भारी हे गाण देखील प्रेक्षकांच्या तितकचं पसंतीस उतरलं. अभिनेता रितेश देशमुख, अभिनेत्री राधिका आपटे आणि गेस्ट अपिअरन्समधील जेनेलियामुळे हे गाणं विशेष प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं.

७ सण आयला गो
होळी पोर्णिमेला नारळी पोर्णिमा देखील म्हटलं जातं. त्यामुळे यासाठी सण आयला गो हे कोळीगीत विशेष प्रसिद्ध आहे.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत जुगलला झाली अटक

सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पा पटेल (करुणा पांडे)ची गोष्ट सांगितली आहे, जी एक कष्टाळू आणि चिवट स्त्री आहे, जी अनेक अडचणींना धीराने तोंड देत असते. अलीकडच्या कथानकात प्रेक्षकांनी पाहिले की, दीप्ती (गरिमा परिहार) आणि चिराग (नवीन पंडिता) आपले कुटुंब परिपूर्ण करण्यासाठी स्वरा (वृही कोडवारा)ला दत्तक घेण्याचा निर्णय घेतात. जेव्हा पटेल कुटुंबात गोष्टी स्थिरस्थावर होऊ लागल्या आहेत, तेव्हा आणखी एक धक्कादायक वळण येते. दिलीप पटेल (जयेश मोरे) ची हत्या केल्याचा आरोप जुगल (अंशुल त्रिवेदी)च्या माथी येतो.

पटेल कुटुंब दत्तक घेण्याचा विधी पार पाडून एका रेस्टॉरंट मध्ये स्वराचा वाढदिवस साजरा करतात. जेव्हा सर्व जण हा आनंद साजरा करण्यात मग्न असतात, तेव्हा दिलीप पटेल जुगलचा सूड उगवण्याचा कट रचत असतो. दिलीप पटेलचा बदला घेण्यासाठी संतोष (अमित श्रीकांत सिंह) त्या रेस्टॉरंटला आग लावायचे ठरवतो. सर्व जण रेस्टॉरंटच्या बाहेर पडण्याची धडपड करत असतात. शेवटी दिलीप आणि जुगल आत राहतात. राशी जुगलला दिलीपला धक्का मारताना बघते, ज्याच्यामुळे त्याचा मृत्यू होतो. राशी आपल्या वडिलांना आगीत ढकलल्याचा आरोप जुगलवर करते, त्यामुळे पोलीस जुगलला अटक करून तुरुंगात टाकतात.या अडचणीच्या काळात पुष्पाची मेंटर, वकील देवी (उर्वशी धोळकिया) तिच्या मदतीस येते आणि जुगलला तुरुंगातून बाहेर काढण्यासाठी त्याची केस लढायला सज्ज होते.

थरारक सांगीतिक अनुभव

लिव्हिंग इट लार्जची भावना साजरी करत सीग्राम्स रॉयल स्टॅगने सादर केली रॉयल स्टॅग बूमबॉक्सची दुसरी आवृत्ती. हा एक आगळा संगीत महोत्सव आहे, ज्यामध्ये बॉलीवूडची लोकप्रिय गाणी आणि हिप-हॉपचा धुंद करणारा ठेका यांचा मिलाफ होतो. या सांगीतिक अनुभवाचा या वर्षातील तिसरा कार्यक्रम पुण्यात सादर करण्यात आला. रॉयल स्टॅग बूमबॉक्सने एक अस्सल सांगीतिक अनुभव देण्यासाठी या क्षेत्रातील अत्यंत विरुद्ध भासणारे कलाकार धाडसाने एकत्र आणले, तेव्हा पुणे शहर दुमदुमून गेले.

सुमारे १०००० प्रेक्षक जेव्हा एकत्र आले, तेव्हा रॉयल स्टॅग बूमबॉक्सच्या तरुणाईमुळे पुणे जिवंत झाले! द मिल्स, संगमवाडी हे स्थळ चमकदार रंगांनी आणि सुरांनी झळाळून उठले.

उपस्थितांनी येथे एकाच छताखाली संस्कृती, विविध माल-सामान, खाद्य पदार्थ आणि परस्पर संवादाचा आस्वाद घेतला. या प्रसंगाचे वातावरण तरुणाईने सळसळणारे होते, जे शहराच्या चैतन्यमय वृत्तीला साजेसे होते. मुख्य ॲक्ट्स व्यतिरिक्त स्थानिक बॅन्ड, डान्सर्स, रॅपर्स, बीटबॉक्सर्स यांच्या नानाविध परफॉर्मन्सेसने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. या संगीत जलशाची अधिकृत सुरुवात अली मर्चंटने मॅशअप्स सादर करून केली. त्यानंतर हिप-हॉप कलाकार डी एमसीने आपल्या हिप-हॉपच्या लयकारीने प्रेक्षकांवर गारुड केले. त्यानंतर पुढे या जलशात निखिता गांधीने आपल्या सुंदर गायनाने रंग भरले. या फेस्टिव्हलची सांगता अरमान मलिकच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या परफॉर्मन्सने झाली आणि या सुंदर आठवणी मनात घेऊन प्रेक्षक परतले.

गायक आणि गीतकार अरमान मलिक म्हणाला, संगीत सर्व सीमारेषा ओलांडून लोकांना जवळ आणते. सलग दुसऱ्या वर्षी रॉयल स्टॅग बूमबॉक्सचा एक भाग असल्याचा मला खूप आनंद आहे. आधी इंदूरमध्ये आणि आता पुण्यात परफॉर्म करण्याचा अनुभव खूप सुंदर होता.

ट्रॉलीतील कडब्याला लागलेली आग आटोक्यात आणताना अग्निशामक दलाचे जवान.

कोडणी येथे ट्रॅक्टर ट्रॉलीमधील कडब्याला आग : दहा हजारांचे नुकसान

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

शेतातील विकत घेतलेला कडबा ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरून घेऊन जात असताना विद्युतभारीत तारांचा स्पर्श झाल्याने आग लागून दहा हजार रुपयांचे नुकसान झाल्याची घटना कोडणी येथे आज गुरुवारी सकाळी घडली. बाबासो रामा सावडकर रा. आणूर ता. कागल असे नुकसानग्रस्त पशुपालकाचे नाव आहे. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

याबाबत अधिक माहिती अशी की, सावडकर यांनी कोडणी येथील शेतकरी प्रवीण खोत यांचा कडबा विकत घेतला होता. त्यामुळे ६०० पेंडी कडबा ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरून कोडणी निपाणी रस्त्यावर आणला जात होता.त्याचवेळी साळवे-कदम यांच्या इमारतीसमोर विद्युतभारित तारांचा स्पर्श ट्रॉलीतील कडब्याला झाल्यामुळे अचानक आग लागली. आगीची तीव्रता वाढल्यामुळे निपाणी अग्निशामक व हमीदवाडा कारखान्याच्या अग्निशामक दलाच्या बंबांना पाचारण करण्यात आले. अर्ध्या तासाच्या अथक परिश्रमानंतर आग आटोक्यात आणली. आगीमध्ये सर्व कडबा जळून खाक झाला. आग लागल्यानंतर लगेचच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन बचाव कार्य केले. त्यामुळे कोणतीही जीवित हानी झाली नाही. या घटनेची नोंद निपाणी अग्निशामक दलात झाली आहे.

निपाणी: मतदान जनजागृतीसाठी शहरातून काढलेली बाईक रॅली.

निपाणीत मतदान जनजागृतीसाठी शहरातून बाईक रॅली

निपाणी,ता.२९(प्रतिनिधी)–

निपाणी तालुका निवडणूक विभाग, तहसीलदार कार्यालय,निपाणी नगरपालिका यांच्यावतीने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृतीसाठी शहरातून बाईक रॅली काढण्यात आली.या रॅलीस चांगला प्रतिसाद मिळाला.

निपाणी नगरपालिकेपासून या रॅलीस सुरुवात करण्यात आली.त्यानंतर छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज चौक,जत्राटवेस, कोठीवाले कॉर्नर, कितूर चन्नम्मा सर्कलपासून पुन्हा नगरपालिकेजवळ रॅलीची सांगता करण्यात आली.रॅलीमध्ये जवळपास ६० ते ७० दुचाकी सहभागी झाल्या होत्या.रॅलीच्या माध्यमातून नागरीकांना मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले.रॅलीत विविध घोषवाक्यांचे नामफलक लक्ष वेधून घेत होते. लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा वासाठी निवडणूक विभाग व पालिकेने गेल्या अनेक दिवसापासून विविध उपक्रम राबविले आहेत.

शहरात विविध ठिकाणी सेल्फी पॉईंट निर्माण केले आहेत.या उपक्रमास नागरीकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.काही दिवसापूर्वी मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले होते. बाबेळीआयुक्त जगदीश हुलगेज्जी, यांच्यासह तहसीलदार व नगरपालिका कार्यालयातील सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी रॅलीत सहभागी झाले होते.

२४८ मतदान केंद्रांसाठी निपाणीत ३२२ ईव्हीएम मशिन्स दाखल

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

लोकसभा निवडणुकीसाठी निपाणी विधानसभा मतदारसंघात २४८ मतदान केंद्रांसाठी ३२२ व्हीव्ही–पॅट व ईव्हीएम मशिन दाखल झाले आहेत. मंगळवारी रात्री उशिरा निपाणी मतदारसंघाचे सहायक निवडणूक अधिकारी सत्यनारायण भट, तहसीलदार एम. एन. बळीगार यांनी मशिन्स स्वीकारले. दाखल झालेले ईव्हीएम, व्हीव्ही–पॅट केएनई संस्थेच्या जी. आय. बागेवाडी महाविद्यालयातील नियोजित स्ट्रॉंगरूममध्ये ठेवले आहेत. यामुळे स्ट्रॉंगरूममध्ये महाविद्यालय परिसरात बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. बेळगाव येथून पत्रासणीनंतर येथे मशिन आले आहेत.

निपाणी विधानसभा मतदारसंघात २४८ मतदान केंद्र (बूथ) आहेत. बूथ संख्येच्या तुलनेत १० टक्के ईव्हीएम अतिरिक्त देण्याचे आयोगाचे निर्देश आहेत. त्यानुसार येथे ३२२ ईव्हीएम व व्हीव्ही–पॅट मशिन आले आहेत. मतदानापूर्वी स्ट्रॉंगरूममधून या मशिनचे वितरण संबंधित मतदान केंद्र अधिकाऱ्यांना केले जाणार आहे.मतदानानंतर पुन्हा तालुक्यातील सर्व मतदान केंद्रावरील मशिन्स बागेवाडी महाविद्यालयात दाखल होणार आहेत. त्यानंतर मतमोजणीसाठी संबंधित ठिकाणी हलवली जाणार आहेत. निवडणूक अधिकारी सत्यनारायणभट, तहसीलदार बळीगार यांनी मशिन्स दाखल

निपाणी: स्ट्रॉंगरूममध्ये ईव्हीएम दाखल करून घेत असताना सत्यनारायण भट, एम.एन.बळीगार, बी.एस. तळवार.

करून घेऊन बंदोबस्तासाठीचे पत्र पोलिसांना दिले आहे. यावेळी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मतदानापूर्वी ईव्हीएमचे हस्तांतर

मतदान तारखेच्या एक दिवस आधी मतदान केंद्र अधिकाऱ्यांकडे ईव्हीएम, व्हीव्ही–पॅट मशिनचे हस्तांतर केले जाणार आहे. त्यापूर्वी सर्व केंद्रावरील निवडणूक अधिकाऱ्यांना यांना बागेवाडी महाविद्यालयात परिसरात प्रशिक्षण देऊन आवश्यक त्या सूचना निवडणूक आयोगाकडून केल्या जाणार आहेत.

निपाणीत आढळला अज्ञात इसमाचा मृतदेह

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

येथील बस स्थानकजवळील वैभव लॉज परिसरात ४० ते ४५ वयोगटातील अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला.सदर व्यक्तीच्या अंगावर पांढरा व तांबडा टी–शर्ट व पॅन्ट असून उंची पाच फूट आहे. सदर व्यक्तीच्या खिशात निपाणी भैरप्पू वस्णे प्रवास केल्याचे तिकीट आढळले आहे.

घटनास्थळी शहर पोलीस ठाण्याच्या उपनिरीक्षक उमादेवी यांनी भेट देऊन पाहणी केली.मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी मृतदेह बेळगाव सरकारी रुग्णालयात ठेवण्यात आला आहे.याबाबत कोणाला माहिती असल्यास शहर पोलीस ठाण्याची संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

तांबवे ग्रामस्थांचे सार्वजनिक सुविधांसाठी ५ एप्रिलला लाक्षणिक उपोषण

इस्लामपूर ता.२८(प्रतिनिधी)–

तांबवे ता. वाळवा येथील गावातील काही महत्त्वाच्या ज्वलंत प्रश्नावर सातत्याने मागणी करून ही ग्रामपंचायतीने दुर्लक्ष व टाळाटाळ केली आहे.याबाबत कसलीही दखल न घेतल्यामुळे ५ एप्रिल २४ रोजी बरोबर असणाऱ्या काही कार्यकर्त्यांसह गावातील मठ परिसरात लाक्षणिक उपोषण करणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते रतन पाटील यांनी दिली.

ते म्हणाले, गेली दोन महिने गावातील काही महत्त्वाच्या प्रश्नांसाठी मागणी करत आहोत. त्यामध्ये श्री हनुमंत मंदिर ते कृष्णा नदी आणि स्मशानभूमी च्या पूर्वेकडील हद्द ते पश्चिमेकडे हद्द येथील अतिक्रमणे दूर करावीत, झाडे झुडपे खड्डे मुजवून परिसर कचरा मुक्त व स्वच्छ करावा, गावातील ग्रामपंचायतच्या मालकीचा असणाऱ्या शासकीय इमारती स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेसाठी उपलब्ध करून द्याव्यात. गावातून घंटागाडी मार्फत जमा केला जाणारा कचरा जाळून टाकला जातो, त्यामुळे वायू प्रदूषण जल प्रदूषण होत आहे. कचरा ही समस्या न मानता संपत्ती मानून त्यावर व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प त्वरित चालू करावेत या आणि अशा काही मागण्यांच्या साठी आम्ही आग्रह आहोत. या सर्व प्रश्नांची एक महिन्यांच्या आत पूर्तता वा सोडवणूक करावी व ती न केलेस शुक्रवार दि.५ एप्रिल रोजी बरोबर असणाऱ्या व्यक्तींच्या बरोबर गावातील मठ परिसरात लाक्षणिक उपोषण करणार आहोत.त्यातूनही या प्रश्नांकडे दुर्लक्ष झालेस पुढे साखळी उपोषण तसेच आमरण उपोषण ही करू.

यावेळी शंकर उर्फ आप्पा तोडकर, मंगेश मोरे, गणेश पाटील, डॉ संदीप निकम, रविकिरण माने,प्रशांत मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री गंगा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत, चंदूर

ता. हातकणंगले जि. कोल्हापूर

नमुना 'झेड'

नोटीस रजि. ए. डी. पोस्टाने

(महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चा नियम १०७ (३), १०७ (११) (डी) प्रमाणे)

स्थावर मिळकतीची ताबा नोटीस

प्रति,

१. श्री. राजू तातोबा देवळे
रा. मलाबादे नगर,चंदूर ता. हातकणंगले,जि. कोल्हापूर **जाबदार**

२. श्री. बाळू बापू मंगसुळे
रा. मलाबादे नगर,चंदूर ता. हातकणंगले,जि. कोल्हापूर **जाबदार**

३. श्री. विवेक कुमार पाटील
रा. गावभग,चंदूर ता. हातकणंगले,जि. कोल्हापूर **जाबदार**

मी खाली सही करणार वसुली अधिकारी श्री गंगा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, चंदूर ता. हातकणंगले जि. कोल्हापूर मला (महाराष्ट्र सह. कायदा १९६० चे कलम १५६ व नियम ९०७ (११) (ड) प्रमाणे) ने प्राप्त झाले अधिकारानुसार तुम्हांस दि.२२/११/२०२३ इ. रोजी रक्कम रु.६,७२,८४५/– ची डिमांड (मागणी) नोटीस दिलेली आहे.

तथापी सदर नोटीसीप्रमाणे येणे निघणारी व्याजासहीत रक्कम न भरलेमुळे खालील परिशिष्ट (अ) प्रमाणे मिळकतीचा दि. २७/०३/२०२४ इ. रोजी खाली सही करणार यांनी (प्रतिकात्मक) ताबा घेतला आहे.

तरी जाबदार यांनी हुकूमनाम्याप्रमाणे रक्कम भरणेस कसूर केली असलेने तमाम जनतेला कळविणेत येते कि, खालील परिशिष्ट अ प्रमाणे मिळकतीबाबत त्यांनी किंवा इतर कोणीही इसम, संस्था, नागरिक यांनी तबदिलीबाबतचा कोणताही व्यवहार करू नये, असा व्यवहार केलेस तो श्री गंगा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत, चंदूर ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांच्या कर्ज रक्कम रु.६,७२,८४५/– व त्यावरील व्याज तसेच इतर खर्चाच्या रक्कमेस अधिन राहील. म्हणून दिली नोटीस.

परिशिष्ट अ

१) कर्जदार–श्री. राजू तातोबा देवळे,रा. मलाबादे नगर, चंदूर,ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. **मिळकतीचे वर्णन–** मौजे चंदूर ता. हातकणंगले येथील क.ग.नं. ९९८ पैकी प्लॉट नं. ३२ ची मिळकत क्षेत्र १५९.६९ चौ.मी.म्हणजेच १७१७.५ चौ.फू. यास चतुः सिमा – पुर्वेस – २० फुट रस्ता पश्चिमेस – १० फुट रस्ता, दक्षिणेस – श्री. पोवार यांची मिळकत, उत्तरेस – प्लॉट नं.३२ मधील उर्वरीत क्षेत्र.

ठिकाण – चंदूर
दिनांक : २७/०३/२०२४ **सही/–**
वसुली अधिकारी
(म.स.सं.अ. १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)
श्री गंगा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत,चंदूर

Shri Ganga Gramin Bigarsheti Sahakari Patsanstha Maryadit Chandur Chandur

Tal-Hatkanangale Dist.-Kolhapur

FORM 'Z'

Notice Reg.A.D.

(Under rule 107(3),(11(d-1)) of the Maharashtra Co.Operative Societies Act 1960)

Symbolic Possession

Recovery Officer

To,

1. Shri. Raju Tatoba Devale **Respondent**
Malabade Nagar, Chandur Tal.Hatkangale Dist.Kolhapur

2. Shri. Balu Bapu Mangsule **Respondent**
Malabade Nagar, Chandur Tal.Hatkangale Dist.Kolhapur

3. Shri. Vivek Kumar Patil **Respondent**
Gaon Bhag Chandur Tal.Hatkangale Dist.Kolhapur

Whereas the undersigned being the Recovery Officer of the Shri Ganga Gramin Bigarsheti Sahakari Patsanstha Maryadit, Chandur Tal.Hatkangale Dist.Kolhapur under the Maharashtra Co- Operative Societies Act,1960, Rules 1961, issued a demand notice dated 22/11/2023 to the judgements debtor and calling the amount of Rs.6,72,845/-

With the date of receipt of the said notice and the judgement debtor having failed to repay the above mentioned amount undersigned has taken symbolic possession of the property described in schedule "A" below on dt.27/03/2024.

The judgement debtor having failed to repay the amount, notice is hereby given to the judgement debtor and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of Shri Ganga Gramin Bigarsheti Sahakari Patsanstha Maryadit, Chandur Tal.Hatkangale Dist.Kolhapur for an amount of Rs.6,72,845/- with interest and other expenses.

DESCRIPTION OF PROPERTY
Scheduled "A"

Woner of the Property - Mr. Raju Tatoba Devale, **Gat No. -** 198 Area Plot No.32, **Area -** 159.61 Sq. Mtr. Means 1717.5 Sq. Feet, **Bounrdries-** East-20Ft. Road West-10Ft Road, South- Shri.Powar, North - Part of Area Plot No. 32. **Remark** - Property belonging to Mr. Raju Tatoba Devale Which is mortgage to the patsanstha in execution of recovery certificate.

Place - Chandur
Date - 27 MAR 2024 **Sd/-**
Recovery Officer
M.C.S. Act 1960 & Rule 107 U/s. 156 & Rule 107
Shri Ganga Gramin Bigarsheti Sahakari Patsanstha Maryadit, Chandur

कागलला नवीन विश्रामगृहासाठी पावणेतीन कोटी रुपये मंजूर

कागल,ता.२८ (प्रतिनिधी)–

कागल येथे नवीन विश्रामगृहासाठी पावणेतीन कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. नुकतीच याबाबतची प्रशासकीय मान्यता मिळाल्याची माहिती पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. या निधीतून कागलमध्ये सर्व सुविधायुक्त प्रशस्त नवीन रेस्ट हाऊस होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

याबाबत अधिक माहिती अशी, कागल –कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावर सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत रेस्ट हाऊस आहे. परंतु; राष्ट्रीय महामार्गाच्या सुरू असलेल्या सहा पदरीकरणामध्ये या रेस्ट हाऊसचा बराचसा भाग जाणार आहे. विविध शासकीय बैठकांसाठी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांसाठी हे रेस्ट हाऊस सोयीचे होते. त्यामुळे या नवीन रेस्ट हाऊसची तरतूद केली आहे.*

असे होणार नवीन रेस्ट हाऊस.....!

तळमजल्याच्या बांधकामासह नवीन रेस्ट हाऊसमध्ये विद्युतीकरण, अग्निशामक यंत्रणा, वातानुकूली यंत्रणा, पाणीपरवठा, परिसर विद्युतीकरण, सीसीटीव्ही, फर्निचर आणि संरक्षक भिंत यांचा समावेश आहे.

Shri Vasudevanand Saraswati Gramin Bigarsheti Sahakari Patsanstha Maryadit Nrusinhwadi

Tal-Shirol Dist.-Kolhapur

FORM 'Z'

Notice Reg.A.D.

(Under rule 107(3),(11(d-1)) of the Maharashtra Co.Operative Societies Act 1960)

Symbolic Possession

Recovery Officer

To,

1. Shri. Kunal Kishor Gidwani **Respondent**
Nrusinhwadi Tal.Shirol Dist. Kolhapur

2. Shri. Manjunath Hanmant Malwale **Respondent**
Nrusinhwadi Tal.Shirol Dist. Kolhapur

3. Shri Mahadev Vasant Pujari **Respondent**
Nrusinhwadi Tal.Shirol Dist. Kolhapur

Whereas the undersigned being the Recovery Officer of the Shri Vasudevanand Saraswati Gramin Bigarsheti Sahakari Patsanstha Maryadit, Nrusinhwadi Tal. Shirol Dist. Kolhapur under the Maharashtra Co-Operative Societies Act 1960, Rules 1961, issued a demand notice dated 23/11/2023 to the judgements debtor and calling the amount of Rs.67,34,974/-.

With the date of receipt of the said notice and the judgement debtor having failed to repay the above mentioned amount undersigned has taken symbolic possession of the property described in schedule "A" below on dt.28/03/2024.

The judgement debtor having failed to repay the amount, notice is hereby given to the judgement debtor and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of Shri Vasudevanand Saraswati Gramin Bigarsheti Sahakari Patsanstha Maryadit, Nrusinhwadi Tal.Shirol Dist.Kolhapur for an amount of Rs.67,34,974/- with interest and other expenses.

DESCRIPTION OF PROPERTY
Scheduled "A"

Woner of the Property - Mr. Kunal Kishor Gidwani, **Gat No. -** 10 Area Plot No.4, **Area -** 181 Sq. Mtr. **Boundries-** East-Plot No.6, West-Plot No.3, South- Shri Kulkarani, North - Road **Remark** - Property belonging to Mr. Kunal Kishor Gidwani Which is mortgage to the patsanstha in execution of recovery certificate.

Place - Nrusinhwadi
Date - 28 MAR 2024 **Sd/-**
Recovery Officer
M.C.S. Act 1960 & 1961 U/s. 156 & Rule 107
(Shri Vasudevanand Saraswati Gramin Bigarsheti Sahakari Patsanstha Maryadit, Nrusinhwadi

श्री वासुदेवानंद सरस्वती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत, नृसिंहवाडी ता.शिरोळ जि.कोल्हापूर

नमुना 'झेड'

नोटीस रजि. ए. डी. पोस्टाने

(महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चा नियम १०७ (३), १०७ (११) (डी) प्रमाणे)

स्थावर मिळकतीची ताबा नोटीस

प्रति,

१. १. श्री. कुणाल किशोर गिदवाणी
रा. नृसिंहवाडी ता.शिरोळ जि.कोल्हापूर **जाबदार**

२. श्री. मंजुनाथ हणमंत माळवाले
रा. नृसिंहवाडी ता.शिरोळ जि.कोल्हापूर **जाबदार**

३. ३. श्री. महादेव वसंत पुजारी
रा. नृसिंहवाडी ता.शिरोळ जि.कोल्हापूर **जाबदार**

मी खाली सही करणार वसुली अधिकारी श्री वासुदेवानंद सरस्वती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत, नृसिंहवाडी ता. शिरोळ जि. कोल्हापूर मला (महाराष्ट्र सह. कायदा १९६० चे कलम १५६ व नियम १०७(११) (ड) प्रमाणे) ने प्राप्त झाले अधिकारानुसार तुम्हांस दि.२३/११/२०२३ इ. रोजी रक्कम रु.६७,३४,९७४/– ची डिमांड (मागणी) नोटीस दिलेली आहे.

तथापी सदर नोटीसीप्रमाणे येणे निघणारी व्याजासहीत रक्कम न भरलेमुळे खालील परिशिष्ट (अ) प्रमाणे मिळकतीचा दि. २८/०३/२०२४ इ. रोजी खाली सही करणार यांनी (प्रतिकात्मक) ताबा घेतला आहे.

तरी जाबदार यांनी हुकूमनाम्याप्रमाणे रक्कम भरणेस कसूर केली असलेने तमाम जनतेला कळविणेत येते कि, खालील परिशिष्ट अ प्रमाणे मिळकतीबाबत त्यांनी किंवा इतर कोणीही इसम, संस्था, नागरिक यांनी तबदिलीबाबतचा कोणताही व्यवहार करू नये, असा व्यवहार केलेस तो श्री वासुदेवानंद सरस्वती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत, नृसिंहवाडी ता. शिरोळ जि. कोल्हापूर यांच्या कर्ज रक्कम रु.६७,३४,९७४/– व त्यावरील व्याज तसेच इतर खर्चाच्या रक्कमेस अधिन राहील. म्हणून दिली नोटीस.

परिशिष्ट अ

१) कर्जदार–श्री. कुणाल किशोर गिदवाणी,रा. नृसिंहवाडी ता.शिरोळ जि. कोल्हापूर **मिळकतीचे वर्णन–** मौजे नृसिंहवाडी ता.शिरोळ येथील क.ग.नं. १० पैकी प्लॉट नं. ४ ची मिळकत क्षेत्र ९८१ चौ.मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस – प्लॉट नं.६ ची जागा, पश्चिमेस – प्लॉट क्र.३ ची जागा दक्षिणेस – श्री. कुलकर्णी यांची मिळकत, उत्तरेस रस्ता.

ठिकाण – नृसिंहवाडी
दिनांक : २८/०३/२०२४ **सही/–**
वसुली अधिकारी
(म.स.सं.अ. १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)
वासुदेवानंद सरस्वती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत, नृसिंहवाडी

कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., (मल्टी–स्टेट शेड्युल्ड बँक)

मुख्य कार्यालय :– वॉर्ड नं. १२, घर नं. १, जनता बँक भवन,मेन रोड इचलकरंजी – ४१६११५ जिल्हा – कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य)

ताबा नोटीस

ज्या अर्थी खाली सही करणार कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनानशिअल अॅसेटस अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ मधील कलम १३ (१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम ९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाऱ्यान्वये दि. २२/१२/२०२३ रोजीची जारी केलेल्या मागणी नोटीसीनुसार १) मे. कोरे टेक्सटाईल्स, प्रो. प्रा. श्री. अविनाश शंकर कोरे, १/३२०, टाकवडे वेस, इचलकरंजी–४१६११५, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (कर्जदार), २) श्री.अशोक शंकर चनविरे, ३/१४०, टाकवडे वेस, इचलकरंजी– ४१६११५, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (जामीनदार), ३) श्री. रामगोंडा केदारगोंडा पाटील, १३/२७४, जुना चंदूर रोड, इचलकरंजी ४१६११५, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (जामीनदार) ४)श्री.सुहास शंकर कोरे, १/३२०, टाकवडे वेस, इचलकरंजी ४१६११५ ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर (जामीनदार) ५)श्रीमती.सुशिला शंकर कोरे १/३२०, टाकवडे वेस, इचलकरंजी–४१६११५, ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर (जामीनदार) यांना सदर मागणी नोटीसीमध्ये नमूद केलेली दि. ३०/११/२०२३ रोजी पर्यंतची येणे रक्कम रु.२२,३५,५४७/– (अक्षरी रक्कम रुपये बावीस लाख पस्तीस हजार पाचशे सत्तेचाळीस फक्त) व त्यावर करारातील व्याज दराप्रमाणे होणारे पुढील व्याज व खर्च सदर नोटिसीच्या तारखेपासून ६० दिवसांत बँकेस भागविणेची समज दिली होती.

सदर कर्जदार व इतर यांनी सदरची थकबाकी भागविली नसल्यामुळे सदर कर्जदार व विशेषकरुन इतर आणि तमाम जनतेस या नोटिसीद्वारे अशी सूचना देणेत येते की, खाली सही करणाऱ्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी त्यांना सदर कायद्यातील कलम १३(४) व नियम ९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा दि.२६/०३/२०२४ रोजी घेतला आहे.

सदर कर्जदार व विशेषकरुन इतर आणि तमाम जनतेस या नोटिसीद्वारे असे कळविणेत येते की, त्यांनी खालील वर्णन केलेल्या मालमत्तेविषयी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये आणि जर केला तर तो कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., यांची दि.३०/११/२०२३ रोजी पर्यंतची येणे रक्कम रु.२२,३५,५४७/– (अक्षरी रक्कम रुपये बावीस लाख पस्तीस हजार पाचशे सत्तेचाळीस फक्त) व त्यावर करारातील व्याज दराप्रमाणे होणारे पुढील व्याज व खर्च यास बंधनकारक राहील.

मालमत्तेचा तपशील

तुमचेपैकी श्री. अविनाश शंकर कोरे, ४) श्री. सुहास शंकर कोरे आणि ५) श्रीमती. सुशिला शंकर कोरे यांचे मालकीची इचलकरंजी ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील रि.स.नं. ७०९/२ यांचे एकुण क्षेत्र हे १ = ४१ आर .खराब हे ०=०२ आर, आकार रक्कम रु.३=५९ पैसे. यापैकी बिगरशेती प्लॉट नं. १४ आणि १५ याचे क्षेत्र ९३५० चौ.फुट मिळकत यांसी चतु:सिमा पुर्वेस खुली जागा, पश्चिमेस – रस्ता, दक्षिणेस इन्कम टॅक्स कॉलनी आणि उत्तरेस– रस्ता, येणेप्रमाणे चतु:सीमेतील सर्व इजमेंटरी व इतर अनुषंगिक सर्व हक्कासह मिळकत व त्यावर बांधणेत आलेली इमारत याचा वार्ड नं. ९, घर नं. ९७८ वासह सर्व मिळकत.

दिनांक : २६/०३/२०२४.
ठिकाण : इचलकरंजी.

सही /–
(सी.बी. पाटील)
चीफ मॅनेजर व प्राधिकृत अधिकारी
कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.

चंद्रपूर हा विदर्भातील महत्त्वाचा लोकसभा मतदारसंघ पूर्वीच्या काळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. मध्यंतरीच्या काळात भाजपाने काँग्रेसकडून हा गड सर केला. केंद्रीय कोळसा मंत्री राहिलेल्या हंसराज अहीरांमुळे या मतदारसंघाची देशाला ओळख झाली. २०१९ मध्ये महाराष्ट्रात आणि देशात मोदी लाट असतानाही अहीरांचा या मतदारसंघात पराभव झाला आणि काँग्रेचे बाळू धानोरकर विजयी झाले. मध्यंतरीच्या काळात त्यांचे निधन झाले. त्यानंतर या जागी वडेट्टीवारांना आपल्या कन्येला उमेदवारी द्यायची होती; पण काँग्रेस पक्षाने प्रतिभा धानोरकर यांना या मतदारसंघातून रिंगणात उतरवले आहे. दुसरीकडे भाजपानेही सुधीर मुनगंटीवार यांना उमेदवारी देत अभ्यासू, अनुभवी आणि दिग्गज नेता उतरवला आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक चुरशीची होणार आहे. गेल्या निवडणुकीत वंचितच्या उमेदवाराने लाखभर मते घेतली होती. यंदा वंचितने राजेश वारलू बेले यांना उमेदवारी दिली आहे. या तिरंगी लढतीत भाजपची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.

■ चंद्रपूर मतदारसंघ

तिरंगी लढतीत भाजपची प्रतिष्ठा पणाला

चंद्रपूर म्हणजे सिटी ऑफ ब्लॅक गोल्ड! म्हणजेच कोळसा खाणीचे शहर. देशाच्या वाढत्या उर्जेची गरज भागवण्यासाठी कोळसा पुरवणाऱ्या सुमारे ५० खाणी चंद्रपूरमध्ये आहेत. चंद्रपूर म्हणजे प्राचीन गोंड साम्राज्यकाळातील राजधानीचे शहर. दक्षिण भारताला उत्तरेशी जोडणारा एक सांस्कृतिक दुवा म्हणून या शहराची ओळख आहे. चंद्रपूर हा अनेक वर्षे काँग्रेसशी एकनिष्ठ राहिलेला मतदारसंघ आहे. या मतदारसंघाने काँग्रेसला भरभरुन यश दिले. पूर्वी काँग्रेसच्या तिकीटावर कोणालाही उभे केले तरी तो निवडून येणार अशी स्थिती होती. भाजपाने काँग्रेसच्या अंतर्गत कलाहाचा फायदा घेत येथे पाय रोवले. १९७७ साली येथील जनतेने काँग्रेसला पहिला धक्का दिला. याआधी काँग्रेस एके काँग्रेस चालणाऱ्या जनतेने आणीबाणीविरोधी कौल देत आदिवासींचे राजे विश्वेश्वरराव महाराज यांना संसदेत पाठवले. हा अपवाद वगळता नंतरच्या काळात १९८०, ८४, ८९, ९१ अशा सलग चार वेळेस काँग्रेसचे नेते शांताराम पोटदुखे यांनी येथून विजय मिळवला. १९९६ साली भाजपाने हंसराज अहिर यांच्या रुपाने या मतदार संघात विजय मिळवला. मात्र लगेच दोन वर्षांनी पारडे फिरले आणि काँग्रेसचे कामगार नेते नरेश पुगलिया यांनी भाजपाला हरवून पुन्हा काँग्रेसला विजय मिळवून दिला. १९९९ सालीही काँग्रेसनेच विजय मिळवला. २००४ साली भाजपाचे हंसराज अहिर यांनी पुन्हा बाजी मारली. २००९ मध्येही तेच पुन्हा विजयी झाले. २००९ साली गडचिरोलीचा मोठा आदिवासी भाग चंद्रपूर लोकसभेतून वेगळा झाला. यवतमाळ जिल्ह्यातील दोन विधासभा मतदार संघ चंद्रपूरला जोडले गेले. त्यानंतरही भाजपने मिळवलेले यश उल्लेखनीय ठरले. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत हंसराज अहीर यांना ५,०८,०४९ इतकी मते मिळाली तर काँग्रेसच्या संजय देवतळेंना २,७१,७८० इतकी मते मिळाली होती. त्यावेळी वामन चटप हे शेतकरी संघटनेचे उमेदवार म्हणून उभे होते. त्यांनी त्यावेळी अहीर यांची बऱ्यापैकी मते घेतली होती. २०१९ मध्ये काँग्रेसचे उमेदवार सुरेश धानोरकर यांनी ५,५१,५०७ मते मिळवत अहीरांचा पराभव केला होता. हंसराज अहीर यांना गतनिवडणुकीत ५,१४,७४४ मते मिळाली; तर वंचित बहुजन विकास आघाडीचे उमेदवार राजेंद्र महाडोळे यांना १,१२,०७९ मते मिळाली होती.

दृष्टिक्षेप मागील मतदानावर

पक्ष	उमेदवार	२०१९
काँग्रेस	सुरेश धानोरकर	५५९,५०७
भाजपा	हंसराज अहिर	५,१४,७४४
वंचित	राजेंद्र महाडोळे	१,१२,०७९

पक्ष	उमेदवार	२०१४
भाजपा	हंसराज अहिर	५,०८,०४९
काँग्रेस	संजय देवतळे	२,७१,७४०
बसपा	हंसराज कुंभारे	४९,२२९

विजयी होत असताना चंद्रपूर ही एकमेव जागा मिळवण्यात काँग्रेसला यश आले होते. त्यामुळे बाळू धानोरकर यांचा विजय काँग्रेससाठी तेवढाच महत्त्वाचा होता. मतदार संघातील विकास कामांसाठी त्यांचा सातत्यपूर्ण असा पाठपुरावा आणि धडपड बाळू धानोरकर परिवाराचे वर्चस्व आहे. बाळू धानोरकर हे वरोरा-भद्रावती विधानसभा मतदारसंघाचे २०१४ पूर्वी पाच वर्षे आमदार होते. त्यानंतर २०१९ मध्ये त्यांनी चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक लढवली. खासदार म्हणून निवडून आल्यानंतर रिकाम्या झालेल्या वरोरा-भद्रावतीच्या आमदाराच्या जागेवर इतर कोणत्याही योग्य उमेदवाराला संधी न देता काँग्रेसकडून धानोरकर यांच्याच पत्नी प्रतिभा धानोरकर यांची वर्णी लावण्यात आली. बाळू धानोरकर यांचे भाऊ व प्रतिभा धानोरकर यांचे दीर गेल्या अनेक वर्षांपासून भद्रावतीच्या नगराध्यक्ष पदावर आहेत. बाळू धानोरकर यांच्या निधनानंतर काँग्रेसने पुन्हा एकदा प्रतिभा धानोरकर यांच्या माध्यमातून घराणेशाहीला खतपाणी घालण्याचा प्रयत्न केला आहे.

दुसरीकडे भारतीय जनता पक्षाने यंदा या मतदारसंघात सुधीर मुनगंटीवार यांना उमेदवारी दिली आहे. नितीन गडकरींचे कट्टर समर्थक मानल्या जाणाऱ्या मुनगंटीवारांनी आमदार, पालकमंत्री, भाजपचे प्रदेशाध्यक्ष, कॅबिनेट मंत्री अशी अनेक पदे भूषविले आहेत. उच्चशिक्षित मुनगंटीवार यांनी बी.कॉम, एम.कॉम, डीबीएम, बीजे, एम.फिल अशा पदव्या घेतल्या आहेत. सुधीर मुनगंटीवार चंद्रपूर भाजपचे अभ्यासू नेते म्हणून ओळखले जातात. बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातून ते ३ वेळा आमदार आहेत. गेली अनेक वर्षांपासून चंद्रपूर जिल्ह्यात पालकमंत्री म्हणूनही त्यांनी काम केले आहे. राज्य मंत्रिमंडळात अनेक महत्त्वाचे खाती सांभाळण्याचा मुनगंटीवार यांना अनुभव आहे. देवेंद्र फडणवीस मंत्रिमंडळात अर्थमंत्र्यासारखे महत्त्वाचे खाते त्यांच्याकडे होते. त्यामुळे सर्वार्थाने तगडा उमेदवार देण्याचा प्रयत्न भाजपने केला आहे. अलीकडेच सुधीर मुनगंटीवार यांनी विजय संकल्प यात्रेच्या माध्यमातून जोरदार शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज सादर केला. यावेळी माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांची उपस्थिती होती. या आधी काढलेल्या रॅलीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे देखील उपस्थित होते.

आता चंद्रपूरची जनता प्रतिभा धानोरकर यांना मतदान करते की सुधीर मुनगंटीवार यांना विजयी करते हे पहावे लागेल.

गतनिवडणुकीमध्ये बाळू धानोरकर यांनी चंद्रपूरमध्ये असलेल्या दारूबंदी कायद्याला विरोध केला होता. या भूमिकेमुळे त्यांचा विजय झाला होता, असाही दावा केला जातो. मात्र, २०१९ ते २०२४ या कालखंडामध्ये दारूबंदीचा मुद्दा मागे पडला आहे. आता चंद्रपूर लोकसभा मतदारसंघामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कुणबी मराठा विरुद्ध इतर समाज असा दिसून येतोय. प्रतिभा धानोरकर या कुणबी मराठा समाजातील आहेत तर त्यांच्याविरुद्ध भाजपने सुधीर मुनगंटीवार यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात जातीचे समीकरण कोणाच्या बाजूने कल देते? हे पाहावे लागेल. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत लाखावर मताधिक्य घेतले होते. यंदा वंचितने राजेश वारलू बेले यांना उमेदवारी दिली आहे. या तिरंगी लढतीत भाजपची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.

टिकली

कोण कोणाच्या बाजूने
कोण कोणाच्या विरोधात...
मतदारराजा संभ्रमात
पक्षश्रेष्ठीही गोंधळात...

किस्से असेही

ही घटना आहे १९७४ मधील. उत्तर प्रदेशातील आंवला लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार राजवीर सिंह हे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जुन्या मित्रांपैकी एक होते. १९७४ मध्ये जनसंघाचा उमेदवार शाम बिहारी यांच्या निवडणूक प्रचारासाठी अटलबिहारी वाजपेयी बरेलीला आले होते. त्यावेळी राजवीर सिंह आणि माजी महापौर सुभाष पटेल यांना घेऊन बरेलीहून अलिगंजला जात होते. अचानकपणे त्यांचे जीप एका खड्ड्यात अडकली. काही क्षण प्रयत्न करून पाहिले, पण व्यर्थ. लगेचच अटलजी जीपमधून उतरले आणि म्हणाले, राजवीर तू गाडी चालव, आम्ही धक्का देतो.'



याबाबत राजवीर सिंह सांगतात, की मझगवा ब्लॉकच्या समोर आमची जीप पोहोचली तेव्हा ती एका मोठ्या खड्ड्यात अडकली. मी बराच प्रयत्न केला पण काही केल्या जीप त्यातून बाहेर येईना. अखेर मी वाजपेयींना म्हणालो की तुम्ही स्टियरिंग सांभाळा मी गाडीला मागून धक्का देतो. पण त्यांनी माझे म्हणणे ऐकले नाही. ते म्हणाले, तुम्ही बसा मी गाडी ढकलतो.

अटलजी गाडी ढकलत आहेत हे पाहून तेथे गर्दी जमा झाली आणि लोकांनी खड्ड्यात अडकलेली जीप बाहेर काढून दिली. गाडीत बसल्या बसल्या अटलजी म्हणाले, ' पाहिलंस राजवीर, तू गाडी चालवण्यात माहीर आहेस आणि मी अडचणीत सापडलेल्या लोकांना बाहेर काढण्यात !' यावर आम्ही हसत हसत अलीगंजला जाण्यासाठी पुढे प्रयाण केले. राजवीर सांगतात, यानंतर आमच्यातील गाठीभेटी अखंड सुरू राहिल्या. मी ६० वर्षांचा झालो तेव्हा अटलजींनी मला शुभेच्छा संदेश पाठवला. त्यात माझी खूप प्रशंसा केली होती. ते वाचून मी खूप रडलो. आजच्या राजकारणात खरोखरीच अटलजींसारखे नेते दुर्मिळ झाले आहेत.

■ लोकसभेतील इंद्रजीत गुप्त

दिवंगत कम्युनिस्ट नेते इंद्रजीत गुप्त तब्बल ११वेळा लोकसभेचे सदस्य बनले. भाकपचे इंद्रजीत गुप्त १९६० च्या दुसऱ्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमधून विजयी झाले. १९७७ ते १९८० ही सहावी लोकसभा निवडणूक सोडून २००१ पर्यंत म्हणजेच त्यांच्या निधनापर्यंत ते लोकसभेचे सदस्य होते. त्यांना १९९२ मध्ये 'अद्वितीय संसदपटू' या पुरस्काराने गौरवण्यात आले. देवेगौडा सरकारच्या (१९९६-९८) काळात ते गृहमंत्रीही होते. सर्वांत वरिष्ठ खासदार असल्याने ते तीनवेळा पोटेंम स्पीकर बनले. ते कित्येक संसदीय समित्यांचे सदस्यही होते.

शेषन काल : १९९० : निवडणूक प्रक्रियेला मजबूत बनवण्यात व त्यातील नियमात सुधारणा करण्यात भारताचे प्रमुख निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन(१९९०-१९९६) यांचा वाटा खूप मोठा आहे. निवडणूक आयोग हा भारतीय राजकारणाचे एक प्रमुख अंग आहे. पण ही गोष्ट शेषन कालातच प्रसिद्धीस आली. मतदारांचे ओळखपत्र बनवण्यात यावे ही कल्पना टी. एन. शेषन यांची आहे. शिवाय निवडणूक प्रक्रियेतील भ्रष्टाचार रोखण्यासाठीही त्यांनी बरीच पावले उचलली.

■ राज्यरंग बिजद विरुद्ध भाजपा

ओडिशामध्ये विधानसभा आणि लोकसभा निवडणूका एकाच वेळी घेतल्यास भाजपला यश मिळेल, असा भाजपचा दावा होता. गेल्या लोकसभा निवडणुकीत या राज्यात भाजपला चांगले यश मिळाले होते. याचे खरे कारण मोदींची लोकप्रियता मानली गेली. पण भाजप इथे अचानक क्रमांक दोनचा पक्ष बनलेला नाही. सत्तेच्या दशकापर्यंत ओडिशातील कै. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांचा स्वतंत्र पक्ष हा दुसऱ्या क्रमांकावर असायचा. १९६७ मध्ये आर.एन. सिंग देव यांचेही सरकार होते. स्वतंत्र पक्ष हा मुळात अशा जुन्या राजे आणि राजपुत्रांचा पक्ष होता ज्यांच्या संस्थानांनी ओडिशाचा मोठा भाग व्यापला होता. सुरुवातीला ही संस्थाने ओरिया गणतंत्र परिषदेच्या झेंड्याखाली एकत्र आली आणि लोकशाही निवडणूक पद्धतीद्वारे या सर्व राज्यांतील प्रजाजनांनीही त्यांना मतदान केलं. पुढे, १९५६ मध्ये जेव्हा राजाजींनी काँग्रेस सोडली आणि स्वतःचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला, तेव्हा रिपब्लिकन कॉन्सिल स्वतंत्र पक्षात विलीन झाली. पुढे १९७४ मध्ये स्वतंत्र पक्षाचेही चौधरी चरणसिंग यांच्या नेतृत्वाखालील भारतीय लोकदलात विलीनीकरण झाले. पण बिजू पटनायक यांनी आधीच काँग्रेसपासून फारकत घेत स्वतःच्या उत्कल काँग्रेस या पक्षाची स्थापना केली होती. हा पक्ष १९७४ मध्ये लोकदलात विलीन झाला. पुढे १९७५ मध्ये लादलेल्या आणीबाणीनंतर १९७७ मध्ये निवडणुका झाल्या आणि लोकदलही जनता पक्षात विलीन झाला. त्यावेळी ओडिशातील जनतेने विधानसभा ते लोकसभेपर्यंत जनता पक्षाला मतदान केले होते.

केंद्रात १९९८ मध्ये जेव्हा स्व. अटलबिहारी वाजपेयींचे एनडीए सरकार सत्तेवर असताना बिजू जनता दलाचा एक भाग बनला; पण २००९ मध्ये त्यांनी एनडीए आघाडी सोडली आणि काँग्रेस आणि भाजप या दोघांपासून समान अंतर ठेवण्याची घोषणा केली.

गेल्या काही वर्षांमध्ये या राज्यात भाजपने नियोजनबद्धरित्या विकास केला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत स्वबळावर लढण्यास भाजपा तयार आहे. गेल्या २५ वर्षांच्या सत्तेत बिजू जनता दलाने राज्यातील प्रमुख पक्ष समजल्या जाणाऱ्या काँग्रेसची जमीन जवळपास पुसून टाकली असून, उर्वरित जमीन भाजपच्या ताब्यात गेली आहे. त्यामुळे तार्किकदृष्ट्या पाहिले तर भाजपने केलेली जागांची मागणी योग्य होती. पण आता ही युती फिसकटल्यामुळे ओडिशात खरी लढत या दोन पक्षांमध्येच होणार आहे. या दोघांनी एकत्र येऊन लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत समान उमेदवार उभा केला असता, तर काँग्रेस आपोआपच प्रमुख विरोधी पक्षाच्या स्थानावर आली असती. २०१४ पासून केंद्रातील मोदी सरकारला प्रत्येक संकटात साथ देण्यात बिजू जनता दल मागे राहिलेला नाही. केवळ शेतकरी सुधारणा विधेयकाच्या मुद्द्यावरुन बिजदने भाजपापासून फारकत घेतली. पण आजही या दोन्ही पक्षांच्या वरिष्ठांमधील संबंध सौहार्दाचे आहेत. एनडीएमधून बाहेर पडूनही नवीन पटनायक यांनी कधी भाजपवर बोचरी टीका केली नाही. भाजपेतर पक्षांच्या इंडिया आघाडीमध्ये जाणेही त्यांनी टाळले.

केंद्रातील भाजप सरकारशी फारसे वितुष्ट न घेता राज्य चालवण्याकडे त्यांचा कल राहिला. मध्यंतरी पंतप्रधानांनी ओडिशा दौऱ्यात नवीन यांचा उल्लेख मित्र असा केला होता. त्यामुळे हे दोन्ही पक्ष अपरिहार्यता म्हणून निवडणुकीत परस्परांविरुद्ध उभे ठाकणार आहेत.

यंदाच्या विधानसभेला भाजपकडे पटनायक यांना आव्हान देईल असा राज्यस्तरीय नेता नाहीये. या राज्यात विधानसभेच्या १४७ पैकी सध्या बिजदच्या ११९ तर भाजपच्या २२ जागा आहेत. गेल्या लोकसभेला जरी भाजपने ८ जागा जिंकल्या असल्या तरी ओडिशा अस्मितेच्या मुद्द्यावर विधानसभेला बिजद प्रभावी ठरला. आताही लोकसभेला भाजपा गतवेळीपेक्षा अधिक जागा मिळवू शकेल; मात्र विधानसभेला पटनायक यांची हुकुमत मोडणे भाजपला शक्य होईल असे सध्याचे चित्र पाहता वाटत नाही.

(उत्तरार्ध)

■ दिग्गज पराभूत अण्णा जोशी हारले!

अण्णा जोशी हे जनसंघ भाजपमधील लढाऊ कार्यकर्ते म्हणून परिचित होते. १९८० मध्ये अण्णा जोशींना भारतीय जनता पक्षाने पुण्यातील शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली. त्यांच्या विरोधात होते काँग्रेसचे श्रीधर माडगुळकर. ग.दि. माडगुळकर यांचे चिरंजीव असलेल्या श्रीधर माडगुळकर यांना जयंतराव टिळक यांच्या आग्रहामुळे उमेदवारी दिली गेली होती. अण्णांनी त्या निवडणुकीत फक्त ६०० मतांनी विजय मिळवला. १९८५ मध्ये पुन्हा अण्णा विरुद्ध श्रीधर माडगुळकर अशी लढत झाली. या लढतीत अण्णा अवघ्या १११ मतांनी विजयी झाले. १९८९ मध्ये अण्णा जोशींना विठ्ठलराव गाडगीळ यांच्या विरोधात लोकसभा निवडणुकीत भाजपने उमेदवारी दिली होती. त्यावेळी राम मंदिराच्या मुद्द्यामुळे हिंदुत्वाचे वारे वहात होते. शिवाय, दोन टर्म झाल्यामुळे गाडगीळांविषयी नाराजी होतीच.

अण्णांचा पुण्यातील जनसामान्यांशी थेट संपर्क असायचा. आपला माणूस अशी अण्णांची प्रतिमा होती. या निवडणुकीत अण्णांनी विठ्ठलराव गाडगीळांना जबरदस्त झुंज दिली. पहाटे पाचपर्यंत मतमोजणी चालू होती. विजयाचे पारडे दोन्ही बाजूला झुकत होते. अखेर गाडगीळांनी अवघ्या नऊ हजारांच्या मताधिक्याने कसाबसा विजय मिळवला. स्वतः गाडगीळांनी विजयानंतर अण्णांची भेट घेऊन त्यांचे खास कौतुक केले. गाडगीळांच्या विजयी मिरवणुकीत काही कार्यकर्त्यांनी हिरवा गुलाल उधळल्याने व त्याचे वृत्त प्रकाशित झाल्यामुळे वातावरण चांगलेच तंग बनले होते. १९९१ मध्ये पुन्हा पुण्यात अण्णा विरुद्ध विठ्ठलराव गाडगीळ अशी लढत झाली. या लढतीत शरद पवार आणि सुरेश कलमाडी यांच्या समर्थकांनी गाडगीळांच्या विरोधात काम केल्याचे स्पष्टपणे

जाणवत होते. पवार समर्थकांच्या मदतीमुळे अण्णांनी गाडगीळांना १७ हजार मतांनी पराभूत करत विजय मिळवला. या विजयानंतर अण्णा जोशी यांना भारतीय जनता पक्षाने एकदाही उमेदवारी दिली नाही. अण्णांना का डावलले याची चर्चा पक्षात दबक्या आवाजात अनेक वर्षे चालू होती.

१९९६, १९९८ अशा सलग दोन निवडणुकीत डावलले गेल्यानंतर अण्णांनी केंद्रीय नेतृत्त्वाकडे आपल्याला का डावलले जात आहे, अशी संतप्त विचारणा केली. उमेदवार निवडीच्या बैठकीत त्यावेळी मुरली मनोहर जोशी यांनी अण्णांच्या नावासाठी आग्रह धरल्यामुळे १९९९ मध्ये अण्णांचे नाव उमेदवार म्हणून जाहीर झाले. पुण्यातील महाजन-मुंडे समर्थकांना अण्णांची उमेदवारी पसंत नव्हती. प्रदीप रावत यांना उमेदवारी मिळावी यासाठी महाजन मुंडे समर्थकांनी हडु धरला होता. अण्णांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर काही कार्यकर्ते प्रमोद महाजनांच्या भेटीला गेले होते. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना अण्णांची उमेदवारी कापण्यासाठी 'कानमंत्र' दिला. हे कार्यकर्ते त्यावेळी गोव्यात पक्षाच्या बैठकीसाठी आलेले लालकृष्ण अडवाणी यांच्या भेटीसाठी गेले. 'प्रदीप रावत यांची उमेदवारी जाहीर होईपर्यंत आम्ही तुमच्या समोरून उठणारच नाही' असा प्रेमळ दम या कार्यकर्त्यांनी दिल्यामुळे अडवाणी यांनी पक्षाच्या निवडणूक मंडळाला अण्णा जोशींची उमेदवारी रद्द करायला लावली आणि प्रदीप रावत यांना उमेदवार म्हणून घोषित केले गेले. त्यानंतर २००४ मध्येही अण्णांचा विचार झाला नाही. पक्षात बाजूला पडलेल्या अण्णांनी २००९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून कोथरुड विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवली. या निवडणुकीत ते अर्थातच पराभूत झाले. आता अण्णा हे पूर्णपणे राजकीय विजनवासात आहेत.

■ मागोवा प्रचाराचा 'फ्लॅशबॅक'

स्थाच्या तंत्रज्ञानाच्या युगात निवडणूक प्रचारासाठी आधुनिक आणि वेगवान फंडे वापरले जात आहेत. पण स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळातील निवडणुकांमध्ये प्रचारासाठी पोस्टकार्ड किंवा हस्तलिखित चिठ्ठी हे एक प्रमुख माध्यम म्हणून वापरले जात होते. या पोस्टकार्डद्वारे उमेदवार मतदारांशी संवाद साधत.

▶लाऊडस्पीकर किंवा ज्याला कर्णा असे म्हटले जाते त्याचाही वापर अधिक प्रमाणात दिसून येत असे. याचा आवाज कर्णकर्कश वाटत असला तरी बहुतांश रॅलीमध्ये, बैठकांमध्ये मंडपाच्या खांबावर हा कर्णा लावलेला दिसून येईल. निवडणूक आयोगाने यावरही बंदी आणली होती. शेषन यांच्या काळात निवडणूक आयोगाने झेंडे, बॅनर आणि पोस्टर्स यांवरही बंदी आणली होती.

▶१९९६ पूर्वीच्या निवडणुकांमध्ये बिल्ले किंवा बॅच यांचा प्रचारासाठी सर्वच राजकीय पक्षांकडून मोठ्या प्रमाणात करण्यात येत होता. या बिल्ल्यांवर-बॅचवर पक्षाचे निवडणूक चिन्ह, उमेदवाराचा वा ज्येष्ठ नेत्याचा फोटो छापलेला असे. लहान मुलांमध्ये अशा प्रकारचे प्लॅस्टिकचे बिल्ले खूप प्रसिद्ध आणि लोकप्रिय होते. सध्याच्या काळात बिल्ले-बॅचेसचा ट्रेंड मागे पडला आहे.

▶पूर्वी गावागावातील घरांच्या तसेच इतर इमारतींच्या भिंती हे निवडणुकीच्या काळातील प्रचाराचे एक मोठे माध्यम होते. या भिंतींवर उमेदवाराचे नाव, त्याचे चिन्ह आणि त्याखाली 'प्रचंड बहुमताने विजयी करा' या आणि अशा काही ओळी लिहिलेल्या आढळत असत. अनेकदा गावातील लोकांच्या घरांच्या दारांवरही अशा प्रकारे प्रचाराचे रंगकाम केले जात असे. अलीकडील काळात हाही प्रकार फारसा दिसून येत नाही.

निवडणूक प्रचारासाठी मोठी यात्रा काढणे हे पूर्वी एक मोठे आणि सश्रक्त प्रचाराचे माध्यम म्हणून ओळखले जाई. अडवाणींची यात्रा अनेकांना आठवत असेलच; पण पहिल्या लोकसभा निवडणुकीदरम्यान जवाहरलाल नेहरू यांनी देशामध्ये ४० हजार किलोमीटरची प्रदीर्घ अशी यात्रा केली होती. यामध्ये त्यांनी साडे तीन कोटींहून अधिक नागरिकांशी संवाद साधला होता.